**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**पत्रकारांवर होत असलेल्या हल्ल्यांबाबत**

श्री.माणिकराव ठाकरे :सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे.

**सभापती :** मागच्या आठवडयात सुध्दा प्रश्नोत्तरे झाली नसल्यामुळे आजचा प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना घेतल्या जातील.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्यात कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत ढासळलेली आहे. राज्यात पत्रकारांवर हल्ले होत आहेत, दोन पत्रकारांचा खून देखील झालेला आहे. आमदारांवर सुध्दा हल्ले होऊ लागले आहेत. राज्यात पत्रकार व आमदार वाचू शकत नसेल तर हे सरकार सामान्य माणसाला कसे काय संरक्षण देऊ शकेल ?

----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : आता शुक्रवार, दिनांक 10 एप्रिल, 2015 रोजी राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.3987 चर्चेला घेण्यात येईल.

**राज्यातील आदिवासी शाळेत शिकणाऱ्या मुलींना सोयी-सुविधा पुरविण्याबाबत**

**3987 श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग:** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील आदिवासी शाळेत शिकणाऱ्या आदिवासी मुलींना अन्न, वस्त्र, पुस्तके, वैद्यकीय सुविधा तसेच सुरक्षा व्यवस्था पुरविण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे जानेवारी, 2015 मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय,

(2) तसेच राज्यातील वस्तीशाळांमधील आदिवासी मुलींना अन्न, वस्त्र, पुस्तके आणि वैद्यकीय सुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विष्णू गवळी यांनी शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, 2015 मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय, (3) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आदिवासी मुलींना अत्यावश्यक सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णू सवरा :** (1) हे खरे नाही.

तथापि, जनहित याचिका 8/2013 संदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी 18.12.2014 च्या आदेशान्वये आदिवासी शासकीय वसतिगृहातील मुलामुलींना निर्वाह भत्ता व इतर सोयी सुविधा देण्याचे आदेश दिले आहेत.

(2) श्री. विष्णु गवळी यांची वस्तीशाळांमधील आदिवासी मुलींना सोयी सुविधा देण्याबाबतची कोणतीही विनंती शासनास प्राप्त झालेली नाही.

तथापि,अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांचे अधिनस्त शासकीय वसतिगृहामधील विद्यार्थ्यांनी आंदोलन व उपोषणादरम्यान केलेल्या मागणीनुसार विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. 11/11/2011, शासन शुध्दीपत्रक दि.10/04/2013 व दि.29/06/2013

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.** :3987.....

श्री. विष्णू सवरा.....

नुसार वसतिगृहात देय असणाऱ्या सोयी सुविधा देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत श्री. विष्णु गवळी यांनी दि.01/01/2015 रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली आहे.

(3)व (4) आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत वसतिगृहातील विद्यार्थी/विद्यार्थिनींना आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.11 नोव्हेंबर, 2011, शासन शुध्दीपत्रक दि.10.04.2013 व दि.29.6.2013 नुसार दोन वेळचे पोटभर जेवण, सकाळी नाश्ता तसेच वह्या पुस्तके, शैक्षणिक साहित्य, गणवेश,क्रीडा साहित्य, निवास व्यवस्था इ.सुविधा मोफत पुरविल्या जात आहेत. याव्यतिरिक्त किरकोळ गरजा भागविण्यासाठी मासिक दराने निर्वाहभत्ता विद्यार्थ्यांना अदा केला जातो. शासन निर्णयांप्रमाणे सर्व मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याची कार्यवाही प्रकल्प स्तरावर केली जाते.त्याकरिता आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

आश्रमशाळेतील मुलांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दि. 21 डिसेंबर, 2009 नुसार आहार देण्यात येतो. तसेच आश्रमशाळा संहितेनुसार सोयी-सुविधाही उपलब्ध करुन देण्यात येतात. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आश्रमशांळेमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी 37 वैद्यकीय पथकांची स्थापना केलेली आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील आदिवासी शाळेत शिकणाऱ्या मुलींना ज्या सोयी-सुविधा पुरवण्यात येतात त्याबाबत मी प्रश्न विचारला होता. शासनाच्या निर्णयान्वये आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरवणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष सुरु होऊन दीड महिना उलटून गेला तरी आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे काय ? शैक्षणिक वर्ष सुरु होऊन दीड दोन महिने होत आले तरी विद्यार्थ्यांना शिक्षणोपयोगी साहित्याचा अद्यापि पुरवठा झालेला नाही. आदिवासी विद्यार्थ्यांना वहया,पुस्तकेही अद्यापि मिळालेली नाहीत. आदिवासीच्या वसतिगृहासाठी व आश्रमशाळेसाठी शासनाने जमिनी मिळविलेल्या आहेत त्या ठिकाणी शासकीय आश्रमशाळांना खाजगी आश्रमशाळांप्रमाणे जमीन संपादित करण्यात आली आहे काय, आश्रमशाळेसाठी व वसतिगृहासाठी जमीन संपादन व इमारत बांधकामाची विशेष तरतूद करण्यात आली आहे काय, असल्यास किती ?

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.** :3987.....

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, या प्रश्नाचा रोख हा वसतिगृहाच्या संदर्भात आहे शासन आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा तसेच वसतिगृहाची व्यवस्थाही करीत असते. हा जो प्रश्न आहे तो वसतिगृहाच्या संदर्भातील आहे. आदिवासी वसतिगृहासाठी ज्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागत असतात त्या व्यवस्था शासन व्यवस्थित पुरवित आहे. या विषयाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची अडचण नाही किंवा तक्रारी सुध्दा आलेल्या नाहीत. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी 3-4 प्रश्न मिक्स करुन विचारले आहेत. त्यांनी वसतिगृह तसेच आश्रमशाळेचाही उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 490 वसतिगृहे असून शासकीय इमारतीमध्ये 134 वसतिगृहे आहेत, भाडयाच्या इमारतीमधील वसतिगृहाची संख्या 356 असून यातील 207 वसतिगृहे ही फक्त मुलींसाठी आहेत. वसतिगृहासाठी ज्या सोयी-सुविधा लागतात त्या सर्व सोयी-सुविधा शासन उपलब्ध करुन देत असून यासंदर्भात शासनाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार आलेली नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, वसतिगृह तसेच आश्रमशाळेसाठी महिला अधीक्षिका नेमण्याच्या संदर्भात शासनाचा निर्णय झालेला असताना अजूनही काही आश्रमशाळेमध्ये अधीक्षिका नेमण्यात आलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे काय ? आता शैक्षणिक वर्षाला सुरुवात झालेली असल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गणवेश आणि पुस्तके अजूनही मिळालेली नाहीत ती आपण ताबडतोब उपलब्ध करुन देणार आहात काय ?

श्री.विष्णू सवरा :सभापती महोदय, आश्रमशाळेला आम्ही गणवेश दिलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. टेंडर प्रक्रियेमध्ये विलंब झाल्यामुळे आम्ही आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देऊ शकलो नाहीत. परंतु नजिकच्या महिन्याभरात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन दिले जातील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार आश्रमशाळेत अधीक्षिकांचा बऱ्याच जागा रिक्त आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु ज्या ज्या ठिकाणी अधीक्षिका नाहीत त्या ठिकाणचा कार्यभार तेथील शिकवणाऱ्या शिक्षिकेला देण्यात आल्यामुळे त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची अडचण आली नाही किंवा त्यासंदर्भात तक्रारही आलेली नाही. शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना महिन्याभरात उपलब्ध करुन दिले जाणार आहे. न्यायालयीन प्रक्रिया तसेच अन्य प्रक्रियेमुळे शैक्षणिक साहित्य उपलब्ध

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.** :3987.....

श्री.विष्णू सवरा.........

करुन देण्यास विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. टेंडर प्रक्रियेसाठी सुध्दा महिना-दीड महिन्याचा कालावधी लागत असतो. शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यामध्ये थोडा विलंब झाल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे ही बाब लक्षात घेऊन तातडीने यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्य शासनाच्या आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहाला नेमक्या कोणत्या सोयी-सुविधा पुरवल्या जातात, या सुविधांवर एकंदर किती खर्च होतो, या वर्षी आदिवासी विद्यार्थ्यांना वहया पुरवण्याचे टेंडर काढण्यात आले होते काय, या टेंडर प्रक्रियेमध्ये काही गैर प्रकार आढळल्यामुळे या प्रक्रियेला माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली ही बाब खरी आहे काय ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, होय, ही गोष्ट खरी आहे. शैक्षणिक साहित्य पुरवणाऱ्या टेंडरला माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे. यासंदर्भातील टेंडर किती रुपयांचे होते यासंदर्भातील आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही परंतु सदर माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. निविदेला विलंब होणार असल्यामुळे शासन स्थानिक पातळीवर वहया खरेदी करण्याचे आदेश देणार आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना कबूल केले आहे की, वहयाचे जे कंत्राट देण्यात आले होते त्या कंत्राटाला स्थगिती देण्यात आलेली आहे. माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे की, वह्या खरेदी मध्ये गैरप्रकार उघडकीस आल्यामुळे सदर टेंडरला सन्माननीय मंत्र्यांनी स्थगिती दिली की, माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली ? ज्या टेंडरला स्थगिती दिली आहे ते टेंडर किती रुपयांचे होते, यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना एकंदर किती वहया पुरवल्या जाणार होत्या ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, पारदर्शकतेने व्यवहार व्हावा यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने सदर टेंडरला स्थगिती देण्यात आलेली आहे. पूर्ण महाराष्ट्रासाठीचे सदर टेंडर 19.50 कोटी रुपयांचे असून विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून प्रकल्पस्तरावर वह्यांची खरेदी करण्याच्या संदर्भातील निर्णय आम्ही करीत आहोत.

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.** :3987.....

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, महाराष्ट्रातील असंख्य वसतिगृहे ही भाडयाच्या इमारतीमध्ये आहेत. या इमारतींमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह,स्नानगृह,शौचालय तसेच शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे या ठिकाणचे विद्यार्थी बोअरिंगचे पाणी पित असतात ही वस्तुस्थिती आहे काय ? तसेच ज्या भाडयाच्या इमारतीमध्ये वसतिगृहे आहेत त्या ठिकाणी शौचालय व स्नान गृहे बांधून देण्यासंदर्भात इमारत मालकांना शासन आदेशित केले जाणार आहे काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, जी भाडयाच्या इमारतीमध्ये आहेत त्या ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यामध्ये आम्हाला अडचणी येत आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु ज्या ठिकाणी शासकीय वसतिगृहाचे बांधकाम शासनाने केले आहेत त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे त्या सर्वांची पूर्तता लवकरात लवकर करण्यात येईल. शासकीय जागेमध्ये असावीत असा शासनाचा प्रयत्न असून त्यासाठी जमीन मिळवणे, ताब्यात घेणे आणि तेथे बांधकाम करणे अशा प्रकारची कार्यवाही सुरु आहे.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3987....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी एका गंभीर विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. मंत्री महोदयांनी दोन गोष्टी कबूल केलेल्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास ही गोष्ट आल्यानंतर त्यांनी स्थगिती दिली. दुसरी गोष्ट म्हणजे यामध्ये काही गैरव्यवहार झालेला आहे, हे आपण मान्य केलेले आहे. गैरव्यवहार झाल्याशिवाय अशी स्थगिती मिळत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी ज्या प्रकरणासंबंधी स्थगिती दिलेली आहे त्याची माहिती मंत्री महोदयांनी सभागृहाला देतील काय, या प्रकरणामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर तत्काळ कोणती कारवाई करणार आहात काय ? मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, ज्या भाड्याच्या जागेवर आश्रमशाळा किंवा वसतिगृहे आहेत ती शासकीय मालकीच्या जागेवर आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, ही चांगली बाब आहे. आदिवासी विभागाकरिता एकूण बजेटच्या 9 टक्के बजेट असते. आदिवासी विभागाकरिता साधारणत: 4 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त बजेट आहे. भाड्याच्या जागेवर ज्या शाळा किंवा वसतिगृहे आहेत त्या शाळा किंवा वसतिगृहे शासकीय जमिनीवर केव्हा सुरु करणार ? तसेच या शाळा किंवा वसतिगृहांमध्ये प्राथमिक सुविधा जसे शौचालय, स्थानगृह इत्यादी पुरविण्यासाठी काय करणार आहात ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, खरे म्हणजे या निविदा प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झालेला नाही... (अडथळा).. निविदा प्रक्रियेस का स्थगिती दिली त्याचे कारण सांगतो. या खरेदी प्रक्रियेमध्ये काही त्रुटी होत्या म्हणून स्थगिती दिलेली आहे. आम्ही ज्या वह्या मागविल्या त्या वह्या लॅबोरटीजमध्ये तपासल्या असता रिजेक्ट करण्यात आल्या.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

जी विहित पद्धती आहे त्यानुसार आपण वह्यांची क्वॉलिटी तपासून घेतो. आपणास शाळेचा गणवेश द्यायचा असला तरी त्या गणवेशाचे कापड तपासण्यासाठी लॅबोरटीजमध्ये पाठविले जाते. वह्यांचा दर्जा कसा आहे हे तपासण्यासाठी त्या लॅबोरटीजमध्ये पाठवितो. या निविदे प्रक्रियेमध्ये त्रुटी असल्यामुळे आम्ही निविदा रद्द केलेली आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची शंका घेण्याचे काही कारण नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3987....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्या वह्या खरेदी करण्यात आल्या, त्यास स्थगिती देण्यात आली. या वह्यांची खरेदी ई-निविदेद्वारे करण्यात आली की दर करारानुसार खरेदी करण्यात आली ? जर ई-निविदा काढून खरेदी करण्यात आली असेल किंवा दर करारानुसार खरेदी झाली असेल तर या 19 कोटी रुपयांच्या वह्या खरेदीला कोणी मान्यता दिली ? मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, वह्या तपासण्यासाठी लॅबोरटीजमध्ये पाठविण्यात आल्या आणि तेथे त्या रिजेक्ट करण्यात आल्या म्हणून स्थगिती दिली. त्यांचे म्हणणे सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांना समजलेले नाही. माझा प्रश्न आहे की, ही खरेदी ई-निविदेद्वारे करण्यात आली की दर करारारनुसार खरेदी करण्यात आली ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, असा कोणताही प्रकार झालेला नाही. ज्यांनी कोणी निविदा भरल्या होत्या त्यांच्या वह्यांची क्वॉलिटी तपासण्यासाठी त्या वह्या लॅबोरटीजमध्ये पाठविण्यात आल्या होत्या. दुसरे म्हणजे वह्यांची क्वॉलिटी तपासल्याशिवाय निविदा प्रक्रिया पूर्ण होत नाही. काही त्रुटी असल्यामुळे आम्ही ती निविदा प्रक्रिया रद्द केलेली आहे. आम्ही अजून खरेदी केलेली नाही. खरेदीची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी या संदर्भात मागील दोन अधिवेशनामध्ये सातत्याने प्रश्न विचारलेला आहे. मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे की, त्यांनी निविदा प्रक्रिया थांबविली आहे. त्यामुळे मी सर्व आदिवासी बांधवांतर्फे मंत्री महोदयांचे आभार मानतो. निविदा प्रक्रिया प्रोसेस संबंधी माननीय मंत्री काही अधिकाऱ्यांना पाठिशी घालत आहेत. मंत्री महोदयांनी सांगितले की, या निविदा प्रक्रियेस तात्पुरती स्थगिती दिलेली आहे. याचा अर्थ आपल्या कामामध्ये कुठेतरी चुका झालेल्या आहेत हे आपण सभागृहासमोर मान्य केलेले आहे. निविदा घेणारे एकच आहेत. त्याच लोकांना आपण वारंवार टेंडर देता आणि ते चुकीच्या गोष्टी करत राहतात. निकृष्ट दर्जाचा माल पुरवितात, वेळेवर माल पुरविला जात नाही, या सर्व गोष्टी सभागृहाला माहीत आहेत. माझा प्रश्न आहे की, आपण मागील सहा महिन्यात कोणत्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3987....

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, आपण ई-निविदा काढली होती. दर कराराने कार्यवाही केलेली नाही. तेव्हा कोणती चौकशी करावी असा माझ्यासमोर प्रश्न आहे. ई-निविदा काढण्यात आली होती आणि त्यामध्ये काही त्रुटी होत्या म्हणून त्यास स्थगिती दिली. अजून अंतिम खरेदी झालेली नाही. त्यामुळे पुरवठा आदेश देण्याचा प्रश्न येत नाही. आपण अजून निविदा प्रक्रिया पूर्ण करायची आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय विसंगत उत्तरे देत आहेत. मंत्री महोदयांनी सांगितले की, ई-निविदा काढण्यात आली. या ई-निविदेमध्ये किती जणांनी निविदा भरल्या होत्या ? यापूर्वी ज्याला वह्यांच्या खरेदीची ऑर्डर दिली होती, त्याने कितीवेळा वह्यांचा पुरवठा केलेला आहे ? मंत्री महोदय चुकीची उत्तरे देत आहेत आणि रेकॉर्डवर चुकीचे जात आहे. या वह्यांची क्वॉलिटी पाहताना त्यावर कोणी कोणी सह्या केल्या ? वह्यांचा पुरवठा केल्यानंतर त्या क्वॉलिटी कंट्रोलकडे तपासण्यासाठी पाठविण्यात आलेल्या आहेत. मंत्री महोदय काय बोलले ते रेकॉर्डवर आहे. माझा 100 वर्षापासून प्रिंटींगचा व्यवसाय आहे. या निविदा प्रक्रियेमध्ये घोळ आहे म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिलेली आहे. मुख्यमंत्री महोदयांऐवजी आपण स्थगिती दिली असती तर चालले असते. या प्रकरणी मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिली असल्यामुळे या प्रकरणास गांभीर्य आहे. मंत्री महोदयांनी कारभार स्वीकारुन फक्त आठ-नऊ महिने झालेले आहेत. ते तसे नवीन आहेत. आदिवासी विभागामध्ये अनेक घोटाळे होत आहेत. लाखो रुपये खाल्ले जात आहेत. चुकीच्या पद्धतीने निविदा प्रक्रिया होत आहे. माझा प्रश्न आहे की, या प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, ही निविदा विहित पद्धतीने काढलेली आहे आणि त्याप्रमाणे प्रक्रिया सुरु झाली होती. एकूण 11 जणांना निविदा भरली होती त्यापैकी चार जणांची निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरली. त्यानंतर त्या वह्यांची क्वॉलिटी तपासण्याकरिता त्या वह्या लॅबोरटीजमध्ये पाठविल्या आल्या. त्यामध्ये तीन जणांच्या निविदा पात्र ठरल्या. स्थगिती दिल्याचे कारण सांगतो. आम्ही ज्या क्वॉलिटीच्या वह्या मागविल्या होत्या त्यामध्ये त्रुटी होत्या. आम्ही विहित पद्धतीनेच काम केलेले आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3987....

**सभापती** : या प्रश्नावर 20 मिनिटांपासून चर्चा सुरु आहे. मला वाटते हा प्रश्न राखून ठेवण्याऐवजी, माननीय मंत्र्यांनी या विषयी सर्व संबंधित आमदारांची बैठक आयोजित करावी किंवा या विषयी मी बैठक बोलवितो. आता प्रश्नोत्तराच्या यादीतील ता.प्र.क्र.7599 चर्चेला घेऊ या.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, मी या विषयी बैठक घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. मी या विषयी बैठक घेतो. कृपया आपण सर्वांनी खाली बसावे.

-------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7599

**भटक्या विमुक्तांना क्रिमिलिअर संज्ञेमधून वगळण्यासाठी**
**शासनाने करावयाची कार्यवाही**

**(१) * ७५९९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड. हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या विमुक्तांना क्रिमिलिअर संज्ञेमधून वगळण्यात यावे, यासाठी विविध सामाजिक संघटनांनी मागणी करुन तसेच राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी शिफारस करुन सुध्दा भटक्या विमुक्तांना क्रिमिलिअर संज्ञेमधून वगळण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१५ वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रिमिलिअर संज्ञेमधून भटक्या विमुक्तांना न वगळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबतीत शासनाचे धोरण काय आहे,
(३) अद्याप, उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप कांबळे, श्री.राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) व (२) राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचा या संदर्भातील अहवाल दिनांक ०५.११.२०१४ रोजी शासनास प्राप्त झाला आहे.
सदर अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने भटक्या विमुक्त समाजाला क्रिमिलेअर लागू होत नाही. सर्वोच्च न्यायालयात मंडल आयोगाच्या बाबतीत चर्चा झाली होती. मी गेल्या 10 वर्षापासून आय.ए.एस. अधिकाऱ्यांना समजावित आहे की, भटक्या विमुक्त समाजाच्या लोकांना क्रिमिलेअर लागू होत नाही. शिवाय त्यांना मी हे सुध्दा सांगितले की, हे मी नव्हे तर सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. जे लोक परंपरागत व्यवसाय करतात त्यांना क्रिमिलेअरची अट लावू नका. या विषयाच्या बाबतीत मी प्रत्येक वेळा सरकारकडून हेच ऐकतो की, कार्यवाही सुरु आहे. मी विचारु इच्छितो की, या विषयाच्या बाबतीत निर्णय घेण्याच्या दृष्टीने आय.ए.एस. अधिकारी काय करीत आहेत ? राज्य सरकारने या विषयी विधी व न्याय विभागाकडून सल्ला घेतला असून, अन्य विभागांकडून सल्ला घेत फिरत आहे. सर्वोच्च न्यायालयाने उदाहरणादाखल सांगितले होते की, भोई समाजातील माणसे लंगोटी लावून मासे पकडतो. या व्यवसायातून त्याचे उत्पन्न वाढले तरी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7599...

श्री.हरिसिंग राठोड....

त्याचे स्टेटस् मात्र बदलत नाही. पूर्वी ब्रिटिशांनी भटक्या विमुक्त जातीच्या लोकांवर गुन्हेगारींचा शिक्का मारला होता. परंतु आताचे सरकार सुध्दा या लोकांवर अन्याय करीत आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या 11 कोटीच्या जवळपास असून, त्या लोकसंख्येपैकी 2.25 कोटी लोकसंख्या भटक्या विमुक्त समाजाची आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या प्रकरणी सरकार किती कालावधीत कार्यवाही पूर्ण करणार आहे आणि विहित मुदतीत कार्यवाही पूर्ण झाली नाही तर सरकारवर गुन्हे दाखल करायचे काय आणि ज्यांच्या दिरंगाईमुळे या समाजाच्या लोकांचे नुकसान होत आहे त्यास जबाबदार कोण आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. अधिवेशन संपल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड, इतर सन्माननीय सदस्य आणि भटक्या विमुक्त समाजाच्या विविध संघटनांची बैठक मंत्रालयात घेतली जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने आपल्या भावना मांडल्या आहेत. आमची खरी हरकत लेखी उत्तरालाच होती. गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड आणि आम्ही सन्माननीय सदस्य मांडत आहोत. प्रश्न क्रमांक 1 व 2 च्या प्रश्नाला "राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचा या संदर्भातील अहवाल दिनांक 05.11.2014 रोजी शासनास प्राप्त झाला आहे." असे लेखी उत्तर देण्यात आले आहे. वास्तविक पाहता सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर मागितले होते. अहवाल वगैरे हा जुना विषय आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आणि अहवाल या सर्व प्रक्रिया अगोदर पूर्ण झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांकडून अधिवेशनाच्या तीन महिने अगोदर प्रश्न विचारला जातो. तरी सुध्दा त्या प्रश्नाला अशा प्रकारे गुळमुळीत उत्तर येत असेल तर, आम्ही अशा प्रकारचे उत्तर एकून गप्प बसावे, अशी आपली अपेक्षा आहे काय ? भटक्या विमुक्त समाजाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय घेतला असेल तर सरकार सर्वोच्च न्यायालयाला सुपरशीट करु शकणार नाही. किंबहुना, कोणताही अहवाल सर्वोच्च न्यायालयाला सुपरशीट करु



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7599...

श्री.भाई जगताप....

शकणार नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय जसाच्या तसा पाळून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येईल काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयात एखादा निर्णय झाल्यानंतर त्याचे रुपांतर आपोआपच कायद्यात होते. दिनांक 5 नोव्हेंबर, 2014 रोजी या विषयाच्या अनुषंगाने शासनाला अहवाल प्राप्त झाला. परंतु त्या कालखंडात राज्यात निवडणुका होत्या. म्हणून हा प्रश्न प्रलंबित राहिलेला आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, या अधिवेशनानंतर पहिल्या आठवड्यात सर्व संबंधितांची बैठक घेऊन, या विषयी तातडीने निर्णय घेण्यात येईल.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, अहवालाच्या शिफारशी आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश हे सुप्रीम राहणार आहेत. त्यामुळे अहवालाला तशी फारशी किंमत राहिलेली नाही. मला वाटते आपण या विषयी लवकरात लवकर बैठक घ्यावी. किंबहुना, आपण लवकरात लवकर सर्वोच्च न्यायालयाचे आदेश अंमलात आणावेत.

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला होता त्यामध्ये ज्या जाती आहेत त्या संदर्भात डिटेल्स प्रिस्क्रीप्शन नव्हते. त्यामुळे राज्य मागासवर्ग आयोगाकडे डिटेल अहवाल तयार करण्याच्या बाबतीत निदेश दिले होते. त्यानुसार विधी व न्याय विभागाकडे 17 जानेवारी रोजी तो अहवाल अभिप्रायासाठी सादर केला होता. तद्नंतर दिनांक 7 एप्रिल, 2015 रोजी सामान्य प्रशासन विभागाकडे सदरहू अहवाल अभिप्रायासाठी पाठविला होता. त्यामुळे येत्या महिनाभरात या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य मागासवर्ग आयोगाने नोव्हेंबर-2014 मध्ये शिफारशी केल्यानंतर सुध्दा या अहवालावर 9 महिन्यात कार्यवाही का करण्यात आली नाही ? माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, सदरहू अहवाल विधी व न्याय विभाग आणि त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आला होता. मुळात हा अहवाल गेल्या 9 महिन्यापासून राज्य सरकारकडे पडून आहे. नॉन क्रिमिलेअर संवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने राज्य मागासवर्ग आयोगाने शिफारशी करुन सुध्दा

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7599...

श्री.धनंजय मुंडे....

प्रशासनाच्या निष्काळजीपणा आणि गलथान कारभारामुळे या विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षात आरक्षणापासून वंचित राहावे लागले. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, याला जबाबदार कोण आहेत आणि त्यांच्यावर सरकार काय कारवाई करणार आहे ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, राज्य मागासवर्ग आयोग यांचा अहवाल दिनांक 5 नोव्हेंबर, 2014 रोजी शासनास प्राप्त झाला होता. त्यानंतर सदरहू अहवालाच्या संदर्भात विधी व न्याय विभाग आणि सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेणे आवश्यक होते. त्यामुळे हा अहवाल उक्त दोन्ही विभागांकडे सादर करण्यात आला. मी सांगितल्यानुसार महिनाभरात या विषयी कार्यवाही करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री उभे राहिल्यामुळे आम्हाला वाटले होते की, त्यांनी या संपूर्ण विषयाचा अभ्यास केलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, ज्या जाती, जमाती नोटीफाईड आहेत किंवा गॅझेट आणि घटनेनुसार आहेत त्या विषयी पुन्हा अभिप्राय मागविण्याचे कारणच काय ? विधी व न्याय विभाग हा देशाच्या घटनेपेक्षा मोठा आहे काय ? शेड्यूल्डमध्ये ज्या जाती, जमाती नोटीफाईड झालेल्या आहेत त्या विषयी विभागांकडून अभिप्राय मागविण्याचे कारण काय आहे ? मुळात हा प्रश्न उपेक्षित समाजाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आणि नोटीफाईड झालेल्या जाती-जमातींच्या बाबतीत सरकारला निर्णय घेण्यात काय अडचण आहे, तसेच या संदर्भातील निर्णय तत्काळ घेण्यात येईल काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, भविष्यात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला कोणी आव्हान देऊ नये म्हणूनच राज्य मागासवर्ग आयागाने त्या संदर्भात कार्यवाही केली होती. राज्य मागासवर्ग आयोगाने विमुक्त जाती (अ) यादीतील समाविष्ट 14 जाती, भटक्या जमाती (ब) यादीतील -23 आणि विशेष मागास प्रवर्ग अनुक्रमांक 7 वरील 1, अशा सर्व जाती क्रिमिलेअरच्या तत्त्वातून वगळता येऊ शकेल या बाबत शिफारस केली होती. तथापि, या सर्व जातींच्या संदर्भात त्यांचे पारंपरिक व्यवसाय हे विद्यमान कायद्याने बेकायदेशीर ठरत असल्याने तो व्यवसाय करु शकत नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7599....

श्री. राजकुमार बडोले ....

त्यांना वंश परंपरागत व्यवसाय करणे शक्य होणार नसल्याने, त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे मत घेणे आवश्यक असल्याने, त्या संदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाने शिफारस केली होती. आम्ही महिन्याभरात कार्यवाही करीत आहोत.

श्री. हरिसिंग राठोड : सभापती महोदय, अत्यंत साधा प्रश्न आहे. माननीय श्री. शरद पवार साहेबांनी सन 1993 मध्ये मंडल आयोग लागू केला. त्यावेळी या लोकांना लागू केले नव्हते. सन 2004 मध्ये मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी विधानमंडळात कायदा संमत झाला. त्यावेळी चुकून भटक्या विमुक्तांना सुध्दा ओबीसींबरोबर जोडण्यात आले. साधा प्रश्न आहे. आपण पुन्हा सर्वोच्च न्यायालयाला विचारले तर मुर्खात काढतील. ही काही कोर्ट केस नव्हती. अगदी सुरूवातीला मंडल आयोग लागू झाला, त्यावेळी 11 जज्जेसनी हा रिपोर्ट दिला आहे. इंदिरा सहानी केस सर्वांना माहीत असलेली केस आहे, गाजलेली केस आहे. त्यामध्ये फूल बेंच आहे. वेगळे काहीच करण्याची गरज नाही. मी या लोकांना न्याय देण्यासाठी आयएएस अधिकाऱ्यांना वारंवार भेटतो, त्यांना समजून सांगतो. माझा प्रश्न असा आहे की, निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब 15 दिवसांत करणार का ? मला माननीय मंत्र्यांकडून याचे स्पेसिफिक उत्तर पाहिजे.

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाची कार्यवाही सुरू आहे. महिन्याभरात कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, भटक्या विमुक्तांचे पारंपारिक व्यवसाय आहेत, जे आता करणे शक्य नाही. माननीय मंत्री म्हणत आहेत ते बरोबर आहे. मात्र या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे मागचे निर्णय आहेत, त्यांच्यापुढे पुन्हा जाऊन सांगावे लागेल की, ज्या जमाती आहेत त्या आता ते व्यवसाय करू शकत नाहीत, उदा. चोरीमारी करण, लुटमाऱ्या करणे, भीक मागणे. शासनाने याबद्दलची कार्यवाही गेल्या 6 महिन्यांत केली नाही. ही अडचण आहे. त्यामुळे ती कार्यवाही पूर्ण होईपर्यंत या सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश फी शिवाय होतील याची जबाबदारी शासन घेईल का ?

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7599....

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, आमच्याकडून महिन्याभरात कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी फक्त तुमचा निर्णय होईपर्यंत फी घेणार का असे विचारले आले. सन्माननीय सदस्यांची तळमळ त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळण्यासाठीची आहे. आपण गांभीर्याने याचा विचार करावा. आता 2 प्रश्न झाले आहेत. आपण पुढील प्रश्नावर जाऊ या.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबई उपनगरातील अपंग संस्थांना अनुदान तसेच शिक्षकांना नियमित वेतन मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही**

**(2) * ७६६८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अंधत्व, अपंगत्व, कर्णबधीरता आणि स्वमग्नता अशी शारीरिक व मनोवैज्ञानिक आव्हाने असलेल्या विशेष मुलांच्या सर्व शाळांना सहाय्यक अनुदानाऐवजी शिक्षण विभागाच्या शाळांप्रमाणे अनुदान मिळावे आणि शिक्षकांना शालार्थप्रमाणे नियमित पगार मिळावेत अशी मागणी शिक्षक भारतीने आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबतची वस्तुस्थिती काय आहे,
(3) सदर संस्थांना वेळेवर अनुदान आणि शिक्षकांना पगार मिळणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे ?

**श्री. दिलीप कांबळे, श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१) नाही.
(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) अपंग संस्थांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान वितरीत करण्यात येते. तसेच अपंग शाळा/कर्मचाऱ्यांना वेतन वेळेवर अदा करण्यासाठी समाज सेवार्थ प्रणाली नव्याने विकसति करण्यात आलेली आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, राज्यात तसेच मुंबईतही स्पेशल स्कूल्स असून त्या संदर्भातील हा प्रश्न आहे. निसर्गाने, नियतीने नैसर्गिक सुविधा नाकारलेल्या मुलांच्या संदर्भात विविध संघ्टनांनी सातत्याने शासनाकडे मागणी केली आहे. शासन या मुलांच्या फार तुटपुंज्या शाळांना अनुदान देते, बाकी शाळांना अनुदान देत नाही. या शाळांच्या शिक्षकांकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. स्पेशल शिक्षक मिळत नाहीत, याचे कारण त्यांना पगार वेळेवर मिळत नाही. अनेक शाळा विनाअनुदानित आहेत. शासन या दोन्ही विषयांच्या बाबतीत काय निर्णय घेणार आहे ? सेवार्थऐवजी शालार्थ पध्दतीने त्यांचे वेतन 1 तारखेला देण्याची व्यवस्था करणे आणि अनुदान मिळत नाही त्या शाळांना अनुदान देणे याबाबतीतील निर्णय शासन कधी घेणार आहे ?

सभापती महोदय, आपण या शाळांतील मुलांचे शारीरिक वय 18 वर्षे पूर्ण होते तेव्हा त्यांची जबाबदारी टाकून देतो. त्या मुलांना सांभाळायचे कसे हा प्रश्न आहे. या विद्यार्थ्यांचे मानसिक वय 18 वर्षापेक्षा खाली असते. त्यामुळे त्यांची जबाबदारी घेणे ही शासनाची जबाबदारी आहे. शासन या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी नेमके काय करणार आहे ? विशेषत: ऑटिस्टिक विद्यार्थी आहेत किंवा ज्यांचे कोणतेही पुनर्वसन करणे शकय नाही, अशा विद्यार्थ्यांचे आई-वडील जीवंत असेपर्यंत सोय होते.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7668....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावेत. जेणेकरून उत्तर मिळणे सोपे होईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या विद्यार्थ्यांच्या आई-वडीलांची पेन्शन लागू ठेवणे किंवा त्यांच्यासाठी निर्वाह भत्ता देणे याबाबत शासन निर्णय घेईल का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 3-4 प्रश्न विचारले आहेत. हे खरे आहे की, सर्वसामान्य शाळांपेक्षा संस्थांच्या वतीने अपंग मुलांसाठी शाळा चालविल्या जातात, त्या शाळांतील शिक्षकांकडे लक्ष देण्याची खरोखर गरज आहे. शासन त्या दृष्टीने लवकरात लवकर निर्णय घेईल. या मुलांना 18 वर्षापर्यंत संस्थेत ठेवतात आणि त्यानंतर देखील या मुलांना आई-वडील नसतील किंवा कोण्ी घेऊन जाणारे नसतील तर अशा मुलांची जबाबदारी भविष्यात सुध्दा शासन .... आम्ही लेखाशीर्ष ताबडतोब बदलत आहोत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी चांगले उत्तर दिले आहे. अंध, अपंग, कर्णबधीर, स्वमग्न अशी शारीरिक वैगुण्य ज्या मुलांमध्ये आहेत, नैसर्गिकरित्या मनोवैज्ञानिक आहेत, त्यांच्यापुढे आव्हाने देखील आहेत. रेग्यूलर शाळांतील शिक्षकांना वेतन देण्यात येते, त्याप्रमाणे अपंग मुलांच्या शाळांतील शिक्षकांना सुध्दा वेतन दिले तर ते अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांकरिता विशेष काम करू शकतील. अपंग मुलांच्या शाळांतील शिक्षकांना रेग्यूलर वेतन श्रेणी देणार का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, ज्या शाळांना शासनमान्यता आहे, अनुदान दिले जाते त्या शाळांतील शिक्षकांना नियमित वेतन दिले जाते. प्रणाली बदलण्याचा विषय होता. सुरूवातीला मी त्या संदर्भात सांगितले आहे की, ती प्रणाली बदलण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, अपंग मुलांच्या शाळांना अनुदान व तेथील शिक्षकांना वेतन असे दोन प्रश्न आहेत. गेल्या 2 महिन्यांपूर्वी अपंग शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला. ज्या शाळा मागे राहिल्या होत्या किंवा मूल्यांकनामध्ये आल्या नव्हत्या अशा राज्यातील शाळांची संख्या किती आहे आणि त्यांना अनुदान देण्यासाठी धोरणात्मक निर्णय केव्हा घेण्यात येणार आहे ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7668....

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, माझ्याकडे शाळांचा नेमका आकडा नाही. माझ्याकडील माहितीमधील आकडा 32 आहे. परंतू अशा अजून काही संस्था आहेत, त्यांच्या संदर्भातील नेमकी माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, अपंगांच्या शिक्षणाच्या बाबतीतील हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. नवीन शिक्षणक्रम आणि शिक्षण क्षेत्रातील बदल याप्रमाणे आता सगळीकडे इन्क्लुजिव्ह एज्युकेशन हा प्रकार रूढ होऊ लागला आहे. अपंग मुलांसाठी असलेल्या विशेष शाळा चौथी, पाचवीपर्यंतच असतात, त्यानंतर या मुलांना नियमित शाळांत पाठविले जाते. त्यामुळे ही संख्या वेगळी आहे. आपण जी संख्या धरीत आहोत त्यामध्ये इकडून तिकडे जाणेही आहे. नियमित शाळांत प्रवेश घेतल्यानंतर त्यांना विशेष शिक्षकांची आवश्यकता आहे. मात्र राज्यात त्यासाठीच्या विशेष शिक्षकांची उपलब्धता नाही. मी अंध मुलांसाठीची शाळा चालवितो. त्यामुळे मला याबाबतची अधिक माहिती आहे. महत्त्वाचा घटक आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी या संदर्भात विचारले आहे. स्वमग्न म्हणजे ऑटिस्टिक चिल्ड्रेन या संदर्भात आजपर्यंत तुमच्याकडून व्याख्याही झालेली नाही. आज महाराष्ट्रात स्वमग्न मुलांसाठी कुठेही सोय नाही. ज्या खाजगी संस्था, शाळा सोय करतात त्यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान नाही. आता उच्च न्यायालयामध्ये पीआयएल दाखल आहे, शासन त्या संदर्भात काय करणार आहे ? आपण या घटकाकडे पाहताना अशा विशेष मुलांच्या शाळांना स्पेशल शिक्षक, शाळा यांच्या संदर्भात अधिक अनुदान देण्याची गरज आहे. शासन त्या दृष्टीने संपूर्णपणे या विभागाची फेररचना करणार आहे का ?

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7668.........

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. राज्यातील विशेष शाळांमध्ये विशेष शिक्षक कार्यरत आहेत. अन्य शाळांमधील शिक्षकांपेक्षा विशेष शाळातील शिक्षकांकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य आणि या क्षेत्रातील तज्ज्ञ यांची एक बैठक आयोजित करण्यात येईल, त्यांच्याकडून हा महत्वाचा विषय समजून घेऊन, त्यांच्या सूचना एकत्रित करुन शासन एक चांगले धोरण लवकरात लवकर जाहीर करील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक शाळेमध्ये एका शिक्षकाची आवश्यकता आहे, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्याप्रमाणे शासन अशा शाळांमध्ये विशेष शिक्षकाची व्यवस्था करणार आहे का आणि या विद्यार्थ्यांना प्रवास सवलत देणार का ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, शासन नक्कीच या सूचनांचा विचार करील.

-------------

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राष्ट्रीय महामार्गावरील पेण खारपाडा येथील पाताळगंगा नदीवर असलेल्या टोलनाक्यावरील टोल बंद करण्याबाबत**

**(3) *७२१४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राष्ट्रीय महामार्गावरील पेण खारपाडा (ता.पेण, जि.रायगड) येथील पाताळगंगा नदीवरील बीओटी तत्वावर बांधलेल्या खारपाडा पुलावर सन १९९९ ते २७ ऑगस्ट २०१५ या सोळा वर्ष सहा महिन्यात आयआरबी कंत्राटदार कंपनीला ३३.३३ कोटी इतका खर्च आला मात्र या खर्चाच्या चारपट म्हणजे १२० कोटी टोल वसुली मिळणार असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, येथील टोलवसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.चंद्रकांत पाटील यांच्याकरिता :** (१) व (२) नाही.

केंद्र शासनाच्या दि.१३.०७.१९९९ च्या अधिसुचनेनुसार सवलत कालावधी १७ वर्षे ९ महिने इतका नेमुन देण्यात आला असून दि.२८.०८.२०१५ रोजी संपत आहे. या तारखेपासून टोल बंद करण्याचा आदेश काढण्यासाठी केंद्र शासनाला दि.२९.०६.२०१५ प्रस्ताव सादर केला आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, राष्ट्रीय महामार्गावरील पेण खारपाडा येथील पाताळगंगा नदीवरील बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या खारपाडा पुलाचा एकूण खर्च 33.33 कोटी एवढा असून आतापर्यंत टोल वसुली मात्र 120 कोटी रुपयांपर्यंत झाली आहे. या टोलची मुदत दिनांक 27 ऑगस्ट, 2015 पर्यंत आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, "या तारखेपासून टोल बंद करण्याचा आदेश काढण्यासाठी केंद्र शासनाला दिनांक 29/06/2015 रोजी प्रस्ताव सादर केला आहे."

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 28 ऑगस्ट, 2015 पासून हा टोल बंद होईल का ?

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7214......

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, होय. टोल बंद होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मागील शासनाने खर्चापेक्षा दुप्पट वसुली झाल्यानंतर तातडीने टोल बंद करण्यात येईल, अशा प्रकारचे टोलचे धोरण जाहीर केले आहे. खारपाडा पुलावरील टोलच्या बाबतीत मात्र खर्चापेक्षा चारपट वसुली आतापर्यंत झाली आहे. या बाबीचा गांभीर्याने विचार करुन राज्य शासन तातडीने टोल बंद करणार आहे का ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की, दिनांक 28 ऑगस्ट, 2015 रोजी हा टोल बंद होणार आहे. या कामामध्ये रेल्वे पुलाचे काम, डक्ट, जोडरस्ता नूतनीकरण व बांधणी, कर्ज व त्यावरील व्याज या सर्व बाबींचा समावेश असून हे एकूण 198.68 कोटी रुपयांचे काम आहे.

--------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत.**

**(4) *७०३२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडितत : तारांकित प्रश्न क्रमांक २६६७ ला दिनांक २० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) धनगर समाजास आरक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(2) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(3) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यासंदर्भात कोणत्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे ?

**श्री. विष्णु सावरा :** (१) नाही,

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) धनगर जातीचा मे, १९९० पूर्वी इतर मागासवर्गीयांच्या यादीत समावेश होता. मे, १९९० पासून भटक्या जमाती "क" मध्ये धनगर जातीचा तिच्या उप/तत्सम जातीसह समावेश करुन ३.५% इतके आरक्षणाचा लाभ शासकीय नोकरी, शैक्षणिक संस्थेमधील प्रवेश यासाठी अनुज्ञेय करण्यात आला आहे. तसेच या जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, वसतीगृहाच्या सवलती इ. लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले आहेत.

मात्र धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) आरक्षणास बाधा न पोहोचता आरक्षण देण्यासंदर्भात सर्व बाबी तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.

.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, या राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष माननीय श्री.शरद पवार यांना केंद्रीय आदिवासी विकास मंत्री श्री.जोएल ओराम यांनी पत्र पाठविले असून "धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव पाठवावा, असे केंद्र सरकारने कळवून सुध्दा अद्याप राज्य शासनाने प्रस्ताव पाठविलेला नाही", असे कळविले आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032........

श्री.शरद रणपिसे........

सभापती महोदय, आमचे सरकार आल्यानंतर 15 दिवसात धनगर समाजाला आरक्षण देऊ, असे सांगणाऱ्या या सरकारने अद्याप केंद्र सरकारकडे प्रस्ताव देखील पाठविलेला नाही. माझा प्रश्न असा आहे की, राज्याचे ॲडव्होकेट जनरल आणि विधी व न्याय विभागाने केरळमधील एक समाज विरूध्द केरळ सरकार या खटल्याच्या निर्णयाचा आणि घटनेच्या कलम 342 (2) चा आधार घेऊन हे आरक्षण द्यावे, अशी शिफारस केली असताना सुध्दा राज्य सरकारने हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे न पाठविण्याचे कारण काय आहे ?

श्री.विष्णु सावरा : सभापती महोदय, यापूर्वीही या प्रश्नावर या सभागृहात चर्चा झाली आहे. त्यावेळी या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी या प्रश्नावर रान उठविले होते. त्यावेळी मंत्री महोदयांनी टी.व्ही.वर मुलाखत देताना सांगितले की, धनगर समाजाला आरक्षण देता येणार नाही. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर सन्माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णु सावरा यांनी देऊ नये, असे माझे म्हणणे आहे. सामायिक जबाबदारीतून अन्य मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे. श्री.सावरा साहेबांना या प्रश्नाचे उत्तर कसे देता येईल ?

**सभापती :** मंत्री महोदयांना उत्तर देऊ द्यावे. त्याबाबत आपण नंतर बोलू. त्यांचे उत्तर अगोदर ऐकून घ्यावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनात याच सभागृहात आदिवासी विकास मंत्री महोदयांनी असे स्पष्ट सांगितले होते की, धनगर समाजाला अनुसूचित जमातींच्या सवलती देता येणार नाहीत. हे उत्तर प्रोसिडिंगवर आहे. तसेच, आदिवासी विकास मंत्री महोदयांनी टी.व्ही.वरील मुलाखतीत धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती देता येणार नाहीत, असेही सांगितले आहे. धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत केंद्र सरकारकडे पाठवायचा

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

प्रस्ताव देखील राज्य शासनाने पाठविलेला नाही, असे स्पष्टपणे केंद्रीय आदिवासी विकास मंत्री महोदयांनी कळविले असताना या सरकारला धनगर समाजाला आरक्षण द्यावयाचेच नाही, हे स्पष्ट होते. मंत्री महोदयांनी याबाबतचे उत्तर द्यावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती :** हे बरोबर नाही. मंत्री महोदयांनी सभागृहाबाहेर काही मत व्यक्त केले असले तरी आता ते मंत्री म्हणून सभागृहात उपस्थित आहेत. सभागृहात ते त्यांचे वैयक्तिक मत सांगत नाही तर शासन म्हणून काय करणार आहोत, हे सांगत आहेत.

या संदर्भात स्पेसिफिक प्रश्न एवढाच आहे की, धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्य शासन केंद्र सरकारला शिफारस करणार आहे का ?

श्री.विष्णु सावरा : सभापती महोदय, कोणत्याही जमातीचा किंवा जातीचा अनुसूचित जमातीमध्ये म्हणजेच आदिवासी जातीमध्ये समावेश करावयाचा असेल तर त्यासाठी काही कार्यपध्दती, घटनात्मक कार्यपध्दती ठरवून दिलेली आहे. ती पार पाडल्याशिवाय आपल्याला निर्णय घेता येणार नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती :** कृपया सन्माननीय सदस्यांनी मला मंत्री महोदयांचे उत्तर ऐकू द्यावे.

श्री.विष्णु सावरा : सभापती महोदय, मला माझे बोलणे पूर्ण करु द्यावे. मी पुन्हा सांगतो की, कोणत्याही जमातीला आदिवासी म्हणजेच अनुसूचित जमातीमध्ये प्रवेश घ्यावयाचा असेल किंवा त्यांचा समावेश करावयाचा असेल तर विहित पध्दत आहे. एखाद्या जमातीने आम्हाला आदिवासींमध्ये घालावे, अनुसूचित जमातीमध्ये घालावे, असा अर्ज केला किंवा तशी मागणी केली तर त्यासाठी शासनाची काही पध्दत आहे. केवळ राजकीय हेतूने ते ठरविता येणार नाही. त्यासाठी विशिष्ट पध्दती आहे व त्यास घटनात्मक दर्जा दिलेला आहे. अशा प्रकारची मागणी आल्यानंतर आदिवासी विकास विभागाच्या आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडे मागणी तपासण्यासाठी पाठवावी लागते व त्यांचा अहवाल घ्यावा लागतो.

यानंतर श्री.बोरले.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032........

श्री.विष्णू सवरा............

(...अडथळा....) आपल्या प्रश्नाचेही उत्तर मी देतो. त्यामध्येच माझे उत्तर आलेले आहे. अशा प्रकारे तो आदिवसी प्रशिक्षण संशोधन संस्थेकडे पाठवावा लगतो. या संस्थेचा अनुकूल अहवाल आला तर ते प्रकरण मुख्य सचिवांकडे पाठवावे लागते. त्यानंतर आदिवासी विकास विभागाचे मंत्री.....

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आम्हाला ही संपूर्ण प्रोसिजर माहीत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेब, आपण मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घेऊ.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले त्या अनुषंगानेच मी उत्तर देत आहे.

**सभापती** : मंत्री महोदय, आपण उत्तर द्यावे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाचे मंत्री आणि त्यांची जी समिती आहे, त्यांच्या समोर ते प्रकरण येते. त्यानंतर हा अहवाल अनुसूचित जमाती सल्लागार परिषदेसमोर ठरावाच्या स्पाने येतो. ही प्रोसिजर आहे, ही पद्धती आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, आणि त्यानंतर.....

**सभापती** : मंत्री महोदय, एक मिनीट, सन्माननीय सदस्य श्री.रामराव वडकुते साहेब आपण बोलावे.

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय,....

श्री.जयंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032........

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी याच प्रश्नाला नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात उत्तर दिले होते. त्यानंतर त्यांनी मार्च महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देखील हेच उत्तर दिले. आज आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांनी एक बाब स्पष्ट केली की, राजकीय विचार मांडून धनगरांना आरक्षण देता येणार नाही. (...अडथळा...) असे ते म्हणाले.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हे रेकॉर्डवर आहे. माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी बारामती येथे जाऊन धनगर समाजाचे उपोषण सोडताना सांगितले होते की, आता आपण उपोषण सोडावे. आमचे सरकार सत्तेवर येईल त्यावेळी पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आरक्षणाच्या बाबतीत निर्णय घेतला जाईल. हे राजकीय भाषण माननीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी केले होते.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.सुनील तटकरे : तुम्ही काहीही बोलू नका. सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेबांनी जो प्रश्न विचारला तो अत्यंत योग्य आहे. केंद्रीय आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांनी देशाचे नेते माननीय श्री.शरद पवार साहेबांना दिलेल्या लेखी उत्तरात राज्य शासनाने हा प्रस्ताव अजूनही पाठविलेला नाही, असे म्हटले आहे. मग या संदर्भात ॲडव्होकेट जनरल आणि विधी विभागाने नेमकी शिफारस काय केलेली आहे ? कारण, ही शिफारस गोपनीय आहे, असे हे म्हणतात. आरटीआयच्या कायद्यामध्ये ती गोपनीयता नाही. त्यामुळे या संदर्भातील हा प्रश्न महत्वाचा आहे. राजकीय भाषण करुन हे लोक सत्तेवर आलेले आहेत. धनगर समाजाला आरक्षण दिले गेले पाहिजे.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032........

**सभापती** : तुम्ही मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घेणार नसाल तर प्रश्नाला न्याय मिळणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी पॉईंट ऑफ ऑर्डरच्या माध्यमातून स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. मंत्री महोदय, आपण उत्तर द्यावे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, मी याबाबतची कार्यपद्धती सांगत होतो. कोणत्याही जमातीचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी जे निकष आहेत, जी पद्धती आहे ती मी सांगत आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, त्याचा काही संबंध नाही. आपणच नियम ठरविले आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर बसावे. माननीय विरोधी पक्षनेते आपण आपापसात बोलू नये. आपण सभागृहाचा डेकोरम ठेवावा. आपण सभागृहात आहात, सभागृहाच्या बाहेर नाही. सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर साहेब आपण बोलावे.

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, खरी वस्तुस्थिती बाजूला ठेऊन चर्चा दुसरीकडे चालली आहे. मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावा, ही मागणी धनगर समाजाची नाही. धनगर समाजाचा समावेश ऑलरेडी केलेला आहे. (...अडथळा...) रामभाऊ आपण मंत्री आहात, आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. आपण धनगर आहात, आपण उलटे बोलू नका, चेष्टा करु नका, आपण ऐकून घ्यावे. हा प्रश्न आमच्या जिव्हाळ्याचा आहे. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. आपण मंत्री आहात. आपण ऐकून घेतले पाहिजे, आपण चेष्टा करीत आहात. भारतीय जनता पार्टीचे लोक चेष्टा करतात. तुम्ही चेष्टा करु नका.

**सभापती** : आपण ऐकमेकांवर आरोप करु नयेत. सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर साहेब, आपण माझ्याकडे बघून बोलावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032........

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, या प्रश्नावर चेष्टा केली जाते. आम्ही चेष्टा कधीही सहन करणार नाही. आपण समजून घ्यावे. मंत्री महोदय जे उत्तर देत आहेत ते पूर्ण चुकीचे आहे. माझ्याकडे भारत सरकारच्या जनजाती मंत्रालयाची यादी आहे. प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्यात ही यादी प्रसिद्ध होते. त्या अनुसूचित प्रत्येक वर्षी 36 नंबरवर ओरॉन आणि धनगर समाजाचे नाव समाविष्ट आहे. आरक्षण भारत सरकार देते. पण घटनेच्या शेड्यूल दोनमध्ये ही यादी असल्यामुळे त्या यादीच्या खाली लिहिलेले आहे की, या यादीमध्ये ज्यांची नावे आहेत, तो समाज ज्या राज्यात राहतो त्या राज्य सरकारने त्या समाजाला त्या कॅटॅगरीच्या सवलती दिल्या पाहिजे, अशी शिफारस केली पाहिजे. एवढाच मुद्दा शिल्लक आहे आणि हे जाणूनबुजून समावेश करायचा काय, कमिटी नेमायची काय ? त्या समाजाला 65 वर्षे केवळ चुकीच्या पद्धतीने ट्रिटमेंट करुन आरक्षण दिलेले नाही. यामध्ये नवीन समावेश करण्याची गरज नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे, या यादीमध्ये जेवढी नावे आहेत त्यापैकी धनगर सोडून सर्वांची शिफारस या शासनाने केलेली आहे. त्यांना सवलती मिळालेल्या आहेत. फक्त धनगर समाजाला वगळण्यात आले आहे. धनगर समाजाची मागणी आहे की, आम्हाला अनुसूचित आरक्षण....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर साहेब, आपण प्रश्न विचारावा.

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, फक्त त्यांच्या सवलती लागू करा आणि केंद्र शासनाला तशी शिफारस करा, अशी त्यांची मागणी आहे. धनगर समाज नवीन आरक्षण मागत आहेत, त्यांचा नव्याने समावेश करावयाचा आहे, असा जो अर्थ काढला जातो तो पूर्णपणे चुकीचा आहे. हा धनगर समाजावर अन्याय आहे आणि घटना आज लिहिलेली नाही. भारत सरकारने घटनेमध्ये जी अनुसूची दिलेली आहे त्यातील सर्वांना अनुसूचित जमातीच्या सवलती लागू केलेल्या आहेत. त्यामध्ये 36 क्रमांकावर धनगर समाजाचे नाव आहे. आपण घटनेप्रमाणे त्यांना अनुसूचित जमातीच्या सवलती देणार काय आणि तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविणार आहात काय ? कारण, यांना अधिकार नाहीत, हे अधिकार केंद्र शासनाला आहेत. राज्य शासनाने फक्त शिफारस करावयाची आहे. राज्य शासनाने शिफारस केल्यानंतर केंद्र शासन धनगर समाजाला आरक्षण देणार आहे.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032........

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, मी तेच सांगत होतो. राज्य शासनाने शिफारस केव्हा करावयाची, तर त्यासाठी जी पद्धती आहे, ती पद्धती पूर्ण झाल्याशिवाय नाही. आदिवासी प्रशिक्षण संशोधन संस्थेचा अभिप्राय आल्यानंतर कार्यवाही सुरु होते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामराव वडकुते साहेब, आपण बोला.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, माझे म्हणणे ऐकूनच घेतले जात नाही.

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, मला मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, त्यांनी दिशाभूल करु नये. जर एखाद्या समाजाचा समावेश करावयाचा असेल तर ही प्रोसिजर आहे. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर साहेबांनी समावेशाच्या संदर्भातील आमचे म्हणणे ऑलरेडी सांगितले आहे. घटनेत सन 1956 मध्ये आदिवासींच्या ज्या 47 जाती दिलेल्या आहेत त्यामध्ये क्रमांक 36 वर धनगर जातीचा उल्लेख आहे. महाराष्ट्रात कोठेही धनगड नाही. तेथे इंग्रजी भाषेप्रमाणे चुकीचा झालेला शब्द दुरुस्त करण्यासाठी राज्य शासन शिफारस करणार आहे की नाही, हा खरा मुद्दा आहे. यामध्ये बाकी काहीही नाही. महाराष्ट्र शासन शिफारस करणार आहे की नाही ? कारण, बारामती येथील मेळाव्यात त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, अशा प्रकारची शिफारस 15 दिवसात केली जाईल.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032....

श्री.रामराव वडकुते...

आज मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, बिहार राज्य सरकारने 15 दिवसापूर्वी 'धनगर आणि धनगड' एकच आहे अशा प्रकारची शिफारस केंद्र सरकारकडे केली आहे. त्या संदर्भातील प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात झाली आहे. तशाच प्रकारची शिफारस महाराष्ट्र शासन करणार आहे किंवा नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. मंत्री महोदय चुकीच्या पध्दतीने अशी प्रोसिजर आहे, तशी प्रोसिजर असल्याचे सांगत आहेत, मंत्री महोदय सांगत आहेत तशी प्रोसिजर नाही. आदिवासी समाजात धनगर समाजाला समाविष्ट करण्याचा विषय नाही. फक्त आदिवासी विकास विभागाकडून केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात येणार आहे किंवा नाही याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.....(गोंधळ)....

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे, आपण खाली बसून सभागृह चालवू नका. या प्रश्नाबाबत मला चांगली जाण आहे, याची आपणाला माहिती आहे. मंत्री महोदय, माझ्या दृष्टीने खरा प्रश्न असा आहे की, धनगर समाजाचे तीन ते चार लोकप्रतिनिधी या सभागृहात आहेत. प्रश्नोत्तराचा तास संपला असला तरी सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांना बोलावयाचे असेल तर थोडा वेळ वाढवून घेता येईल. मूळ प्रश्नाच्या आपण थोडे बाजूला जात आहोत, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी केंद्रीय मंत्री महोदयांच्या पत्राबाबत सांगितले की, राज्य सरकारने शिफारस करायची आहे. मागील अधिवेशनात माझ्या माहितीप्रमाणे सरकारकडून असे उत्तर देण्यात आले होते की, याबाबत ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागविण्यात येईल, किंवा त्यांचा सल्ला घेण्यात येईल. मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, या प्रश्नांबाबतची प्रोसिजर केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे. ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घ्यावयाचा असेल तर तो केंव्हा घेण्यात येणार आहे ? याबाबत मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर द्यावे. सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना प्रोसिजर माहीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर यांनी प्रश्न विचारावा.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय जिव्हाळ्याचा आणि अत्यंत महत्वाचा आहे. धनगर समाजाचा समावेश संपूर्ण भारतात आदिवासीमध्ये करण्यात आलेला आहे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032....

श्री.महादेव जानकर...

परंतु दुर्दैव असे आहे की, या राज्यातील तत्कालीन सर्वच मुख्यमंत्री महोदयांनी केंद्र शासनाकडे शिफारस केलेली नाही. याबाबत मला खेद वाटतो.....(गोंधळ)..... सभापती महोदय, या सरकारची केंद्र शासनाकडे शिफारस करण्याची तयारी आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस या समाजाला न्याय देण्यासाठी सक्षम आहेत. ज्या दिवशी हे सरकार या समाजाला न्याय देणार नाही त्या दिवशी मी या सरकारमध्ये राहणार नाही असे देखील मी आज सभागृहाला सांगू इच्छितो. मला राजकारण करावयाचे नाही. या प्रश्नाला मंत्री महोदयांनी देखील गोलमाल उत्तर दिले आहे. ते उत्तर व्यवस्थित नव्हते, ऑलरेडी हा समाज एसटीमध्ये आहे. त्यामुळे नव्याने शिफारस करा असे आम्ही सांगत नाही. परंतु या समाजात बाबासाहेबांची फिलॉसॉफी घेऊन चालणारा नेता पैदा झालेला नाही ही मोठी शोकांतिका या समाजाची झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून हा समाज आरक्षणाची वाट पाहत आहे. माझी आपणाला विनंती आहे की, माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी व माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी या विषयाबाबत माझी चर्चा झाली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, केंद्र सरकारकडे शिफारस करण्यास थोडा वेळ लागेल, परंतु आदिवासी लोकांवर अन्याय न होता या समाजाला एसटीची सवलत मिळेल. या प्रश्नांला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे, हा प्रश्न मी राखून ठेवतो. या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्री उत्तर देतील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी असे सांगितले की, मागील कोणत्याही मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत विचार केला नाही. सन 1989 मध्ये माननीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री असताना....(अडथळा)... जरा ऐकून घ्या, तुमच्या पेक्षा जास्त माहिती आहे मला प्रा.राम शिंदे, आपण गप्प बसा, कोणाची शिफारस आहे ते मला माहिती आहे. ही शिफारस कोणी मागे घेतली याची देखील माहिती आम्हाला आहे. अजून बोलू नका, आपणाला बोलायला वेळ मिळेल तेव्हा आपण जरूर बोला, आता नका मध्ये बोलू, तुम्ही मंत्री आहात याद राखा ? मंत्री आहात याद राखा ? तुम्ही मध्ये बोलू नका. तुम्हाला बोलता येणार नाही.....(गोंधळ)....

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032....

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलतात)

**सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आपण बोला. दोन्ही बाजूच्या इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. कृपया सर्व सन्मानीय सदस्यांनी शांतता पाळा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, श्री. राम शिंदे यांना बोलत असताना मी जे वाक्य बोललो ते खाली बसून जे कॉमेंट्स करीत होते, यासंदर्भात माझे ते वाक्य होते. कारण मी पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलण्यासाठी उभा आहे.....(गोंधळ)......

**सभापती** : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मी आपणाला बोलण्यास संधी देतो. मंत्री महोदय, श्री.चंद्रकांत पाटील आपणाला बोलण्यास मी संधी देतो, आपण खाली बसा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मघा पासून प्रश्नोत्तराच्या तासामध्ये एखाद्या विभागाचे मंत्री महोदय बोलत असताना राज्य मंत्री मंडळातील इतर सदस्य हे खाली बसून कॉमेंट्स करीत असतात. सन्माननीय मंत्री श्री.राम शिंदे यांना बोलत असताना ते खाली बसून कॉमेंट्स करीत होते, त्यासंदर्भात मी 'याद राखा' असे बोललो आहे. दुसरे काहीही नाही, त्याच्या उपर माझा हा शब्द त्यांना लागला असेल तर तो शब्द मी मागे घेतो. पण तुम्ही देखील खाली बसून बोलायचे टाळले पाहिजे, अशी मी तुम्हाला समज देतो हे देखील तेवढेच महत्वाचे आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेब मी त्यांना समज देणार आहे.

श्री.सुनील तटकरे : तुम्ही ज्या पध्दतीने बोलत आहात किंवा इतर खात्याचे मंत्री असतील, महिला व बाल कल्याण खात्याच्या मंत्री असतील, आणखी कोणी मंत्री महोदय असतील...(गोंधळ)...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी त्यांचे शब्द मागे घेतले आहे, आपण कोणीही खाली बसून आता बोलू नका. खाली बसून मंत्री महोदय किंवा अन्य कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी बोलू नये. दोन्ही बाजूकडून हा प्रकार घडतो तो विधानपरिषदेला शोभा देणारा नाही. मंत्री महोदय व आमदार देखील खाली बसून बोलत असतात हा अतिशय चुकीचा

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7032....

**सभापती...**

प्रकार आहे. हा प्रश्न राखून ठेवण्याचा मी निर्णय दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे ज्या वेळी हा प्रश्न सभागृहात येईल तेव्हा मुख्यमंत्री महोदय या प्रश्नाला उत्तर देतील.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये दिलेली सूचना**

**सभापती** : आज दिनांक 20 जुलै, 2015 रोजी नियम 289 अन्वये माझ्याकडे सूचना प्राप्त झाल्या आहेत. श्री.संजय दत्त, श्री.धनंजय मुंडे, श्री.शरद रणपिसे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुनील तटकरे, श्री.जयंत पाटील, श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी "मुंबई-पुणे एक्सप्रेस मार्गावर दिनांक 19 जुलै, 2015 रोजी खंडाळा-बोरघाटमधील आडोशी बोगद्याजवळ टाटा इंडिगो कारवर दरड कोसळून तीन व्यक्तींचा झालेला दुर्दैवी मृत्यू, तर 4 जण जखमी होणे, दरड कोसळल्याने एक्सप्रेस हायवेवर वाहतुकीची प्रचंड कोंडी झाल्यामुळे प्रवाशांचे हाल होणे, पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेवर नेहमीच दरड कोसळत असल्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या लोकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, या घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता " याबाबत सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुंबई-पुणे एक्सप्रेस मार्गावर आडोशी बोगद्याजवळ दरड कोसळून दुर्दैवी घटना झाली आहे. एका महिन्यात दुसऱ्यांदा अशी घटना झालेली आहे. 22 जून रोजी देखील अशी घटना झाली होती. त्यावेळी 24 तास घाटरस्ता बंद होता. मागील काही महिन्यांचा रेकॉर्ड पाहिला तर मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर दरड कोसळून दुर्घटना होण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबत लोकांचे असे म्हणणे आहे की, प्रगतीचा हा महामार्ग दुर्घटनेचा सापळा होत चालला आहे.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त....

सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. या अपघातामुळे काही महत्वाचे मुद्दे उपस्थित झालेले आहेत. काल महाराष्ट्राच्या जनतेने पाहिले की, हा घाटातील रस्ता पूर्णपणे बंद होता,महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद पडली होती. या महामार्गाचे जे कॉन्ट्रॅक्टर आहेत आणि ज्या अधिकाऱ्यावंर या महामार्गावर दक्षता ठेवण्याची जबाबदारी होती त्यांच्याविरूध्द हत्येचा गुन्हा नोंदविण्यात यावा अशी जनतेकडून मागणी केली जात आहे. एखादा भीषण अपघात झाल्यानंतर सभागृहामध्ये त्याबाबत चर्चा केली जाते, परंतु कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही. पावसाळ्यामध्ये दरड कोसळण्याचे प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**सभापती** : या अपघाताच्या अनुषंगाने माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांनी माझ्याकडे निवेदन करण्यासंबंधी पत्र दिले आहे. माननीय सदस्यांनी मुद्देसूद प्रश्न उपस्थित केले तर त्या अनुषंगाने निवेदन करण्यास मदत होऊ शकते. मी स्वत: काल या महामार्गावरील घाटात अडकलो होतो. आडोशी बोगद्याजवळ सन्माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे उभे होते हे मी स्वत: पाहिले आहे. सन्माननीय मंत्री कार्यतप्तर आहेत. माननीय सदस्यांनी मूलभूत प्रश्न उपस्थित केले तर त्या अनुषंगाने उत्तर दिले जाईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या महामार्गावर काही डेंजरस स्पॉट आयडेंटिफाय झालेले असून त्या अनुषंगाने काहीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. लोणावळा येथे ट्रॉमा केअर सेंटर आहे, तेथे फर्स्ट एड बॉक्स आणि ॲम्ब्युलन्सची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. जखमी झालेल्या नागरिकांना 70 कि.मी.अंतरावरील पुणे येथील रूग्णालयात उपचारासाठी न्यावे लागले. या निमित्ताने अशी मागणी केली जात आहे की, लोणावळा येथे सुपर स्पेशालिटी रूग्णालय उभारण्यात यावे. तेथे 24 तास डॉक्टर्स उपलब्ध असावेत. मुंबई-पुणे महामार्गावर एखादी दुर्घटना घडली तर या महामार्गाच्या मध्यवर्ती ठिकाणी रूग्णांना उपचार मिळू शकतील. त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे हे सभागृहाला कळले पाहिजे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेवर आपले म्हणणे मांडताना भाषण करण्याऐवजी माननीय सदस्यांनी प्रस्तावाच्या सूचनेचा विषय नियम 289 अंतर्गत कसा होतो यावरच भाष्य केले पाहिजे. या ठिकाणी वेगळे वळण लागत आहे. आज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 289 अन्वये तीन ते चार प्रस्तावाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. माननीय सदस्यांनी त्यावर थोडक्यात भाष्य करणे अपेक्षित आहे.

...2...



श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडली आहे. मुंबई-पुणे महामार्गावर दरड कोसळून भीषण अपघात झाला. दोन प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले व अनेक जण जखमी झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. हा महामार्ग म्हणजे दुर्घटनांचा सापळा बनलेला आहे. यापुढे एखादा मोठा अपघात होऊन मोठया प्रमाणात जीवितहानी होऊ नये या दृष्टीने आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या घटनेबाबत सभागृहात चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मुंबई-पुणे महामार्गावरील आडोशी बोगद्याजवळ दरड कोसळून अपघात झाला. यापूर्वी सुध्दा दोन तीन वेळा या महामार्गावर दरड कोसळण्याचे प्रकार घडलेले आहेत. नियम 289 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत आज चर्चा घेणे शक्य नसेल तर अल्पकालीन चर्चा मान्य करण्यात यावी अशी माझी विनंती आहे. जेणेकरुन हा महामार्ग वाहतुकीच्या दृष्टीने सुरळीत होण्याकरिता शासन कोणत्या उपाययोजना करीत आहे हे सभागृहाला कळले पाहिजे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, काल मुंबई-पुणे महामार्गावर दरड कोसळण्याचा प्रकार घडला, त्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली होती. आपण स्वत: या वाहतूक कोंडीचा अनुभव घेतला आहे. मी स्वत: अनेक तास या वाहतूक कोंडीमध्ये अडकून पडलो होतो. दरड कोसळल्यामुळे दोन प्रवासी मृत्युमुखी पडले आहेत. पावसाची रिपरिप सुरु असल्यामुळे भविष्यात काय घडू शकेल हे आज कोणीही सांगू शकणार नाही. नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत निर्णय घेण्याचा आपल्याला अधिकार आहे. सभापती महोदय, आज आपल्या दालनात संबंधित मंत्री महोदयांसमवेत बैठक घेऊन या महामार्गाच्या सुरक्षिततेसंबंधी त्वरित उपाययोजना करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आयआरबी कंपनीकडे या महामार्गावर टोल वसुलीची जबाबदारी आहे. राज्यातील इतर ठिकाणची टोल वसुली बंद झाली आहे. या कंपनीच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करणार का आणि या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महामार्गावर सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करणार आहात का? सभापती महोदय, आपल्या अध्यक्षतेखाली संबंधित मंत्री महोदयांसमवेत बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावा.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आपण स्वत: काल प्रवासाच्या निमित्ताने मुंबई-पुणे महामार्गावरील वाहतूक कोंडीमध्ये अडकून पडल्याचे सांगितले. तत्कालीन सभापती स्व.जयंतराव

...3..



श्री.शरद रणपिसे....

टिळक हे देखील मुंबई-पुणे रस्त्यावरील जून्या धाटामध्ये 12 ते 15 तास अडकून पडले होते. त्यानंतर या महामार्गाचे काम हाती घेण्यात आले. काल मंत्री महोदय स्वत: अपघाताच्या ठिकाणी हजर असल्याचे आम्ही दूरदर्शनवर पाहिले. आडोशी बोगद्याच्या अलीकडे दरड कोसळल्याचे दूरदर्शन वाहिन्यांवर दाखविले जात होते. असे सांगण्यात येत होते की, भविष्यात कदाचित बोगद्यामध्ये सुध्दा असा अपधात झाला तर मोठया प्रमाणात जीवितहानी होण्याची शक्यता आहे. माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे त्या सूचनेला मी पाठिंबा देतो. आपण जर ही सूचना मान्य करणार नसाल तर अन्य आयुधाच्या माध्यमातून या सभागृहात या अपधाताच्या अनुषंगाने चर्चा घेण्यात यावी आणि त्या चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो.

श्री.एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री {सार्वजनिक उपक्रम} : सभापती महोदय, सभागृहातील माननीय सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. याचे कारण असे की, मागील एक महिन्यामध्ये दोन वेळा या महामार्गावर दरड कोसळण्याचे प्रकार घडले आहेत. मला जेव्हा ही बातमी कळली त्यावेळी मी नवी मुंबईत होतो. मी दुपारी 12.00 वाजता थेट घटनास्थळी पोहोचलो आणि सुमारे 7 तास मी तेथे उपस्थित होतो. रेस्क्यू ऑपरेशन टीम कार्यरत होती. दगड बाजूला हटविण्याचे काम सुरु होते. ती संपूर्ण यंत्रणा मी तेथे पोहोचण्यापूर्वीच कामाला लागली होती. मोठया प्रमाणात मशिनरी मागविण्यात आली. मुंबईकडे आणि पुण्याकडे प्रत्येकी एक अशा दोन मार्गिकांवरुन वाहतूक सुरु करण्यात आली. त्याचबरोबर लोकांची गैरसोय होऊ नये याचीही दक्षता घेण्यात आली. दुर्दैवाने कालच्या दुर्घटनेमध्ये पुण्याहून मुंबईकडे येणाऱ्या एका कारमधील प्रवासी शशिकांत धामणकर, वय 50 वर्षे आणि मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या कारमधील प्रवासी दिलीपकुमार गोपाळभाई पटेल, वय 55 वर्षे या दोन व्यक्तींचा घटनास्थळी मृत्यू झाला. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

घटनेमध्ये एकूण 6 जण जखमी झाले असून त्यामध्ये श्रीमती सुशीला धामणकर, वय 44 वर्षे; श्रीमती मंगल संभाजी माने, वय 35 वर्षे; श्रीमती निर्मला गुलाबभाई पटेल वय 60 वर्षे; मान दिलीपकुमार पटेल, 4 वर्षे; धर्मिष्ठा दिलीप पटेल, 11 वर्षे; जिनल दिलीप पटेल, वय 18 वर्षे या व्यक्तींचा समावेश आहे.

नंतर आय.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथ शिंदे...

या घटनेतील जखमींवर निगडी येथील रूग्णालयात उपचार सुरू असून मी स्वत: डॉ.जोशी यांच्याशी फोनवर बोललो आणि सगळी माहिती घेतली. जखमींवर तात्काळ उपचार सुरू करण्यात आले असून कुठल्याही प्रकारची कमतरता पडू देऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. मी घटनास्थळी पोहोचल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांशी देखील दूरध्वनीवरून चर्चा केली. मी त्यांना या परिस्थितीचे, दुर्घटनेचे गांभीर्य समजावून सांगितले आहे. तसेच मयत कुटुंबियांच्या वारसांना तात्काळ चार लाख रूपये मदत देण्याचे निदेश देखील दिले. ती कार्यवाही आज झाली आहे. या अपघातातील मृत कुटुंबियांच्या दु:खात शासन सहभागी असल्याची भावना माननीय मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. त्यांना जे जे काही लागेल ते निश्चितपणे मिळेल. जखमींच्या उपचारांची संपूर्ण वैद्यकीय जबाबदारी शासनाने घेतलेली आहे. त्याच बरोबर त्या मार्गावरील पसरलेले दगड एमएसआरडीसी आणि आयआरबी या दोन्ही यंत्रणांमार्फत बाजूला करण्याचे काम सुरू झाले आहे. तेथील वाहतूक जुन्या नॅशनल हायवे क्रमांक 4 मधून वळवली, तर दोन लेन याच मार्गावरून सुरू करण्यात आल्या. आपण देखील तेथून जात होता. त्यावेळी आपली देखील गैरसोय झालेली आहे. प्रवाशांची देखील गैरसोय झाली आहे. त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. सदर वाहतूक तात्काळ सुरू होण्यासाठी जे जे प्रयत्न करावयास पाहिजे होते ते ते प्रयत्न मी केलेले आहेत. यापुढे अशा प्रकारची दुर्घटना होऊ नये म्हणून तेथे अद्ययावत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा आहे असे ठरविण्यात येत आहे. माळशेज घाटात, आंबोली घाटात आणि उत्तराखंड येथे या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. उत्तराखंड येथे दोन कंपन्या काम करीत आहेत. जीओ ब्रुफ आणि आयसोफर या दोन कंपन्या काम करीत आहेत. या कंपनीच्या तांत्रिक टीमला मी बोलाविले आहे. पुण्यातील जीओलॉजिस्ट तज्ज्ञांशी देखील मी बोललो आहे. या दोन्ही टीमने त्याची पाहणी केली आहे. त्यांना मी एवढेपण सांगितले की, हा एवढाच भाग आपल्याला बघावयाचा नाही तरी संपूर्ण मुंबई-पुणे एक्स्प्रेसवर जेवढा म्हणून धोकादायक भाग आहे त्याची पाहणी करून त्यातील एकही दगड भविष्यामध्ये खाली येता कामा नये अशा प्रकारचे तंत्रज्ञान आपण मला सांगावे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथ शिंदे....

या सर्व टीमची आज सायंकाळी 4.00 वाजता मी बैठक बोलाविली आहे. भविष्यामध्ये अशा प्रकारची कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी एमएसआरडीसी आणि राज्य सरकार प्रयत्नशील राहणार आहे. त्यामुळे ज्या सदनाच्या भावना आहेत त्याच माझ्या देखील आहेत. गेल्याच आठवड्यामध्ये मी या सगळ्या कंपन्याना बोलाविले होते. कारण 22 जून रोजी खंडाळा जवळील दरड कोसळली होती. या कंपन्यांनी त्यांचे प्रेझेंटेशन दिले आहे. ते तंत्रज्ञान अतिशय अद्ययावत आहे. भविष्यात अशा प्रकारची कुठलीही दुर्घटना होणार नाही अशा प्रकारची खात्री त्यांनी दिलेली आहे. यामध्ये जे जे काही करता येईल ते ते निश्चितपणे आपण सर्वजण मिळून करू या. आपणा सर्वांच्या भावनांशी मी सहमत आहे. झालेला प्रकार हा अत्यंत दुर्दैवी आहे. रस्ता आता वाहतुकीसाठी खुला झालेला आहे.

**सभापती :** मी आलो म्हणजे रोड सुरूझाला आहे.

श्री.एकनाथ शिंदे : या मार्गावरील अनेक भागांमध्ये दरडी लूज झाल्या आहेत. त्या देखील काढाव्या लागतील अशा प्रकारच्या सूचना मी दिलेल्या आहेत. अशा प्रकारचे पाच-सहा स्पॉट आहेत.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझी माननीय मंत्र्यांच्या उत्तरालाच हरकत आहे. जे मृत पावले आहेत त्यांच्या नातेवाईकांना शासन मदत करणार आहे. त्यालाच माझी हरकत आहे. माझे असे म्हणणे आहे की, आयआरबी या कंत्राटदाराने मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना पैसे दिले पाहिजेत. आज तो कंत्राटदार दिवसेंदिवस करोडो रूपये कमवत आहे. त्यामुळे राज्य शासनाने कुठल्याही प्रकारची जबाबदारी घेऊ नये, राज्य शासनाने स्वतःचे पैसे यावर खर्च करू नये. आज आपल्या राज्यावर कर्जाचा बोजा आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** वरील विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मी सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची संधी दिलेली आहे. परंतु, आज थोडा अपवाद करुन मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. आजच माननीय मंत्री अधिकाऱ्यांकडून प्रेझेंटेशन घेणार आहेत. नवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी जीऑलॉजिस्ट देखील बोलाविले आहेत. यासंबंधी शासन जे काही निकष ठरवेल, जो काही निर्णय घेईल त्याबाबत आपण निवेदन करावे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी सांगितले आहे की, पूर्ण देखभालीची जबाबदारी जर टोल कंत्राटरावर असेल तर त्यांच्याकडून नुकसान भरपाई घ्यावी. त्यांच्यावर तशी जबाबदारी नसेल तर देभखाल करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असल्यामुळे व अशा प्रकारचे अपघात परत परत घडणार असतील तर देखभाल चांगली न झाल्याबद्दल त्यांच्याकडून नुकसान भरपाई घेण्याची व्यवस्था शासनाने करावी.

......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** आज दिनांक 20 जुलै 2015 रोजी श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, वि.प.स.यांनी सकाळी 9.42 वाजाता " मुंबई मिरा रोड पोलिसांच्या एस.के.स्टोन पोलीस चौकीला लागून असलेल्या व्हाईट हाऊस बारवर पोलिसांनी दिनांक 16 जुलै 2015 रोजी रात्रीच्या सुमारास टाकलेल्या धाडीचे वृत्तांकन करण्यास गेलेल्या तीन पत्रकारांवर बारमालकासह सुमारे 20 ते 30 कर्मचाऱ्यांनी केलेला प्राणघातक हल्ला यात दोन जण गंभीर होणे व श्री.दुबे नावाच्या पत्रकाराची हत्या होणे, वाढत्या गुंडागर्दीमुळे पोलिसांचा कोणत्याही प्रकारचा वचक नसल्याने गुंड प्रवृत्तीचे लोक निष्पाप लोकांवर हल्ला करीत असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेले भितीचे व तीव्र असंतोषाचे वातावरण या विषयाबाबत महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. महाराष्ट्र विधान परिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे यासंबंधी नियम 289 आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यास सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याबाबतची सूचना देता येते. यावरून असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसातील कामकाजच्या क्रमातील काम किंवा एखादे विशिष्ट प्रस्ताव सभागृहात असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी क्रमांक 3 सारखा असून सदर विषयावर या दरम्यान चर्चा करता येईल. त्यामुळे मी या सुचनेस अनुमती नाकारीत आहे. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदस्यांना 2-2 मिनिटे थोडक्यात बोलण्याची मी संधी देत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी बोलावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्यातील कायदा व सुव्यवस्था किती खालावली आहे हे या घटनेवरून लक्षात येते. 16 जुलै 2015 रोजी व्हाईट हाऊस या बार वर धाड टाकण्यासाठी पोलीस गेले होते. हा बार पोलीस स्टेशनला लागून आहे. या बार वर धाड टाकली तेव्हा पोलीस हजर होते. पोलिसांनी या बार वर धाड टाकली आहे अशी माहिती 3 पत्रकारांना मिळाली म्हणून ते पत्रकार छायाचित्रण करण्यासाठी तेथे गेले. त्या पत्रकारांवर त्या बारमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी दारूने भरलेले काचेचे ग्लास फेकून मारले, त्यांच्या पाठीमागे लागले.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

पोलिसांनी त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. शेवटी श्री.दुबे नावाव्या एका पत्रकाराचा त्यामध्ये खून झाला. भयंकर अशा प्रकारची घटना राज्यामध्ये घडली. संपूर्ण पोलीस खात्याला काळीमा फासणारी ही घटना आहे. पोलिसांचे धाड सत्र सुरू असताना छायाचित्रण करणाऱ्या पत्रकारांवर हल्ला करून त्यांचा खून करण्यात आला. अशा प्रकारे राज्यात एक भयंकर घटना घडली आहे. पत्रकारांवर हल्ले, आमदारांवर हल्ले करण्यात आले. माननीय आमदार श्री.जितेंद्र आव्हाड हे सांगली येथे कार्यक्रमाला गेले असता त्यांच्या कार्यक्रमामध्ये काही गुंडांनी हल्ला चढविला आहे. त्यांना मारण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे आज राज्यातील कायदा व सुव्यवस्था संपूर्णपणे बिघडलेली आहे. हा अत्यंत गंभीर असा विषय आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

हा विषय गंभीर नसेल तर अजून दुसरा कोणता विषय गंभीर असू शकतो ? ज्या आमदारांवर हल्ले झाले आहेत त्यांना संरक्षण उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती : मी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी नीट ऐकलेला दिसत नाही. याच विषयावर आज एक लक्षवेधी सूचना असून त्यावेळेस या विषयावर आपण बोलू शकता. आपण ज्येष्ठ सदस्य असल्यामुळे मी अपवाद म्हणून आपल्याला बोलण्याची संधी देत आहे. परंतु तरी सुध्दा आपण थोडक्यात बोलावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नियम 289 चा विषय आपल्या लक्षात यावा म्हणून मी या ठिकाणी उभा आहे. मी दिलेल्या 289 च्या प्रस्तावाला अतिशय गांभीर्य असून या राज्यातील कायदा व सुव्यवस्था संपूर्णपणे ढासळली आहे. पत्रकारांवर व आमदारांवर आज जे हल्ले होत आहेत ते हल्ले राज्य सरकारला व गृहविभागाला काळिमा फासणारे आहेत. या घटना आपल्या राज्यात घडलेल्या असल्यामुळे या विषयावर गांभीर्याने चर्चा होण्याची आवश्यकता असून या चर्चेला शासनाकडून उत्तर दिले जावे अशी अपेक्षा मी या निमित्ताने करीत आहे.

---

..2...

**सभापती** :आज दिनांक 20जुलै, 2015 रोजी सर्वश्री जयंत पाटील, विजय सावंत, कपिल पाटील, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रय सावंत, वि.प.स. यांनी आज सकाळी 11.00 वाजता "ठाणे जिल्हयातील भूमिपुत्र रेती व्यावसायिकांच्या समस्या दिवसेंदिवस उग्र बनत चालल्या असून गंभीर वळणावर असणे, महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री व राज्याचे मुख्यमंत्री यांचे स्थगिती आदेश असूनही जिल्हा प्रशासनाने आणीबाणी सदृश्य परिस्थिती निर्माण केली असणे, गेल्या 8 महिन्यापासून रेतीचे परमिट(रॉयल्टी) जिल्हा कार्यालयाकडून दिले जात नसणे, त्यामुळे व्यावसायिकांची आर्थिक स्थिती डबघाईस आलेली असणे. गेली काही वर्षे मेरीटाईम बोर्ड व महाराष्ट्र शासन प्लॉट भाडे घेत नाही, त्यांनी त्वरित भाडे घ्यावे असे जिल्हाधिकाऱ्याकडून रेती परमिट मिळण्यासाठी वेळोवेळी पत्र व्यवहार केलेला असणे, पत्रव्यवहार करुनही परमिट न मिळाल्यामुळे व्यावसायिकांचे भवितव्य अधांतरीत असणे,त्यामुळे ठाणे जिल्हयातील भिवंडी तालुक्यातील रेती व्यावसायिकांनी व त्यावर अवलंबून असणारे कामगारांनी सांघिकपणे मुंब्रा, रेतीबंदर येथे दिनांक 20 जुलै, 2015 रोजी रास्तारोको करण्याचा घेतलेला निर्णय" या विषयाबाबतीत महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे,त्यासंदर्भातील विषय हा नियम 289 चा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याबाबतीत सूचना देता येईल. यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशेष प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट नाही. तथापि विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मी या विषयावर सदस्यांना बोलण्यासाठी दोन मिनिटांचा वेळ देत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी या विषयावर विचार व्यक्त करावेत व त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी विचार व्यक्त करावेत.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रेती उत्खननाबाबत माझा आग्रह नाही. परंतु या ठिकाणची जी जागा आहे ती गेली 150-200 वर्षापासून येथील आग्री आणि कोळी समाजाकडे आहे. या ठिकाणी मॅरेथॉन बिल्डर मोठा कॉम्लेक्स बांधत असून या ठिकाणी गार्डन किंवा पर्यटनाच्या दृष्टीने ही जागा पाहिजे असे ठाणऽ जिल्हाधिकारी सांगत आहेत. यासंदर्भात माझी मागणी अशी आहे की, या ठिकाणच्या जागेचा ताबा तथील शेतकरी व कोळी वसाहतीच्या लोकांकडे कायम राहिला पाहिजे व त्यांना पर्यटनाच्या दृष्टीने ज्या काही सुविधा असतील त्या उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. मी नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव तातडीने एवढयासाठी उपस्थित केला आहे की, आज या ठिकाणचे 8 ते 10 हजार व्यावसायिक आणि शेतकरी मुंब्रा हायवेवर सन्माननीय श्री. दशरथ पाटील यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करीत आहेत. या विषयाच्या संदर्भात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होण्याची शक्यता आहे. आज आपण या विषयावरील चर्चा नाकारली आहे. परंतु अन्य मार्गाने किंवा नियम 97 अन्वये एक तासाची तरी चर्चा आपण घडवून आणावी ही विनंती आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ नेते सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी या विषयाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले आहेत. या ठिकाणच्या लोकांनी मुंब्रा हायवेवर रास्ता रोको आंदोलन सुरु केले असून या आंदोलकांना शासनाने अटक केली आहे. आपल्या देशाचे सीआरझेडचे कायदे तयार होण्याच्या अगोदरपासून ही जागा येथील आग्री व कोळी लोकांचे पोट भरण्यासाठी शासनाने त्यांना दिली होती. ज्या लोकांचे या जागेवर पोट चालते त्या लोकांच्या संदर्भात आम्ही येथे बोलत आहोत. आम्ही या ठिकाणी वाळू माफीयांच्या संदर्भात बोलत नाही. परंपरागत डुबीची रेती काढण्यासाठी सरकारनेच हे प्लॉट ॲलोकेट केलेले आहेत. त्या ठिकाणी आज जे काही सुशोभिकरण होत आहे त्याला आमचा विरोध नाही. परंतु त्या सुशोभिकरणाच्या मागे नेमके काय आहे ? मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या ठिकाणी जवळ जवळ 150 ते 200 एकर जागेवर मॅरेथॉन व्यावसायिक बांधकाम करीत असून त्या जागेसमोर चौपाटी बनवण्याचे त्याने काम सुरु केले आहे असा माझा या बाबतीत आरोप आहे. ही बाब फार गंभीर आहे. या ठिकाणी ज्यांचा उदरनिर्वाह चालतो, पोटं चालतात त्यांच्यासाठी शासनाने

श्री. भाई जगताप...

रेती उत्खननासाठी जागा दिलेली आहे. असे असताना त्यांच्यावर आज अन्याय केला जात असून त्या ठिकाणी सुशोभिकरणाचा घाट घातला जात आहे. हा विषय गंभीर आहे. या विषयाची तातडी नसली तरी सन्माननीय सदस्यांनी सूचवल्याप्रमाणे या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. या घटनेमागे नेमके कोण आहे हे शोधण्याची गरज असून त्यासंदर्भातील माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक असल्यामुळे या विषयावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

**सभापती :** या ठिकाणी ज्येष्ठ मंत्री श्री. चंद्रकात पाटील उपस्थित आहेत. एकंदरित रेती आणि वाळू विषयी कोणत्या ना कोणत्या माध्यमातून सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील तसेच सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी या विषयाच्या संदर्भात जे विचार मांडले आहेत त्यासंदर्भात मंत्री महोदयांच्या माध्यमातून चर्चा घडवून आणावी असे मी निदेश देत आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : रेतीचे नियमन करण्यासंदर्भात खालच्या सभागृहात एक विधेयक संमत झाले आहे. हे विधेयक जेव्हा आपल्या सभागृहात संमतीसाठी येईल तेव्हा यावर स्वाभाविकपणे चर्चा होईल. परंतु यावर आपल्याला वेगळी चर्चा हवी असेल तर ती घेतली जाईल.

**सभापती** : आता माननीय विरोधी पक्ष नेते वैयक्तिक निवेदन करतील.

-------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** जगमित्र शुगर मिल्स या खाजगी साखर कारखान्यासाठी जमिनीच्या प्रकरणावरुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक यासंबंधी श्री.धनंजय मुंडे यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

**मु.शी.:** जगमित्र शुगर मिल्स या खाजगी साखर कारखान्यासाठी जमिनीच्या प्रकरणावरुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक यासंबंधी श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण करु इच्छितो.

महोदय,

मागील दोन दिवसांपासून काही वृत्त वाहिन्या, वृत्तपत्र आणि सोशल मीडियाद्वारे माझ्याबद्दल चुकीच्या बातम्या प्रसारित होत आहेत. यात जगमित्र शुगर मिल्स या खाजगी साखर कारखान्यासाठी जमिनीच्या प्रकरणावरुन मी शेतकऱ्यांची फसवणूक केली, त्यांना खोटे चेक दिले, नोकऱ्या दिल्या नाहीत अशा पध्दतीचे आरोप माझ्यावर केले जात आहेत.

वस्तुतः अंबाजोगाई तालुक्यातील मौजे पुस येथे जगमित्र शुगर मिल्स उभारणी करण्याचा निर्णय सन 2011 मध्ये घेतला होता. त्यास केंद्र व राज्य शासनाच्या नियमानुसार मान्यता घेण्यात आली. कारखान्यासाठी अनेकांकडून नियमानुसार सन 2012 मध्ये जमीन खरेदीचे व्यवहार करण्यात आले, जमीन विक्रेत्यांना त्यांच्या जमिनीचे पैसे देण्यात आले आहेत, कारखान्यासाठी खरेदी केलेल्या जमिनी ह्या नोंदणीकृत खरेदीखताअधारे घेण्यात आलेल्या आहेत. यासाठी आवश्यकती स्टँप ड्यूटी (मुद्रांक शुल्क) शासनास भरणा केलेला आहे. खरीदीनंतर आवश्यक ते फेरफार नोंदी महसूल विभागाने घेतलेल्या आहेत. फेरफार करताना व त्यानंतर आजतागायत गेल्या तीन वर्षापासून ज्यांनी जमीन दिली त्यांच्यापैकी कोणीही तक्रार दिलेली नव्हती.

मागील चार वर्षापासूनचा सततचा दुष्काळ, ऊसाची न होणारी उपलब्धता आणि साखरेचे घसरलेले भाव या पार्श्वभूमीवर कारखाना उभारुन गाळप केले असते तर कारखाना प्रचंड तोटयात गेला असता त्यामुळे जगमित्र शुगर मिल्सच्या उभारण्यीचा निर्णय लांबणीवर टाकण्यात आलेला आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे ......

जगमित्र शुगर मिल्सच्या संचालक मंडळातून मी मार्च 2015 मध्ये राजीनामा देऊन बाहेर पडलो आहे. या शुगर मिल्सशी सध्या माझा कसलाही संबंध नाही. असे असताना हेतुपुरस्सर माझ्यावर काही जणांच्या पाठिंब्यातून आणि राजकीय द्वेषापोटी शेतकऱ्यांना पुढे करुन खोटे आरोप केले जात आहेत. कारखान्याची मान्यता, जमीन खरेदीबाबतचे कागदपत्रे व मी संचालक मंडळात नसल्याबाबतचे सर्व कागदपत्रे उपलब्ध असून ते सर्वांना पाहण्यासाठी खुले आहेत. माझ्यावर होत असलेल्या या आरोपांमुळे जनतेच्या मनात विविध शंका उपस्थित होऊ लागल्याने मी स्वतःहून हा खुलासा करीत असून या प्रकरणी तक्रारी होत असलेल्या सर्व प्रकरणांची शासनाने कोणत्याही प्रकारची चौकशी करावी अशी मागणी मी स्वतःच करीत आहे व या चौकशीला सामोरे जाण्यास आणि संपूर्ण सहकार्य करण्यास मी कधीही तयार आहे.

आपला विश्वासू

(धनंजय मुंडे)

----

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यामध्ये नवीन नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे कार्यक्रम हाती घेणे

**मु.शी.:** राज्यामध्ये नवीन नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे कार्यक्रम हाती घेणे यासंबंधी माननीय ऊर्जा मंत्र्यांचे निवेदन

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहात वायफाय इंटरनेट सुविधा उपलब्ध असल्याबाबत**

**सभापती** : अधिवेशनासंबंधी कागदपत्रे, वृत्तपत्रीय कात्रणे तसेच ई-मेल इत्यादी सुविधांचा वापर करण्याकरिता सभागृहात वायफाय सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांकडून विचारणा होत होती. मी स्वतः देखील तसे जाहीर केले होते. आपणास आधुनिकीकरणाकडे जायचे आहे. दिनांक 16 जुलै, 2015 रोजी म्हणजे मागील तीन-चार दिवसांपूर्वीच वायफाय इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

आज सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितले की, इंटरनेट सुविधा सुरु नाही. ती सुरु न होण्यामध्ये काही तांत्रिक बाबी असतील, परंतु या सुविधा सुरु झालेल्या आहेत. लाईव्ह चॅनेल देखील सुरु झालेले आहे.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**सभागृहाच्या कामकाजाबाबत**</u>

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री दुपारी 4.00 वाजता निवेदन करणार आहेत, घोषणा करणार आहेत. आता दुपारचे पावणेतीन वाजले आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या विषयावर अजून 12 सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण कामकाजपत्रिकेवरील कामकाज स्थगित करुन शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या विषयावर चर्चा सुरु करावी. माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर राहिलेले कामकाज पूर्ण करावे.

**सभापती** : आता आपण औचित्याचे मुद्दे घेऊ. ते कामकाज संपल्यानंतर निर्णय घेऊ.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"दिनांक 19 जुलै, 2015 रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आलेल्या शिवसन्मान जागर परिषदेत विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार श्री.जितेंद्र आव्हाड यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. या जागर परिषदेला मोठ्या संख्येने लोक हजर होते. पोलीस विभागाला या कार्यक्रमाची पूर्वनियोजित कल्पना देण्यात आली होती. परंतु या कार्यक्रमाचे गांभीर्य पोलीस विभागाने घेतले नाही. एखाद्या विधिमंडळाच्या सन्माननीय सदस्यावर भाषण करीत असताना त्यांच्यावर काही जणांनी हल्ला करणे, ही अतिशय गंभीर बाब आहे. या राज्यात पत्रकार आवाज उठवितात म्हणून त्यांच्यावर हल्ले करण्यात येतात, त्यांची हत्या करण्यात येते. सांगलीच्या कार्यक्रमाच्या अगोदर पुणे येथे श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या फोटोवर फुली मारुन तो फोटो त्यांना पोस्टाने पाठविण्यात आला होता. ही गोष्ट सर्व माध्यमांवर आलेल्या असताना आमदार श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या सुरक्षिततेची काळजी सरकारकडून घेण्यात आलेली नाही. त्या कार्यक्रमाला पोलिसांनी बंदोबस्त दिला नाही. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे त्यांच्या संरक्षणाची मागणी केली होती. मी देखील तशी मागणी केली होती. परंतु सरकारकडून होकार मिळालेला नाही. पुरोगामी विचार मांडणाऱ्याला महाराष्ट्रामध्ये ठेवायचे नाही, त्यांना ठेचून काढायचे, अशी प्रवृत्ती महाराष्ट्रामध्ये निर्माण होणार असेल आणि त्याबाबत सरकार काहीही भूमिका घेणार नसेल तर ती दुर्दैवाची गोष्ट आहे." मी औचित्याच्या मुद्याद्वारे हा गंभीर विषय सभागृहापुढे मांडत आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"महाराष्ट्रामध्ये पुरोगामी विचार मांडण्याचे काम अनेक सन्माननीय नेते करतात. डॉ.नरेंद्र दाभोळकर आणि ॲड.गोविंदराव पानसरे यांच्या खुनाच्या तपासात अक्षम्य दिरंगाई झालेली आहे. या सर्व मुद्यांना स्पर्श करुन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आज मुंबईमध्ये आझाद मैदानावर निषेध आंदोलन सुरु केलेले आहे. या प्रकरणाबाबत त्यांनी वारंवार शासनाचे आणि मुख्यमंत्री महोदयांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनही सादर केले होते. डॉ.नरेंद्र दाभोळकर आणि ॲड.गोविंदराव पानसरे यांच्या खुनाच्या तपासाची स्थिती आणि कारवाईतील दिरंगाई याबाबत तपशीलवार चर्चा होण्याची आवश्यकता आहे असे त्यांनी सांगितले. तसेच जादूटोणा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात दाखल गुन्ह्यांची न्यायालयीन प्रक्रिया, प्रबोधनासाठी आवश्यक यंत्रणा आणि अनुकूलता, कायद्यातील नियमावली मंजुरी, याही गोष्टी आजपर्यंत प्रलंबित राहिलेल्या आहेत. त्याच बरोबर महाराष्ट्रात जातपंचायतीचा मनमानी कारभार सर्व ठिकाणी वाढताना दिसत आहे. त्या विरोधी कायद्याचा मसुदा तीन महिन्याच्या आत सभागृहात करण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिकदृष्टीकोनातून शिक्षण आणि प्रशिक्षण प्रबोधनासाठी विविध उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे हे शासन गंभीरपणे पहावयास तयार नाही. जो तपास अधिकारी नेमण्यात आला होता. त्या तपास अधिकाऱ्याची सहा महिन्यांपूर्वी बदली झाली अशी माहिती आहे. आता तो तपास पूर्णपणे थंडावलेला आहे. समाजामध्ये महत्वाचे काम करणाऱ्या व्यक्तींना आणि समुहांना अशा प्रकारची वागणूक मिळणार असेल तर राज्यामध्ये फार मोठा गंभीर प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे या औचित्याच्या मुद्याद्वारे या सर्व विषयाची शासनाने गंभीरपणे दखल घ्यावी. आज आंदोलनाला बसलेल्या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यकर्त्यांना सरकारने भेटीसाठी बोलवावे, त्यांच्याशी चर्चा करावी आणि लवकरात लवकर या सर्व प्रश्नांची उकल करावी." अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे करीत आहे.

------ यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, दिनांक 20 ऑगस्ट, 2013 रोजी डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्यावर पुणे येथे भीषण हल्ला होऊन त्यांचा मृत्यू झाला. काल मला त्यांचे चिरंजीव हमीद दाभोळकर यांचा फोन आला होता. मी शुक्रवारी औचित्याच्या मुद्याद्वारे या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधले होते. महाराष्ट्र राज्य पोलिसांकडून सी.बी.आय. ला अधिकारी देण्यासाठी जे सहकार्य मिळावयास पाहिजे ते मिळत नाही. याकडे मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय गृह राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधले होते. येत्या 20 ऑगस्ट रोजी दाभोळकरांच्या हत्येला दोन वर्षे पूर्ण होतील. परंतु या हत्येच्या तपासाच्या दृष्टीने कसल्याही प्रकारची प्रगती झालेली नाही. त्यामुळे या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत असताना आमची सरकारला विनंती राहील की, सी.बी.आय. ला या हत्येच्या तपासाच्या अनुषंगाने ज्या अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे ते अधिकारी त्यांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करुन, येत्या दोन दिवसांत त्या बाबती माहिती सभागृहासमोर ठेवण्यात यावी.

सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिल्याबद्दल मी आपली आभारी आहे महोदय, विरारमध्ये एका शाळकरी मुलीवर आज सकाळी चाकू हल्ला झाला. त्या मुलीची अनेक दिवसांपासून छेडछाड काढण्यात येत होती. ती मुलगी घरी परत जात असताना छेडछाड करणाऱ्या त्याच मुलांनी तिचा पाठलाग करुन, तिच्यावर घराच्या पायऱ्याजवळ चाकू हल्ला केला. तिच्यावर हल्ला करणारे आरोपी अजून फरार आहेत. माझी मागणी आहे की, या घटनेतील आरोपींना अटक झाल्यानंतर त्यांना जमीन मिळणार नाही या दृष्टिकोनातून प्रयत्न होणे आवश्यक आहे. सध्या अधिवेशन सुरु आहे. आम्ही सभागृहात वेगवेगळे विषय मांडतो त्यावेळी काही महत्त्वाच्या विषयांच्या बाबतीत सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी निवेदने करण्यात आलेली आहेत. या घटनेच्या बाबतीत सुध्दा सरकारकडून निवेदन होणे गरजेचे आहे. सभापती महोदय, या घटनेतील आरोपींवर योग्य कारवाई होण्याच्या अनुषंगाने सरकारने पावले उचलावित, याकडे मी सरकारचे लक्ष वेधते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : डॉ.नरेंद्र दाभोळकर आणि ॲड.गोविंदराव पानसरे यांच्या हत्येच्या बाबतीत या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडण्यात आला. तसेच सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे व श्रीमती विद्या चव्हाण यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शाळकरी मुलीवर झालेल्या चाकू हल्ल्याच्या घटनेबाबतचा उल्लेख केला. या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, सरकारने हा विषय गांभीर्याने घेऊन, निवेदन केले तर जास्त उचित होईल. त्यामुळे सरकारने या विषयी निवेदन करावे.

प्रा.राम शिंदे : होय.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक श्रीगणेशोत्सव साजरा करण्यासंदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने आयोजक मंडळावर ध्वनी प्रदूषण, वाहतूक समस्या, मंडप उभारणी या प्रकरणी बंधने लादली आहेत. सदर बंधने लादण्यात आल्यामुळे राज्यातील विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे सह श्रीगणेशोत्सव मंडळांवर गणेशोत्सव साजरा करण्यासंदर्भात अडचणी निर्माण होणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सव मंडळ आयोजकांमध्ये उदासिनतेचे वातावरण निर्माण होणे, या प्रकरणी सुकर मार्ग काढण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे माननीय आयुक्त यांची समिती नेमून त्यांच्या अहवालानुसार कार्यवाही करण्याचे दिनांक 13 जुलै, 2015 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. या निमित्ताने मी निदर्शनास आणून देतो की, 1990 मध्ये आणि त्या दरम्यान अशीच एक समस्या निर्माण झाली होती. त्यावेळी शासनाने केवळ तीन दिवसांत त्या बाबतीत अध्यादेश प्रख्यापित करुन सदर समस्येची उकल केली होती. त्यामुळे त्याच धर्तीवर याही वर्षी या समस्येच्या बाबतीत अध्यादेश प्रख्यापित करुन या समस्येची तातडीने उकल करण्याऐवजी, मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांची समिती नेमून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होईपर्यंत कालापव्यय व्यतित होणार असल्यामुळे तत्कालीन शासनाने सन 1990 मध्ये निर्गमित केलेल्या अध्यादेशाच्या धर्तीवर या वर्षी सुध्दा अध्यादेश निर्गमित करुन या समस्येची उकल करण्यात यावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

---------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मघाशी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे आणि ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्या विषयी आपण निर्णय दिला असल्यामुळे मी त्यावर पुन्हा बोलणे उचित होणार नाही. परंतु सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची दखल या सभागृहाने घेणे आवश्यक आहे. डॉ.नरेंद्र दाभोळकर आणि कॉ.गोविंदराव पानसरे यांच्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.जितेंद्र आव्हाड यांना सुध्दा त्याच पध्दतीने टार्गेट करण्याचा प्रयत्न या राज्यातील प्रतिक्रियावादी शक्ती करीत आहेत. सरकार या बाबतीत काय करणार आहे, या बाबतचे उत्तर सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. मागच्या दोन्ही प्रकरणात सांगलीचे कनेक्शन उघड झाले होते. त्यामुळे....

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जो मुद्दा मांडत आहेत तो आपण मान्य केलेला आहे काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपण विद्यार्थी आत्महत्येच्या विषयावर औचित्याचा मुद्दा दिलेला आहे. मला वाटते आपण थोडेसे त्या विषयावर बोला आणि थोडेसे या विषयावर बोला.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी सकाळी आपल्या दालनात भेटून या विषयी चर्चा केली होती. तो महत्त्वाचा विषय असल्यामुळे आपण त्यावर निर्णय द्यावयाचा होता म्हणून मी आठवण करुन देत होतो. एखादा विषय महत्त्वाचा असल्यामुळे त्या बद्दल सरकारने उत्तर देणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य डॉ.जितेंद्र आव्हाड यांना केवळ धमकी दिली नाही तर त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न सांगलीमध्ये केला गेला आहे. या घटनेच्या बाबतीत सरकार काय उत्तर देणार आहे हे सभागृहाला समजणे आवश्यक आहे. एका बाजूला लोक आझाद मैदानात उपोषणास बसले आहेत, धरणे धरुन बसली आहेत. सबंध राज्याला मागे झालेल्या दोन खूनांच्या बाबतीत सरकारकडून काय कार्यवाही झाली हे समजणे आवश्यक आहे. आता तिसरा खून पडणार आहे की काय, म्हणून मी हा विषय आग्रहाने सभागृहात मांडत आहे. त्यामुळे या सर्व प्रकाराबद्दल सभागृहाला माहिती मिळणे आवश्यक आहे. माननीय मंत्र्यांना या विषयी खुलासा करावयाचा असेल तर जरुर करावा. परंतु त्यांनी मला अडविण्याचे कारण नाही. ..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, परवा कळंबोली येथे विध्नेष साळुंखे या अवघ्या बारा वर्षाच्या सातवीतील विद्यार्थ्याने शाळेच्या इमारतीवरुन उडी मारुन आत्महत्या केली. पाच वर्षांपूर्वी राज्यात 100 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याबद्दल त्या विषयी सभागृहात चर्चा झाली होती आणि त्या चर्चेला तत्कालीन माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले हाते. परंतु ते उत्तर केवळ इतिवृत्ताचा भाग झाला आणि त्यानंतर त्याची अंमलबजावणी झाली नाही. दुसरा प्रकार नालासोपारा येथे घडला. तेथील एका शाळेतील इयत्ता सातवीतील विद्यार्थ्याला इयत्ता दहावीतील विद्यार्थ्याने जीवे मारले. मुलांवर वाढलेला ताण, कुटुंबातील भांडणे आणि शाळांकडून कधी कधी न मिळणारा आधार आणि दुसऱ्या बाजूला सोशल मीडिया आणि टी.व्ही.वरील मालिका या सगळ्यांच्या कोंडीमध्ये आणि घुसमटीमध्ये मुलांना उत्तरे सापडत नाहीत. परिणामी विद्यार्थी आत्महत्या करण्यासारखे टोकाचे पाऊल उचलतात. राज्य सरकारने मागे जी घोषणा केली होती त्याची अंमलबजावणी झाली नाही. मी नवीन शिक्षण मंत्र्यांना विनंती करतो की, अमेरिकेत अशा पध्दतीच्या ज्यावेळी घटना घडल्या त्यावेळी वाशिंग्टन राज्याने युएसए सुसाईड प्रिव्हेन्शन ॲक्ट आखून, त्याची अंमलबजावणी करण्यात आली होती. मागे झालेल्या चर्चेच्या वेळी आरोग्य, शिक्षण आणि गृह विभागाच्या माध्यमातून राज्य सरकार पावले उचलेल असे या सभागृहात आश्वासन देण्यात आले होते. या ठिकाणी माननीय आरोग्य मंत्री व शिक्षण मंत्री आहेत. माझी विनंती आहे की, या घटनेची तातडीने दखल घेतली पाहिजे. कारण ही कोवळी पानगळ आपण रोखली पाहिजे. माननीय शालेय शिक्षण मंत्री संवेदनशील आहेत, असे मी मानतो. शिवाय माननीय आरोग्य मंत्री या क्षेत्रात काम करतात. त्यांनी या विषयाची कृतीने दखल घ्यावी. ही घटना हसण्यावर नेणारी नसून गंभीर आहे. माननीय शालेय शिक्षण मंत्री आणि माननीय आरोग्य मंत्री दोघेही सभागृहात बसलेले असल्यामुळे त्यांनी या विषयी खुलासा करावा. वास्तविक पाहता या विषयावर नियम 289 अन्वये चर्चा होणे आवश्यक आहे.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्री आणि माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री, हे दोघेही सभागृहात उपस्थित असल्यामुळे ते या विषयाची दखल घेणारच आहेत. शिवाय आज माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचा वाढदिवस आहे. त्यामुळे आज त्यांना त्रास देऊ नका. मी माननीय मंत्र्यांना सांगतो की, त्यांनी या विषयाची दखल घ्यावी.

---------

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी एक अतिशय गंभीर विषय औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे. सध्या पंढरपूरची वारी तोंडावर आली आहे. परंतु सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी यात्रेच्या नावाखाली दोन दिवसापासून तेथील स्थानिक भूमिहिन लोकांची, छोट्यामोठ्या व्यवसायातून उदरनिर्वाह करणाऱ्या व्यापाऱ्यांची मंडईतील भाजीपाला, दूध, फळे उद्ध्वस्त केली. त्यामुळे पंढरपुरात कडकडीत बंद पुकारण्यात आला आहे. वारकऱ्यांनी सुध्दा त्या बंदला पाठिंबा दर्शविला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना तेथील लोकांच्या व्यवस्थेसाठी पाठविण्यात आले आहे की, गोरगरिबांचे प्रपंच उद्ध्वस्त करण्यासाठी पाठविले आहे ?

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपकराव साळुंखे ....

अशा गंभीर परिस्थितीत शासनाने त्यामध्ये तातडीने लक्ष घालण्याची गरज आहे. माननीय मंत्री श्री. चंद्रकांत पाटील साहेब सभागृहात उपस्थित आहेत. परिस्थिती अतिशय गंभीर आहे. उद्ध्वस्त होत आहेत. बुलडोझर आणले ओहत. एक माणूस रस्त्यावर बसू देत नाहीत. शासन या गंभीर गोष्टीकडे लक्ष देणार का ?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : आता नियम 93 च्या सूचना घेण्यात येतील. (गोंधळ) विशेष उल्लेख घेतो. नियम 93 अन्वयेच्या सूचना तरी वाचू द्याव्यात.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण या संदर्भात काही तरी निर्देश तरी द्यावेत.

**सभापती** : औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात निर्णय घेतला जात नाही. शासन त्या संदर्भातील दखल पूर्णपणे घेईल. (गोंधळ) माननीय मंत्र्यांनी उठून सांगावे की, या संदर्भात दखल घेतली जाईल.

(गोंधळ)

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, पंढरपूरच्या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी अगोदरच दखल घेतली आहे. तेथील जिल्हाधिकाऱ्यांशी ते बोलले आहेत. त्यांच्या व्यवहाराच्या संदर्भात त्यांना नीट समज देण्यात आली आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बालण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्यांचे सर्व विषय गंभीर आहेत.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आपण आषाढी एकादशीला सामोरे जात आहोत. पंढरपूरच्या प्रकरणाच्या संबंधी सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली आहे. मी विनंती करतो की, आपण शासनाला निर्देश देऊन आज संध्याकाळपर्यंत त्या विषयाच्या संदर्भात निवेदन करावे असे सांगावे. आपण किमान असे निर्देश द्यावेत.

**सभापती** : शासनाने काही कार्यवाही करायचे ठरविले आहे. जी कार्यवाही होईल त्या संदर्भातील निवेदन आज करावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, पंढरपूरची बाब गंभीर आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड व एका मुलाच्या मृत्यूच्या संदर्भातील औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यात आले, ते अतिशय महत्त्वाचे आहेत. शासनाने आज सभागृह संपण्याच्या अगोदर निवेदन करावे एवढीच अपेक्षा आहे.

**सभापती** : ठीक आहे

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आज सोमवार, दिनांक 20 जुलै, 2015 रोजी मला प्राप्त झालेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांच्या संदर्भातील निर्णय सचिव वाचून दाखतील.

उप सचिव : सन्माननीय सदस्य श्री. अनिल तटकरे यांनी "कारंजा शहरातील (जि.वाशिम) शिवाजीनगर भागात दिनांक 7 जुलै, 2015 रोजी एका युवतीची छेड काढल्यामुळे दोन गटांत झालेल्या दंगलीत एका युवकाचा मृत्यू होऊन 12 जण जखमी झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी "सोयगांव, जि. औरंगाबाद येथे सुरू केलेल्या ग्रामीण रूग्णालयाला उप जिल्हा रूग्णालयाचा दर्जा द्यावा तसेच रिक्त असलेली पदे तत्काळ भरणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी "राज्यातील राष्ट्रीय महामार्ग विशेषत: मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर हॉटेल मालक व ढाबे चालक प्रवाशांकडून पिण्याचे पाणी व खाद्य पदार्थांच्या किंमतीत छापील किंमतीपेक्षा दुप्पट किंमत घेऊन प्रवाशांची करीत असलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "बीड जिल्ह्यातील बार्शीनाका चौकी परिसरातील एका अत्याचारित गुन्ह्यामध्ये घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी पंच होण्यास नकार दिल्यामुळे श्रीमती एन.एन.भांगे या शिक्षिकेच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्याबाबत, सार्वजनिक निवडणुका व जनगणने व्यतिरिक्त कोणतेही शिक्षणबाह्य काम शिक्षकांना देण्यात येऊ नये अशी तरतूद असताना शिक्षकांना शाळाबाह्य कामे देण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उप सचिव ....

सन्माननीय सदस्य ॲड. रामहरी रूपनवर, सर्वश्री संजय दत्त, शरद रणपिसे, भाई जगताप यांनी "सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यामधील बोरगाव येथे दिनांक 19 जून, 2015 रोजी गावातील मानपानातून दलित समाजातील काही जणांना सवर्ण लोकांनी केलेल्या मारहाणीत वृध्दाचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील यांनी "नांदेड जिल्ह्यात वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी देण्यात येणारे अनुदान शासनाकडून न मिळाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रात निसर्ग कंपनीने निवासी प्रयोजनासाठी वाटप केलेला भूखंड अपात्र गुंतवणूकदारांना विकल्यामुळे औद्योगिक विकास मंडळाचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी "मुंबईतील मरिन ड्राईव्ह येथील खुली व्यायामशाळा काढून टाकण्याची नागरिकांनी केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**माननीय मंत्री श्री. विनोद तावडे यांचे वाढदिवसाबद्दल अभिष्टचिंतन**

**सभापती** : पूर्वी विधानपरिषदेचे सन्माननीय सदस्य असलेले आणि आता विधानसभेचे सन्माननीय सदस्य झालेले माननीय मंत्री श्री. विनोद तावडे यांचा आज वाढदिवस आहे. आपल्या सर्वांच्या तर्फे मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो व त्यांना शुभेच्छा देतो.

----

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर लक्षवेधी सूचना व इतर कामकाज आहे. गेली साडे तीन दिवस गांभीर्याने शेतकऱ्यांच्या विषयावर सभागृहात चर्चा होत आहे आणि या प्रश्नाकडे संपूर्ण राज्याचे विशेषकरून शेतकरी वर्गाचे लक्ष लागून राहिले आहे. आता नियम 260 अन्वयेच्या दोन्ही प्रस्तावांवर चर्चा सुरू करण्याचे ठरले आहे. मी या संदर्भात निर्देश देत आहे. सन्माननीय सदस्य ॲड. रामहरी रूपनवर ऑन लेग आहेत. आता त्यांनी त्यांचे भाषण सुरू करावे.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपणाला मध्यंतर पाहिजे असेल तर आपण जेऊन पुन्हा सभागृहात यावे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, ते साडे चार वाजता कामातून मोकळे होतील, त्यावेळी ते या चर्चेला उत्तर देतील. प्रस्तावावर अजून 11 सन्माननीय सदस्य भाषण करावयाचे शिल्लक आहेत. आपण लक्षवेधी सूचना हे झाल्यानंतर घेणार आहोत. आता भाषण करणाऱ्यांमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, पांडुरंग फुंडकर विनायक मेटे, प्रा. अनिल सोले, श्रीमती स्मिता वाघ, प्रा. जोगेंद्र कवाडे, ॲड. रामहरी रूपनवर, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री सुभाष झांबड, शरद रणपिसे, अनंत गाडगीळ, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री हेमंत टकले, प्रकाश गजभिये आहेत. (गोंधळ) चर्चा व त्यावरील माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर यानंतर पुढील कार्यक्रम ठरेल. माननीय मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात तयारीत रहावे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, वेळ फार कमी आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी तयार आहेत. आपण त्यांना पहिल्यांदा संधी द्यावी. आपण सत्तारूढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना मागून सुध्दा परवानगी देऊ शकता.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट

**मु.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, हेमंत टकले, भाई जगताप, जयंतवराव जाधव, जयंत प्र. पाटील, शरद रणपिसे, कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

ॲड. रामहरी रूपनवर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलत असताना मी परवा काही गोष्टी शायनाच्या निदर्शनास आणून दिल्या. माझे बोलणे गांभीर्याने वेगळे होते. मी शासनाला वस्तुस्थिती, राज्यातील परिस्थिती आणि शासनाने करावयाच्या उपायोजना याबाबत सूचना केल्या होत्या. दरवर्षी ही समस्या निर्माण होते. शासनाने यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याकरिता एक संसदीय समिती नेमावी अशी माझी सूचना होती. शासनाला, शासकीय अधिकाऱ्यांना या संदर्भात लक्षात येत नसेल पण हा प्रश्न कोकणात, विदर्भात, मराठवाड्यात, पश्चिम महाराष्ट्रात सारखाच आहे. कोणा एकाचे संकट आहे असे नाही. निसर्गाचे संकट दरवर्षी येते. यावर कशी मात केली पाहिजे हे पाहण्यासाठी सर्वंकर्ष विचार करणारी विधानसभा व विधानपरिषद सन्माननीय सदस्यांची एक समिती नेमावी अशी माझी शासनाला सूचना होती. आपण पाहत आहोत की, महागाई वाढत चालली आहे. गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी युरियाच्या दरात वाढ झाली. आहे. शेतमालासाठी आवश्यक गोष्टी जसे की, खते, औषधे, मजुरी यांचे दर वाढत आहेत. मात्र शेतमालाचे दर कमी होत आहेत. गेल्या वर्षी ऊसाला 2300, 2400 रूपये दर मिळाला. यंदा एफआरपीप्रमाणे 1800 रूपये नाही तर 1200 रूपये, 1300 रूपये, 1500 रूपये असा दर दिला आहे. गेल्या वर्षी दुधाला 26 रूपये लिटर दर होता आणि यावर्षी दुधाला 17 रूपये लिटर दर आहे. जगात अशी कोणती यंत्रणा आहे ज्यामुळे महागाईमध्ये सर्व बाबींचे दर वाढतात आणि शेतमालाचे दर मात्र रिव्हर्स होता. गेल्या वर्षी 100 रूपयांनी युरिया मिळत होता, तो आता 170



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर ....

रूपयांना मिळत आहे. आमच्या दुधाला मात्र दर नाही. शेतमालाला दर नाही. भयावह परिस्थिती आहे. आपण या सर्व बाबींचा विचार केला तर शेतकरी आत्महत्या का करतो हे लक्षात येईल. शासकीय कर्मचाऱ्यांचे पगार वाढले, रेल्वेचे, एसटीचे भाडे वाढले, सर्व गोष्टींचे दर वाढले आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर.........

शेतमालाचे दर मात्र रिव्हर्स झाले आहेत. याची काही कारणे मी आपल्याला सांगणार आहे. सन्माननीय सदस्यांनीही ती विचारात घेतली पाहिजेत. दुष्काळ पडला, कमी पाऊस झाला तर शेतकऱ्याला दुबार पेरणी करावी लागते. पाऊस न पडल्यामुळे उभे पीक जळून गेल्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. दुष्काळ पडला म्हणून नुकसान होते आणि जास्त पाऊस पडला तरी नुकसान होते. त्याचप्रमाणे एखाद्या पिकाचे जादा उत्पादन झाले आणि ते उत्पादन बाजारात आले की, त्या उत्पादनाचे दर खाली येतात आणि त्या माध्यमातूनही शेतकऱ्यांचे नुकसान होते. एखाद्या पिकाला क्विंटलमागे 1000 रुपये दर मिळावा, अशी अपेक्षा असताना केवळ 500 रुपये मिळतात. जगामध्ये असे एकच उत्पादन आहे की, ज्याची किंमत उत्पादक ठरवीत नाही आणि ते म्हणजे शेती उत्पादन. शेती उत्पादनाचा दर दुसराच ठरवीत असतो. म्हणजे, आपल्या उत्पादनाचा दर ठरविण्याचा आधार देखील शेतकऱ्याला नाही. पाहिजे तेवढे कष्ट केले तरी आपल्या हातात किती पैसे मिळतील, हे त्याला कधीही सांगता येत नाही. ग्रामीण भागात यालाच, "शेंड्यावर शहाणा", असे म्हणतात. इतर उत्पादनांच्या बाबतीत मात्र उत्पादन खर्च किती येईल, आस्थापना खर्च किती येईल, हे निश्चित करुन उत्पादकाला विक्री किंमत ठरविता येते. मात्र, शेतकऱ्याला ही मुभा नाही.

सभापती महोदय, कृषी प्रक्रिया उद्योगांसाठी केंद्र सरकारकडून हजारो कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. परंतु, महाराष्ट्रात प्रक्रिया करणारे उद्योग नसल्यामुळे त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत नाही. शेतकरी ज्वारीचे दर ठरवू शकत नाही. पण तुम्ही एखादी गिरणी टाकली, ज्वारीचे पीठ काढले, पिशव्यांमध्ये भरले आणि ते विकले तर तुम्ही त्या पिठाचा दर ठरवू शकता. आज बाजारात गहू आणि ज्वारी पिठाच्या 1 किलो पासून 20-25 किलोपर्यंतच्या पिशव्या मिळतात आणि त्याचे दर उत्पादक ठरवितात. तो माल शेतकरी तयार करीत नाही. शेतकऱ्यांकडून गहू, ज्वारी घेऊन आपल्या गिरणीतून पीठ काढून त्या पिठाच्या पिशव्या पुणे आणि मुंबई शहरात पाठविल्या जातात. वास्तविक पाहता हा प्रक्रिया उद्योग अगदी छोटा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे**)

श्री.रामहरी रुपनवर.........

सभापती महोदय, आज सोयाबीन उत्पादक शेतकरी अडचणीत आहे. परंतु, सोयाबीनवर प्रक्रिया करणाऱ्यांची संख्या किती आहे ?शेती मालावर प्रक्रिया करणाऱ्यांना सहाय्यकारी ठरणारी एक स्वयंसेवी संस्था पुण्यामध्ये आहे. त्यांनी मला असे सांगितले की, आम्ही सोयाबीनच्या हिरव्या बियांपासून दूध काढतो आणि त्या दुधात आईच्या दुधाएवढे प्रोटिन्स असतात. हे बाटलीभर दूध 1500 रुपयांना मिळते आणि त्याला 'सोया मिल्क' असे म्हटले जाते. परंतु, सरकार सोयाबीनपासून दूध काढण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याच्या बाबतीत काही प्रयत्न करीत आहे का ?

सभापती महोदय, एखाद्या भागात किंवा एखाद्या शेतकऱ्याने सोयाबीन लावला की, अनेक शेतकरी सोयाबीन लावतात आणि त्यामुळे कुणालाच चांगला दर मिळत नाही. यासाठी पीक पध्दतीमध्ये आवश्यक तो बदल केला पाहिजे. जेणेकरुन एकाच वेळी, एकाच पध्दतीचे पीक शेतकरी घेणार नाहीत, वेगवेगळे पीक घेतील आणि सर्व शेतकऱ्यांना योग्य दर मिळेल. यासाठी आपण काही उपाययोजना करणार आहोत का ?

सभापती महोदय, शेतकऱ्याला सरकारने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे म्हणजेच एफआरपीप्रमाणे दर मिळाले पाहिजेत, अशी आपली अपेक्षा आहे. साखर कारखान्याने ऊसाला प्रति क्विंटल 1800 रुपये दर दिला पाहिजे, अशी मागणी आहे. साखर कारखान्यांना याबाबत विचारले तर ते असे सांगतात की, ज्यावेळी सरकारने एफआरपी ठरविला होता त्यावेळी खुल्या बाजारात साखरेचे दर प्रति किलो 50 रुपये होते, जे आज 20 रुपयांवर आले आहेत. सरकारच्या धोरणामुळे हे दर कमी झाले आहेत. अशा प्रकारे जर खुल्या बाजारातील साखरेचे दर खाली आले असतील तर साखर कारखान्यांचे काय होईल, याचाही विचार आपण केला पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रात 29 साखर कारखाने आहेत. यावर अवलंबून असलेल्या हजारो लोकांचे हाल होणार आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी असा निर्णय घेतला आहे की, पुढील वर्षी 1000 रुपये दर दिला जाईल आणि हे मान्य नसेल तर कारखाने सुरु केले जाणार नाहीत. एका बाजूला आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्याचा विचार आपण

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर.........

करीत आहोत. पण दुसऱ्या बाजूला जर अशा प्रकारे कारखानेच सुरु झाले नाहीत तर येणाऱ्या संकटाचा देखील आपण विचार केला पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने सुरु झाले नाही तर संपूर्ण शेती उद्ध्वस्त होईल, हे राज्यही उद्ध्वस्त होईल. भविष्यात येणाऱ्या संकटाचा विचार करुन अगोदरच उपाययोजना केली पाहिजे, असे माझे मत आहे.

सभापती महोदय, सरकारने केलेल्या चांगल्या कामांचा देखील उल्लेख येथे करणे गरजेचे आहे. परवा राज्याचे माननीय ऊर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे हे सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते व त्यांनी त्या ठिकाणी एक आढावा बैठक घेतली. जिल्ह्यात किती पोल उभारण्यात आले, शेतकऱ्यांची मागणी काय आहे, वगैरे बाबतीत ते अधिकाऱ्यांकडून माहिती घेत होते. त्या बैठकीत मी त्यांना असे विचारले की, "मंत्री महोदय आपण केवळ अधिकाऱ्यांची झाडाझडती घेण्यासाठी येथे आला आहात का ? गेल्या तीन वर्षात आवश्यक साधन-सामुग्री या जिल्ह्याला देण्यात आलेली नाही, गेल्या तीन वर्षात या जिल्ह्याला एक रुपयाही दिलेला नाही, त्यामुळे कोणतीही कामे झालेली नाहीत. या जिल्ह्यात शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध आहे. मात्र, विजेची व्यवस्था न झाल्यामुळे त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. विजेचे साहित्य नाही म्हणून वीज नाही व त्यामुळे शेतकरी पाण्याचा उपयोग शेतीसाठी करु शकत नाही." त्यावेळी मंत्री महोदयांनी तेथेच साधन-सामुग्रीसाठी 25 कोटी रुपये देण्याचे आदेश दिले आणि खरोखरच दुसऱ्या दिवशी हा निधी या जिल्ह्याला मिळाला. मी त्यांच्या हे लक्षात आणून दिले की, लातूर जिल्ह्यात जेवढे डी.पी.आहेत तेवढे डी.पी.एकट्या माळशिरस तालुक्यात आहेत. या जिल्ह्याला 100 डी.पी.ची आवश्यकता आहे. यासाठी देखील मंत्री महोदयांनी 5 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याचे आदेश मुख्य अभियंत्यांना दिले आणि दुस-या दिवशी तो निधी देखील मिळाला. त्या माध्यमातून खरेदी झाली आणि अनेक ठिकाणी डी.पी.बसविण्यातही आले. लोकप्रतिनिधीने जर मंत्री महोदयांच्या निदर्शनास योग्य पध्दतीने अडचणी आणून दिल्या आणि मंत्री महोदयांनीही त्याची दखल घेतली तर पाण्याअभावी पिकांचे नुकसान होणार नाही. परंतु, सर्व क्षेत्राच्या बाबतीत हे होत नाही.

..4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर.........

ज्यांनी अशा प्रकारचे निर्णय घेतले आहेत, त्यांचा मात्र जरूर उल्लेख केला पाहिजे. केवळ एवढेच नाही तर मागणी करणाऱ्या लोकप्रतिनिधींशी संपर्क साधून त्यांच्याकडून यादी घ्यावी, अशाही सूचना त्यांनी अधिका-यांना केल्या. त्यानुसार अधिकाऱ्यांनी माझ्याशी संपर्क साधला आणि पुढील कार्यवाही केली. आम्ही त्यावेळी अशीही मागणी केली की, डी.पी.आणण्याचा आणि बसविण्याचा त्रास शेतकऱ्यांना न देता महामंडळानेच ते बसविले पाहिजेत. त्यानुसार आमच्या भागात महामंडळानेच हे डी.पी.बसविण्याचा निर्णय झाला आणि त्याप्रमाणे कार्यवाही देखील झाली. अशीच कार्यवाही संपूर्ण महाराष्ट्रात व्हावी, ही आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, पाटबंधारे विभागाच्या संदर्भात मी एक उदाहरण येथे देणार आहे. आमच्या भागात कारंडे गाव असून तेथे एक मोठा तलाव आहे. या तलावात एवढे पाणी आहे की, संपूर्ण गावाला पाणी दिले तरी तलावातील पाणी संपणार नाही. त्यावरील कॅनॉल एका ओढ्यावरून जातो आणि त्यावर एक सेतू आहे. त्या सेतुला एक भोक पडले आहे. सेतुवरून पाणी जाताना ते ओढ्यात पडते व त्यामुळे पुढे कॅनॉलला जात नाही. गेल्या 12 वर्षांपासून आम्ही ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देत आहोत. पाणी उपलब्ध असूनही सेतू दुरूस्ती न केल्यामुळे हजारो एकर शेतीला पाणी देता येत नाही. अशा प्रकारच्या गोष्टी शासनाने वेळच्यावेळी केल्या तर शेतकऱ्याला आमहत्या करावी लागणार नाही. योजना पूर्ण आहे, पाणी उपलब्ध आहे. परंतु, केवळ दुरूस्ती करण्याची गरज आहे.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर.......

त्या ओढ्यावरुन जाणाऱ्या सेतूला एक भोक पडलेले आहे. त्यामुळे पुढील हजार एकर शेतीला पाणी मिळत नाही. याबाबत शासनाकडे 7 प्रस्ताव आलेले आहेत. परंतु, शासन ती दुरूस्ती करीत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात, याचा शासनाने विचार केला पाहिजे. त्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे, कॅनॉल झालेले आहेत, पूर्वी योजना झालेली आहे, नवीन काहीही करायचे नाही. परंतु जी थोडी दुरूस्ती करावयाची आहे ती न केल्यामुळे पुढे पाणी जात नाही. शासनाने तातडीने ती दुरूस्ती करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाने शेती पूरक उद्योगांना चालना दिली पाहिजे. शेतकऱ्यांना नवीन काही देण्यापेक्षा त्यांच्या खिशातून कोणी काही काढून घेत असेल तर ते थांबविले पाहिजे. शेतकऱ्याला नवीन काही देण्यापेक्षा त्याला डीपी बसवायची असेल तर शासनाने स्वतःच्या खर्चाने डीपी बसविली पाहिजे. शेतकऱ्यांना नवीन पॅकेज देण्यापेक्षा त्याचा खर्च वाचविला पाहिजे आणि कोणी त्याच्या खिशातून पैसे काढत असेल तर ते बघितले पाहिजे. व्यापारी शेतकऱ्यांकडून स्वस्त दराने माल घेतो आणि दुप्पट दराने त्या मालाची विक्री करतो, हे जर आपण थांबविले आणि आपण त्यासाठी पणनमध्ये काही व्यवस्था करु शकलो तर फार मोठे बदल होतील, असे मला वाटते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाच्या पुनर्गठनाच्या संदर्भात मला नवीन माहिती मिळालेली आहे. केंद्र शासनाकडून राज्य शासनाला सूचना प्राप्त झालेल्या आहेत की, कर्जाचे पुनर्गठन करण्यासाठी तुम्ही बँकांवर दबाव आणू नका. मी सांगू इच्छितो की, शासन विचार करुन कर्जाचे पुनर्गठन करते. परंतु, आपण अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे पुनर्गठन केले नाही तर त्यांना कर्ज मिळणारच नाही. शेतकऱ्यांचे कर्जमाफ करावे, अशी आमची मागणी आहे. शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली पाहिजे, कर्जमाफी झाली पाहिजे, अशी आम्ही मागणी करीत आहोत. कारण, शेतकऱ्यांची कर्जमाफी, कर्जमुक्ती नाही झाली तर त्याला नवीन कर्ज मिळणारच नाही, तो थकबाकीदार होईल. शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे पुनर्गठन केले तर त्यांना नव्याने कर्ज

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर.......

मिळू शकेल. परंतु, कर्जाचे पुनर्गठन करु नका किंवा पुनर्गठन करण्यासाठी बँकांवर दबाव आणू नका, असे शासनाला केंद्र शासनाकडून निर्देष मिळत असतील तर ती फार वाईट गोष्ट आहे. त्यामुळे राज्यात फार मोठा हल्लाकल्लोळ होईल, शेतकऱ्यांवर तो फार मोठा अन्याय होईल. शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन झाले पाहिजे, अशी आमची मागणी आहे. त्या अगोदर शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली पाहिजे आणि शासनाने तसे निवेदन केले पाहिजे, अशी माझी मागणी आहे. या संदर्भात शासनाने तातडीने प्रयत्न केले पाहिजेत. तसेच, शेती पूरक उद्योगातून मिळणाऱ्या मालाच्या दरावर नियंत्रण ठेऊन शेतकऱ्यांना चार पैसे कसे मिळतील यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत बोलताना मग तो मराठवाडा असो, विदर्भ असो किंवा कोकणातील विषय असो. पश्चिम महाराष्ट्रावर दोन-तीन चटके मारायचे आणि पुढे जायचे, असे होऊ नये. कारण, सर्वच विभाग आपले आहेत. ज्या विभागावर अन्याय झालेला आहे त्या विभागातील शेतकरी देखील महाराष्ट्रातीलच आहे. आज पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर अशी वेळ आली तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी उद्ध्वस्त होतील, एवढी कारखानदारी पश्चिम महाराष्ट्रात आहे. पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर ऊसाची पिके उभी आहेत. त्या पिकाचे उद्या काय करायचे, हा मोठा प्रश्न आहे. म्हणून एकमेकांना नावे ठेवण्यापेक्षा सर्व विभागाचे प्रश्न वेगळे आहेत, याचा आपण विचार केला पाहिजे. सर्व विभागातील जमिनीची प्रत, पाण्याचे सोर्स वेगळे आहेत. म्हणून त्या दृष्टीने नियोजन करुन प्रत्येक विभागात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही आणि समजा एखाद्या विभागात अशी परिस्थिती निर्माण झाली तर त्यासाठी आपली पूर्व तयारी असली पाहिजे, असे कायम स्वरुपी नियोजन शासनाने करावे, अशी मी विनंती करतो. तसेच, शासनाने सध्याच्या परिस्थितीत राज्यात पाहणी दौरा करावा. आम्ही म्हणतो म्हणून नाही तर राज्यात विदारक आणि भयानक चित्र असल्यामुळे पाहणी दौरा करावा. आता पर्यंत राज्यात 1800 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. एखादा माणूस जीवन सुखकर होण्यासाठी काही तरी मागणी करीत असतो. परंतु, एखादा माणूस कसलीही मागणी न करता जीवनच संपवतो. आता

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर.......

पर्यंत शेतकरी परस्पर जीवन संपवत होता. परंतु, आता तर आम्हाला आत्महत्या करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी तो शासनाकडे मागणी करीत आहे. ही राज्याला कमीपणा आणणारी बाब आहे. शेतकरी आत्महत्येची परवानगी मागतात, ही चिंतेची बाब आहे. म्हणून शासनाने याबाबत उपाययोजना करणे गरजेचे आहे. शासनाने याबाबत उपाययोजना करावी आणि यावर कर्जमाफी हाच एकमेव मार्ग आहे. शासनाने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी.

सभापती महोदय, आमच्या शासनाने शेतकऱ्यांची कर्ममाफी केली होती. त्यावेळी काय झाले, असे उत्तर देऊ नये. आमच्या शासनाने कर्जमाफी दिली होती, म्हणूनच शेतकरी जगला. आमच्या शासनाने धाडसी निर्णय घेऊन शेतकऱ्यांना 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली होती. शासन एवढे धाडस कधीच करणार नाही, असे तुम्हाला वाटत होते. परंतु, आमच्या शासनाने धाडस केले आणि शेतकऱ्यांना 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली, हे निर्विवाद सत्य आहे. मी सांगू इच्छितो की, आमच्या शासनाने कर्जमाफी दिली म्हणून शेतकरी जगला. त्यामुळे शेतकऱ्यांनी उभारी मिळाली आणि तो आता पर्यंत टिकला. आता पुन्हा शेतकऱ्यांवर ती वेळ आली तर आपण त्यांना कर्जमाफी देऊ. आपण भूकंप झाला तर 11 हजार कोटी रुपयांची मदत देतो. मदत जरुर द्यावी, त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही. कोणी दु:खात असेल तर त्याला मदत दिली पाहिजे. परंतु, आपण दुसऱ्या देशातील, फॉरेनमधील गोरगरिबांना मदत देतो मग आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना मदत का द्यायची नाही, असा आमचा मुद्दा आहे. त्यासाठी लागणारी रक्कम जास्त नाही. माझे असे म्हणणे आहे की, केंद्रात आणि राज्यात तुमच्याच पक्षाचे सरकार सत्तेर आहे. एखादी योजना राबवायची असेल तर आपण त्यासाठी केंद्र शासनाकडून मदत आणली पाहिजे आणि खऱ्या अर्थाने शेतकऱ्याला अच्छे दिन आले असे वाटले पाहिजे. आपण अशा प्रकारची कृती करावी. सभापती महोदय, शासनाने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो आणि शासनाने ती विनंती मान्य करावी. कारण, यावर तेवढा एकच चांगला उपाय आहे. आपण तो उपाय करावा आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते व इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सर्वच सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी कर्जमाफी करावी, कर्जमुकती करावी, अशी मागणी केलेली आहे. या संदर्भात काय करायचे आहे, याबाबत शासनाने जरूर निर्णय घ्यावा. परंतु, मी माझे व्यक्तिगत मत स्पष्टपणे सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील शेतकरी सरकारकडे आशेने बघत आहेत. म्हणून शासनाने आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीमागे ठामपणे उभे आहोत असा विश्वास देणे अत्यंत आवश्यक आहे. मागील अनेक वर्षापासून आपले राज्य सातत्याने दुष्काळामध्ये होरपळत आहे. मागील वर्षी ओला दुष्काळ पडला होता, तर यावर्षी कोरडा दुष्काळ आहे. प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांवर काही ना काही नैसर्गिक संकट कोसळत आहे. त्यामुळे शेतकरी पिचून गेलेला आहे आणि त्याला उभारी देण्याचे काम आपले कर्तव्य म्हणून शासनाला करणे गरजेचे आहे. खऱ्या अर्थाने आज ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना आपण कोणती मदत करतो, हे महत्वाचे आहे.

सभापती महोदय, मी माहिती घेतली असता मला अशी माहिती मिळाली की, आज मराठवाड्यामध्ये जवळपास 74-75 टक्के पेरण्या झालेल्या आहेत. फक्त 25-26 टक्के पेरण्या झालेल्या नाहीत. ज्या ठिकाणी पेरण्या झालेल्या आहेत त्यातील बहुसंख्य पिके आज करपत आहेत. जर 2, 4, 8 दिवसात पाऊस पडला नाही तर दुबार पेरणी करता येईल काय, हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. दुबार पेरणी करायची असेल तर तेवढे बियाणे उपलब्ध आहे काय ? आज शेतकऱ्याची बियाणे खरेदी करण्याची ऐपत नाही. मग शासन त्यांना बी-बियाणे आणि इतर आवश्यक गोष्टी माफत देणार आहे काय आणि ज्यांची पेरणी झालेली नाही त्यांना सुध्दा आपण कोणती मदत करणार आहोत, हे अत्यंत महतवाचे प्रश्न आहेत. शासन या सर्व गोष्टींबाबत काय करीत आहे याकडे शेतकरी डोळे लावून बसलेले आहेत.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे...

गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांवर जी संकटे कोसळत आहे, त्यामुळे शेतकरी आत्महत्या करु लागला आहे. हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या विषयावर मी नंतर बोलणार आहे. परंतु महत्वाचा प्रश्न असा आहे की, ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली नाही किंवा त्याला दूबार पेरणी करावयाची आहे, त्या शेतकऱ्यांना शासन कोणत्या प्रकारे मदत करणार आहे. बी-बियांणे देऊन मदत करणार आहे की, त्यांना काही रक्कम अनुदान म्हणून देणार आहे, हा खरा महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, अनेक शेतकऱ्यांना विम्याचे पैसे मिळाले नाहीत, पैसा बँकेत जमा आहे परंतु तो पैसा शेतकऱ्यांपर्यंत पोहचला नाही. 1972 चा दुष्काळ आपण पाहिला आहे व त्या नंतरचे छोटेमोठे दुष्काळ आपण सर्वांनी पाहिले आहेत. 1972 चा सर्वात मोठा दुष्काळ होता असे आपण सर्व लोक मानतो. त्या दुष्काळात व आताच्या दुष्काळात मूलभूत स्वरूपाचा फरक आहे. 1972 च्या दुष्काळात पिण्याच्या पाण्याची कमतरता नव्हती. इतर सर्व गोष्टींची कमतरता होती. या दुष्काळता अन्नधान्यापासून माणसासाठी लागणारे पिण्याचे पाणी, जनावरांसाठी लागणाऱ्या पिण्याच्या पाण्याची कमतरता भासत आहे. आपण अन्नधान्य कोठून तरी आणू शकतो, परंतु पिण्याचे पाणी कोठून आणणार आहोत. अलीकडील काळात पाऊस पडला नाही तर गावे स्थलांतरीत करणार आहात काय ? याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे, हा सर्वात मोठा प्रश्न शासनापुढे निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, आपण देखील ग्रामीण भागातील आहात, आठवडी बाजारात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात जनावरे येत आहेत. त्यांना खरेदी करण्यासाठी कोणीच तयार नाही. आता सरकारने गोहंत्या बंदी कायदा केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपुढे सर्वच बाबींची अडचण निर्माण झालेली आहे. त्यामुळे या जनावरांचे काय करावे असा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारने गोहंत्या बंदी केली असल्यामुळे प्रत्येक जनावरामागे चाऱ्यासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी सरकार अनुदान देणार आहे काय ? हा विषय अत्यंत महत्वाचा आहे, ही जनावरे कोणी सांभाळावीत. ही जनावरे सांभाळण्याची सोय शेतकऱ्यांकडे नाही. ही जनावरे विकली जात नाहीत, त्यांना कोणीच घेत नाहीत. याबाबत देखील शासनाने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी शासन चारा छावणी सुरु

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे...

करणार आहे काय ? मागील काळात सरकारने चारा छावण्या सुरु केल्या होत्या. त्यामध्ये काही ठिकाणी गोंधळ झाला होता, अनेक लोकांनी भ्रष्टाचार केलेला आहे. हा भाग सोडून दिला तरी त्याचा लाभ लाखो शेतकऱ्यांना झालेला आहे. त्यामुळे हे सरकार चारा छावणी किंवा चारा डेपो सुरु करणार आहे काय ? प्रत्येक जनावरासाठी अनुदान देण्यात येणार आहे काय ? याबाबत शासनाला विचार करावा लागणार आहे. एवढीच उपाययोजना करुन भागणार नाही तर ग्रामीण भागातील लोकांना काम उपलब्ध करुन द्यावे लागणार आहे. दुष्काळ पडल्यामुळे त्यांना काय काम देणार, ते लोक काय खातील, काय करतील या सर्व गोष्टींचा शासनाला साकल्याने विचार करावा लागणार आहे. मजुरांना कामे देण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केली. शेतकरी व शेतमजुरांना अनेक वर्षापासून उत्पन्न नसल्यामुळे शेतकऱ्यांची मुले शाळा व कॉलेजमध्ये जातात, त्यांची फी ते कोठून भरतील असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, माझी शासनाला विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या मुले व मुलींची शाळा व कॉलेजची फी या वर्षी शासनाने माफ केली पाहिजे. ज्यांच्याकडे शेती नाही असे अनेक शेतमजूर मोठ्या प्रमाणात आहेत. ज्यांच्याकडे शेती आहे, ज्यांनी पेरणी केली, किंवा दूबार पेरणी करावयाची आहे त्यांना शासन मदत करेल. परंतु ज्यांच्याकडे शेती नाही, अशा शेतमजुरांचा उदरनिर्वाह मजुरीवर चालतो, त्यांच्याबाबत शासन काय विचार करणार आहे. हे सर्व प्रश्न सोडवित असताना अशा प्रकारे वारंवार नैसर्गिक संकट येणार नाहीत व संकट आले तर त्याचा कशा प्रकारे सामना करता येईल यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना केव्हा करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे हे सर्वात महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे उत्पादन खर्चात जोपर्यंत कपात होत नाही, तोपर्यंत शेतकऱ्याची परिस्थिती सुधारणार नाही. उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे, त्याप्रमाणात उत्पादित मालाला भाव मिळत नाही. हे देखील अनेक वर्षापासून आपण पाहत आहोत.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांनी दूधाच्या संदर्भातील विषय उपस्थित केला होता. सभापती महोदय, आपण देखील दूध व्यवसायात आहात. प्रती लिटर दुधाचा भाव पूर्वी किती होता व आज किती आहे. आज दुधाचा व्यवसाय संकटात सापडला आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे...

शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी दुधाच्या जोडधंद्याला शासनाने मदत केली तर व शेतकऱ्यांना अनुदान दिले तर हा शेतकरी निश्चितपणे वाचू शकेल, त्याला उभारी व आधार मिळू शकेल. दुधाचे भाव पडण्यामागे जागतिक कारण असल्याचे सांगितले जाते, हे खरे असले तरी मुंबईत आपण सर्व लोक राहतो. मुंबईत एका लिटरला 80 ते 100 रुपये देणारे ग्राहक आहेत. ग्रामीण भागातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना फक्त 17 ते 18 रुपये प्रती लिटर भाव मिळत आहे. मी मागे देखील बोललो होतो की, मुंबईत ग्राहकाला दुध मिळते त्याचे भाव फारसे कमी झालेले नाहीत. दुध उत्पादक करणाऱ्या लोकांना कमी भाव मिळत आहे, ग्राहकाला दुध कमी दराने मिळत नाही. असे का होते याचा सरकारने विचार केला पाहिजे. याबाबत शासनाने प्रती लिटर अनुदान देण्याचा निर्णय घ्यावा किंवा दुध उत्पादकाला भाव देणे बंधनकारक करावे असा कोणताही निर्णय करायचा असेल तो लवकर केला पाहिजे. दुध उत्पादक शेतकऱ्यांना वाढीव भाव मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांचा सर्वांगिण विचार करण्याकरिता त्यांना उभारी देण्यासाठी शासनाकडे विविध योजना आहेत, 75 ते 80 टक्के योजना केंद्र शासनाच्या आहेत, त्या योजनांचा पैसा राज्य सरकारकडे येत असतो. महाराष्ट्राच्या बजेटमधून केंद्रांच्या योजनांसह फक्त दोन ते अडीच हजार कोटी रुपये शेतीसाठी मिळतात. ग्रामीण भागात शेतीवर 55 ते 60 टक्के लोक अवलंबून आहेत. या वर्गासाठी बजेटमध्ये तरतूद पाच टक्के देखील नाही. इतकी तुटपुंजी तरतूद शासन शेतकऱ्यांसाठी करीत आहे. आपला देश शेती प्रधान आहे असे आपण मानतो. तरी देखील शेतकऱ्यांची इतकी मोठी हेळसांड कधीही झालेली आपण पाहिली नाही. गेल्या अनेक वर्षामध्ये कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी ही सर्व सरकारे शेतकऱ्यांच्या या प्रश्नांसाठी जबाबदार आहेत. शेतकरी व शेतमजुरांचे नाव घेऊन त्याच्यासाठी काहीच केले जात नाही. दुर्दैवाचा भाग असा आहे की, 75-80 किंवा 100 टक्के अनुदानाच्या केंद्र सरकारच्या योजना आता 50 टक्केवर आणल्या जात आहेत. तसा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. त्यामुळे या योजनांचे पैसे राज्य सरकारला कमी मिळणार आहेत. 50 टक्के निधी राज्य सरकारला द्यावा लागणार आहे. निती आयोगाच्या माध्यमातून राज्य सरकाला 30 ते 42 टक्के निधी मिळतो. त्यातून राज्याला चांगला निधी मिळू शकतो. परंतु शेतकऱ्यांच्या एकून योजनांचे पैस`मात्र कमी झाले आहेत.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे...

सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत सरकारला नम्रपणे विनंती आहे की, आघाडी सरकारमधील तत्कालीन कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी शेतीकरिता स्वतंत्र अर्थसंकल्प असावा अशा पध्दतीचा प्रस्ताव दिला होता.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे......

हा प्रस्ताव अत्यंत चांगला होता. तो शेतकऱ्यांना मदत करणारा, शेतकऱ्यांचा विचार करणारा, शेतीवर अवलंबून असणाऱ्या जोडधंद्यांचा विचार करणारा प्रस्ताव होता. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे सरकार चांगले काम करीत आहे. माझी या निमित्ताने सरकारला विनंती आहे की, या राज्यातील शेतकऱ्यांना कायमस्वरुपी दिलासा देण्याकरिता पुढील वर्षापासून कृषी खात्यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करावा. तसे केले तरशेतकऱ्यांच्या दृष्टीने सकारात्मक परिणाम होऊ शकतो. आज कृषी विभागाला 2000 कोटी रुपये सुध्दा बजेट दिले जात नाही. कृषी विभागासाठी किमान 10 हजार कोटी रुपये तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी उपाययोजना करण्यात यावी.

सभापती महोदय, प्रत्येक वेळेला दुष्काळ पडला की चर्चा होते आणि शासनाकडून हजारो कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले जाते. तहान लागल्यानंतर विहीर खोदण्याचा प्रकार करण्यापेक्षा तहान लागण्यापूर्वी विहीर खोदली तर अधिक उपयोगाचे होईल. म्हणून कायमस्वरुपी उपाययोजना करणे, पायाभूत सुविधा निर्माण करणे याबरोबर जोडधंदे उभे करण्याकरिता शेतकऱ्यांना मदत करण्याची गरज आहे असे मला वाटते. त्यासाठी प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात कृषी विभागासाठी 10 हजार कोटी रुपयांची तरतूद करणे गरजेचे आहे. हे केल्याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र थांबणार नाही.

सभापती महोदय, शासनाकडून वेगवेगळया गोष्टींबाबत आयोग नेमले जातात, समित्या नियुक्त केल्या जातात. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होत आहेत, कशामुळे होत आहेत, शेतकऱ्यांच्या अडचणी काय आहेत, त्यांचे दुखणे काय आहे, म्हणणे काय आहे हे जाणून घेण्यासाठी एखादी समिती किंवा आयोग मागील सरकारने नेमला नाही किंवा या सरकारने देखील नेमलेला नाही. सरकारने या प्रश्नाच्या मुळाशी का जाऊ नये? याचा विचार होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सरकारच्या वतीने शेतीसाठी पाण्याची सोय व्हावी म्हणून मोठमोठी धरणे बांधण्यात आली. कालांतराने नागरीकरण वाढत गेले, मोठमोठी शहरे उदयास आली. या शहरातील लोकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी धरणासाठी पाणी साठा राखून ठेवण्यात आला. आधुनिकीकरणासाठी पाणी राखून ठेवण्यात आले. शेतीच्या पाण्यासाठी निर्माण केलेल्या धरणातून शेतीला पाणी मिळणे कठीण होऊ लागले आहे. शेती आणि शेतकरी पाण्यापासून वंचित होत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे......

आहे, त्याचा साकल्याने विचार होण्याची गरज आहे. उत्पादन खर्च कमी करावयाचा असेल तर काही पर्याय आपल्याला स्वीकारावे लागतील. उत्पादन घेत असताना पीक उत्पादन वाढ कशी होईल याबरोबर सामुहिक शेतीचा, गट शेतीचा उपयोग करता येईल का याचाही विचार झाला पाहिजे. त्याबरोबर आंतर पीक घेण्याचा विचार करणार की नाही? पाण्याची बचत करण्यासाठी ठिबक, तुषार सिंचन योजनांवर भर देणे आवश्यक आहे. महिला बचत गटांप्रमाणे शेतकऱ्यांचे गट तयार करुन त्यांना वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण देऊन ग्रामोद्योग, कुटिरोद्योग, जोडधंद्याकडे आकर्षित करता येईल का हेही पाहणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आघाडी सरकारच्या काळात कोरडवाहू तालुक्यांसाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करण्याची बाब विचाराधीन होती. परंतु तसे महामंडळ स्थापन करण्यात आलेले नाही. महाराष्ट्रातील काही तालुक्यांमध्ये सातत्याने दुष्काळ पडतो, त्यावर उपाय म्हणून कोरडवाहू तालुक्यांकरिता स्वतंत्र महामंडळ नेमून त्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन द्यायचा, जेणेकरुन त्या कोरडवाहू तालुक्यातील शेतीला वेगळा पर्याय देता येऊ शकतो. त्यामुळे शासनाने त्वरित कोरडवाहू तालुक्यासाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण केले तर फार मोठा फरक पडू शकतो.

सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा होत असताना शेतकऱ्यांना मानसिक आधार देणे गरजेचे आहे असे मला वाटते. पुढील काळात शेतकरी आत्महत्या करणार नाही यासाठी त्याला विश्वास देणे गरजेचे आहे. शेतकऱ्याच्या घरातील विदारक परिस्थिती आपण पाहिली आहे. काल महसूल राज्यमंत्री यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या शेतावर पेरणीचा चांगला प्रयोग केल्याचे आम्हाला वृत्तपत्रातून वाचायला मिळाले. परंतु दुबार पेरणी करण्याचे संकट उभे असल्यामुळे महसूल राज्यमंत्र्यांना पुन्हा पेरणी करावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बीड जिल्हयामध्ये ज्या ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी जाऊन मी स्वत: 25-25 हजार रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसांना 1 लाख रुपयांची आर्थिक मदत दिली म्हणजे कुटुंब सावरले जाते असे नाही. शेतकरी आत्महत्या करणार नाही या दृष्टीने नियोजन करणे गरजेचे आहे, त्यासाठी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शासनाने पावले उचलली पाहिजेत. जनावरांना पिण्याचे पाणी, चारा उपलब्ध करुन देण्यासाठी चारा डेपो व छावण्या सुरु केल्या पाहिजेत. दुबार पेरणीची वेळ आली तर शेतकऱ्यांना बियाणे

...3..



श्री.विनायक मेटे......

मोफत उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. मी केलेल्या सूचनांचा शासनाने निश्चितपणे विचार करावा एवढे सांगून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर दीर्घकाळ चर्चा सुरु आहे. मी कोणत्याही मुद्याची पुनरावृत्ती न करता माझे विचार मांडणार आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे. त्या संदर्भात तपशील शासनाकडे उपलब्ध झालेला आहे. दररोज 9 ते 10 शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या बाबीकडे आपण कोणत्या नजरेने किंवा हृदयाने पाहतो असे मी सभागृहाला आवाहन करतो. शेतकरी आत्महत्या करतो त्याबाबत कारणमिमांसा सांगितली जाते. आत्महत्या करण्यामागे कर्जबाजारीपणा हे एक प्रमुख कारण आहे असे सांगितले जाते. कर्जबाजारीपणा असला तरी शेतकरी आत्महत्या का करतो? या प्रश्नाचा खोलवर विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते. प्रत्येक माणसाला जगायचे असते, जगावेसे वाटते. जगण्यावर प्रत्येक माणसाचे प्रेम असते. मग अशा चांगल्या जगण्याला शेतकरी नकार का देतो याचा विचार झाला पाहिजे.

नंतर आर.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड...

शेतकरी चांगल्या जगण्याला नकार का देतो याचा आपण विचार केला पाहिजे. नापिकी किंवा दुष्काळामुळे त्याची परवड होत असल्यामुळे, समाजामध्ये त्याची बेअब्रू होत असल्यामुळे त्याला जगण्याचा कुठलाही मार्ग दिसत नसल्यामुळे तो आत्महत्या करतो. आपल्या लोकशाहीच्या दृष्टीने हा प्रश्न मला अतिशय गंभीर वाटतो. भारतीय राज्य घटनेतील कलम 21 नुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला जगण्याचा मूलभूत अधिकार दिलेला आहे. आपल्या देशातील प्रत्येक माणूस हा जगला पाहिजे. त्यासाठी लोकशाही राज्यातील जी संस्था आहे तिने आपले काम व्यवस्थितपणे केले पाहिजे. असे असताना आमचा शेतकरी बांधव आज आत्महत्या का करीत आहे, तो आज स्वतःचा जगण्याचा मूलभूत अधिकार का नाकारत आहे, या गोष्टीचा आपण गंभीरपणाने विचार करणार आहात की नाही. शेतकरी आपले कुटुंब, नातेवाईक, समाज, देश यांच्याकडे पाठ फिरवून सोडून का जात आहे, याचा खऱ्या अर्थाने विचार करण्याची गरज आहे. मला असे वाटते की, आपण याबाबत गंभीरपणे विचार करीत आहात असे दिसत नाही. देशातील शेतकरी असेल, नागरीक असेल तो आत्महत्येच्या टोकाला का जातो याचा विचार केला पाहिजे. जीवन जगण्याची उर्मी नसल्यामुळे माणूस आत्महत्या करण्याच्या टोकाला जातो. त्याला या लोकशाही देशातील सरकार आश्वासन देऊ शकत नाही काय असा प्रश्न मला सरकारला विचारावासा वाटतो. आपल्या देशातील प्रत्येक माणूस मग तो शेतकरी असेल, कामगार असेल किंवा अन्य कोणी असेल तो जगला पाहिजे. देशातील प्रत्येक माणसाला जगावेसे वाटले पाहिजे ही उत्स्फूर्त मूलभूत अधिकारीची बाब आहे. पण आज राज्यातील शेतकरी जगण्याला नकार देत आहे. तो आत्महत्या करीत आहे. त्याला या सरकारवरच विश्वास वाटत नाही. मी जगलो तरी माझी अवहेलना होणार आहे असे त्या शेतकऱ्याला वाटते. मला जगण्याचा कुठलाही मार्ग दिसत नाही असे त्याला वाटते. माझ्या जगण्याच्या सर्व दिशा बंद झाल्या आहेत असे त्याला वाटते. असे का होते ? त्यामुळे तो शेतकरी आज अशा प्रकारे निराश का होत आहे याचा आपण सर्वांनी विचार करणे गरेजचे आहे. तो अशा प्रकारे उद्‌ध्वस्त का होत आहे, याचा आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड...

मी गेली तीन वर्षे या सदनामध्ये आहे. दरवर्षी महाराष्ट्रातील कुठल्या ना कुठल्या भागात दुष्काळ पडतो. कधी प्रचंड ढग फुटी होते, तर कधी अवकाळी पाऊस पडतो. आपण दरवर्षी या प्रश्नावर चर्चा करतो आणि त्याच त्याच गोष्टींचा पुनर्विचार करतो की, असे का होते ? आम्ही काळा बरोबर पुढे का जात नाही ? आपल्या लोकशाहीला 65 वर्षे होऊन गेलेली आहेत. आपल्या देशामध्ये पाऊस पडला नाही, निसर्गाचा कोप झाला तर शेतकऱ्यांची धुळदांड उडते. त्याचे जीवन मुष्किल होते. अशा शेतकऱ्यांना आधार, मदत देण्याचा मूलभूत विचार आपण का करीत नाही. हा विचार आपण कधी करणार आहात ? दरवर्षी दुष्काळ आला की चर्चा करण्यात येते. मग त्याला जगविले पाहिजे अशा प्रकारची चर्चा करण्यात येते. मग तात्कालीन उपाययोजने पेक्षा सरकारने मूलभूत विचार केला पाहिजे की, जर या वर्षी अमुक अमुक भागामध्ये पाऊस पडला नाही तर त्याची नोंद ऑटोमॅटीकली करण्यात येईल व त्यावर उपाययोजना देखील ताबडतोबीने सुरू होईल. पण असे होत नाही. त्यामुळे विरोधी पक्षाला उभे रहावे लागते. ठराव मांडून भाषण करायला लागते. विरोधी पक्षाचा ठराव असल्यामुळे शेतकरी विरोधी पक्षाच्या बाजूने जातील असे सरकारला वाटते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी आपण काही तरी दिले पाहिजे असे शासनाला वाटते. त्यातून मग शेतकऱ्यांना काहीना काही तरी देण्याचा प्रयत्न होतो. पण असे का होते? आपण नॅचरल कोर्समध्ये असा विचार का करीत नाही की, जेव्हा जेव्हा या देशामध्ये, या महाराष्ट्रामध्ये कुठेना कुठे दुष्काळ पडतो तेथे आमची यंत्रणा ही ताबडतोबीने हलली पाहिजे. त्याच्या नोंदी घेतल्या पहिजेत. कुठल्या भागात किती पाऊस पडला याची नोंद करून कुठल्या भागासाठी मदत करायची हे आपण ठरविले पाहिजे. आपण शेतकऱ्यांना मदत करायची हे ठरविलेच पाहिजे. यासाठी आम्हाला दरवर्षी कन्व्हीन्स का करावे लागते ? शेतकऱ्यांचा प्रश्न गंभीर झाल्यानंतर आपण शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे, अशा प्रकारचा मूलभूत विचार करण्याची गरज आहे. आम्हाला शेतकऱ्यांसाठी दरवर्षी मदत द्यावी असे ओरडावे लागत आहे, मोर्चे काढावे लागत आहेत. आपण सर्वांनी ठरविले पाहिजे की, महाराष्ट्रातील कुठल्याही भागात दुष्काळ पडला तर तेथील यंत्रणा ताबडतोब कामाला लागली पाहिजे व त्या प्रमाणात शेतकऱ्यांना मदत मिळाली ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड...

पाहिजे. यात आपल्याला आणेवारी काढावी लागते. त्यासाठी वर्षे जाते. दरम्यानच्या काळात शेतकरी उद्ध्वस्त होतो आणि आत्महत्येला प्रवृत्त होतो. हा जो प्रकार सातत्याने सुरु आहे तो कायमचा बंद झाला पाहिजे. यासाठी कायदा देखील करण्याची गरज आहे असे मला स्वत:ला वाटते. आज आपण निसर्गाला सामोरे जाण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे.

आत्महत्या रोखण्यासाठी स्वामीनाथन समिती, वैजनाथन समिती, नरेंद्र जाधव समिती अशा अनेक समित्या नेमल्या आहेत. इंदिरा गांधी इन्स्टिटय़ूट ऑफ डेव्हलपमेंट, यशदा यांचे देखील अहवाल आहेत. हे सर्व कशासाठी केले होते. या समित्यांवर आपण तज्ज्ञ नियुक्त केले होते. या समित्यांनी कारणे व उपाययोजना सुचविल्या असतील तर त्याचा आपण विचार करणार आहात की नाही. या समित्यांचे जे अहवाल आलेले आहेत त्याचा साकल्याने गांभीर्यपूर्वक अभ्यास करुन एकत्रितपणे वचार करावा. त्याचा आपण विचार केला तर आपल्याला कायमस्वरुपी उत्तर मिळतील असे मला वाटते. शेतकऱ्यांच्या मृत्युची कारणे आपल्याला मिळत असतील तर शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने जगण्याची उर्मी देण्याच्या दृष्टीने एक कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे संकट रोरावत असताना, घोंघावत असताना अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्ही कर्ज मुक्ती देणार नाही असे सांगितले. कर्ज मुक्ती न देणारे ठरविणारे आपण कोण आहात ? आपण का म्हणून अशा प्रकारे बेजबाबदारपणाचे स्टेटमेंट केले आहे ? आपल्या राज्य घटनेमध्ये संसदीय पद्धतीच्या सरकारची संकल्पना आहे. संसदीय पद्धती प्रमाणे आमचे सरकार स्थिर नसेल. केंद्रातील सरकार स्थिर असेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीच्या समोर अध्यक्षीय पद्धत आणि संसदीय पद्धत यासंबंधी खूप प्रदीर्घ अशी चर्चा केलेली आहे. संसदीय पद्धतीने स्थापन झालेले सरकार हे जबाबदार सरकार असते. अमेरिकेचे सरकार स्थिर सरकार असू शकते. भारतातील सरकार हे स्थिर नसेल, पण ते जबाबदार असते अशा प्रकारचे विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले आहेत. जबाबदार सरकार म्हणजे काय ?

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड...

आपल्या राज्यात कुठलाही प्रश्न निर्माण झाली की, त्यावर चर्चा करतो. ही चर्चा आपण लक्षवेधी सूचना, प्रश्नोत्तरे यासह सर्व संसदीय आयुधांच्या मार्फत करतो व सरकारकडून त्याचा रिस्पॉन्स मागतो की, आपण या प्रश्नासंबंधी कोणती उपाययोजना करणार आहात ? मग सरकार जबाबदारीने सांगते की, आम्ही अमुक एक करणार आहे. पण असे होत नाही. आज शेतकऱ्यांच्या दररोज आत्महत्या सुरू आहेत. आपण जर जबाबदार असाल तर या आत्महत्या थांबल्या पाहिजेत. त्या का थांबत नाही ? दररोज कुठे ना कुठे बलात्कार होत आहे. त्यावर उपाययोजना होत नसल्यामुळे बलात्कार होतच आहेत. आपण किती भयानक स्वरूपाच्या गोष्टींबद्दल येथे चर्चा करतो. आपण अनेक प्रश्नांसंबंधी येथे चर्चा करतो. असे का होत आहे ? आज आम्ही जबाबदार सरकार म्हणून काम करण्यास कमी पडत आहोत काय याचे आज आत्मपरीक्षण देखील सरकारने करणे गरजेचे आहे. मी अधिक जास्त बोलणार नाही. आपले जबाबदार सरकार असेल तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. आपण नेहमी महाराष्ट्र पुरोगामी राज्य आहे असे म्हणतो. सर्वात आधुनिक राज्य म्हणून आपण आपल्या राज्याचा उल्लेख करतो. फुले, शाहू, आंबेडकरांचे राज्य असे म्हणतो. पण त्याच महाराष्ट्रातील शेतकरी आज आत्महत्या करतात त्यावेळी आम्हाला लाज वाटली पाहिजे. ती लाज आम्हाला वाटत नाही असे वाटते. ते आज आमच्या अंगवळणी पडले आहे. हे का होते आहे ? त्याचे कारण देखील सांगणार आहे. या समित्यांनी आपले अहवाल दिले आहेत. सावकारीमुळे त्रस्त होऊन शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. शेतकऱ्यांना फक्त 27 टक्के कर्ज बँकांकडून मिळते. 73 टक्के कर्ज हे खासगी सावकार, नातेवाईक किंवा इतर व्यापाऱ्यांकडून मिळते. त्यामुळे आम्हाला उत्तर मिळते की, केवळ सावकारांनी छळल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे. सावकाराने छळल्यामुळे शेतकरी आत्महत्या करत असेल तर त्यासंबंधी आपण काही विचार करणार आहात की नाही ? आज आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो की, सावकाराच्या छळामुळे शेतकरी गावामध्ये आत्महत्या करीत आहे. हे जरे खरे असेल तर त्यासंबंधी आपली भूमिका काय आहे ?

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड......

मी सरकारला आपल्या माध्यमातून विचारु इच्छितो की, मधील काळात शासनाने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याच्या नावाखाली सावकारांना पैसे दिले होते ते का दिले ? सावकारांच्या छळामुळे शेतकरी आत्महत्या करतात त्यामुळे सावकारांवर शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात खुनाचे गुन्हे नोंदवले गेले पाहिजेत.

सभापती महोदय, लग्नानंतर बायकोचा नवऱ्याने छळ केला व बायको नवऱ्या विरुध्द कलम 498 खाली गुन्हा दाखल करु शकते व बायको मेली तर नवऱ्यावर खुनाचा गुन्हा दाखल होतो. नवऱ्याने बायकोचा छळ केल्यामुळे नवऱ्याविरुध्द गुन्हा दाखल होतो परंतु येथे तर सावकारच शेतकऱ्यांचा छळ करीत असतील व त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत असतील तर सावकारावर खुनाचे गुन्हे नोंदवले गेले पाहिजेत. आपल्याला म्हणावयाचे असेल तर आपण म्हणू शकता की, आत्महत्या करणारे शेतकरी वेडे आहेत, शेतकरी दारुडे आहेत. सावकारांच्या छळामुळे शेतकरी आत्महत्या करीत असतील तर सावकारांच्यावर प्रथम कारवाई झाली पाहिजे अशी मी या ठिकाणी मागणी करतो. खऱ्या अर्थाने सावकारांच्या मुसक्या बांधल्या गेल्या पाहिजेत.

सभापती महोदय, मी ग्रामीण भागतही राहत असल्यामुळे मला या विषयाची पूर्ण जाणीव आहे. शेतकऱ्याच्या दारात सावकार आला तर शेतकऱ्याचा तो फार मोठा अपमान असतो व शेतकऱ्यावर जप्ती आली तर त्याला आत्महत्याच करावीशी वाटते. त्यामुळे या गोष्टीमुळे मी शासनाला असे आवाहन करु इच्छितो की, शासनाने सावकारांच्या विरोधी भूमिका घेतली पाहिजे. असे असताना आपण सावकारांचे कसले कर्ज फेडता ? मी आपल्याला विचारु इच्छितो की, सावकारांच्या छळामुळे आतापर्यंत किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्याची माहिती या सभागृहाला देण्याची आवश्यकता आहे. सावकारांमुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असेल तर तुम्ही अशा सावकारांवर कोणती कारवाई केली आहे याचाही तपशील शासनाने देण्यची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या नवीन सरकारमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे वाटत होते. परंतु नवीन सत्तापालट झाली तरी देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरुच आहेत. नवीन सरकार आल्यानंतर पहिल्या महिन्यात 77 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. यामध्ये मराठवाडयातील

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड......

22 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मुख्यमंत्र्यांनी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या पत्नीला दिलासा दिल्यानंतर त्या शेतकऱ्याच्या पत्नीने देखील आत्महत्या केली होती. इतक्या गंभीर घटनेच्या संदर्भात हे शासन शेतकऱ्यांना दिलासा देणार आहे की, नाही ?

सभापती महोदय, मला असे वाटते की, आता दर वर्षी एका भागात पाऊस पडेल तर दुसऱ्या भागात पाऊस पडणार नाही. आपण निसर्गाच्या विरुध्द लढाई करु शकत नाही. परंतु नैसर्गिक संकटातून जे प्रश्न निर्माण होत असतात त्या प्रश्नांचा आपण सांकल्याने विचार करुन त्यासंदर्भात उपाययोजना करु शकतो. सरकार कोणत्याही पक्षाचे असू द्या सरकारची जबाबदारी आहे की, अगोदरच्या सरकारपेक्षा नवीन सरकारने अधिक चांगले काम करुन दाखवले पाहिजे.

सभापती महोदय, चर्चेच्या अगोदरच शासनाकडून स्टेटमेंट केले गेले की, आम्ही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार नाही. हे जे स्पष्टीकरण दिले गेले ते बेजबाबदारपणाचे आहे असे मला स्वतःला वाटते. त्यामुळे मी शासनाला आवाहन करतो की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कायमचा दिलासा देण्यासाठी शासनाने कायमस्वरुपी यंत्रणा निर्माण करावी, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त ) :सभापती महोदय, नियम 260 अंतर्गत शेतकऱ्यांच्या संदर्भातील चर्चेवर मला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, विधिमंडळाचे अधिवेशन सुरु झाल्यापासून सतत तीन दिवस आंदोलन सुरु होते. सभागृहाच्या पायऱ्यावर, रस्त्यावर आंदोलन सुरु होते. आमच्या पिप्स रिपब्लीकन पक्षाने दि.15 जुलै, 2015 रोजी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या संदर्भात मोठा मोर्चा काढला होता. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने मोर्चे काढले, आंदोलने केली. परंतु सरकारमात्र शेतकऱ्यांच्या संदर्भात झोपेचे सोंग घेतल्यासारखे दिसते आहे. आज शेतकरी सातत्याने आत्महत्या करीत आहेत, ती राज्याकरिता अत्यंत लांच्छनास्पद बाब आहे. शेतकऱ्याला मरता येत नाही म्हणून तो जगत आहे. शेतकऱ्याला जगणे असह्य होत असल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत व अशा प्रकारच्या दृष्ट चक्रात आमचा शेतकरी आज सापडला आहे. जेव्हा सन्मानाने जगण्याचे सर्व मार्ग बंद होतात तेव्हा शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत असतो.

सभापती महोदय, या चर्चेचे सर्वात महत्वाचे कारण असे आहे की, विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु होण्याच्या पूर्व संध्येला सरकारच्या वतीने चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता, त्या कार्यक्रमावर विरोधी पक्षाने पूर्णपणे बहिष्कार टाकला होता. त्यावेळच्या प्रेस कॉन्फरन्समध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी "कर्जमाफी देणे शक्य नाही" असे वक्तव्य केले तेव्हापासून महाराष्ट्रातील शेतकरी हवालदिल झाला आहे. त्याला जगण्याचे दुसरे कोणतेही साधन आता राहिले नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या एका स्टेटमेंटमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येमध्ये प्रचंड वाढ झाली. मागील 15 दिवसामध्ये दर 8 तासाला एक शेतकरी आत्महत्या करीत आहे. एकटया यवतमाळ जिल्हयात जुलै महिन्यात 14 शेतकऱ्यांनी आतापर्यंत आत्महत्या केलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी आम्ही राष्ट्रीयकृत बँकाना शेतकऱ्यांना मदत करावयास भाग पाडू. आमच्या राज्यातील ज्या राष्ट्रीयकृत बँका आहेत त्या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची मदत करीत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. या राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना आपल्या दारात सुध्दा उभे करीत नाहीत. असे असतांना मुख्यमंत्री सांगतात की, आम्ही राज्यातील राष्ट्रीयकृत बँकाना शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी मजबूर करु. परंतु या सरकारच्या पायाखाली काय

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे ......

जळते आहे ते त्यांना कळत नाही असे वाटते. असे असताना आश्चर्य या गोष्टीचे वाटते की, केंद्रीय वित्त सचिव श्री. हसमूख अडिया यांनी दि.8 जुलै, 2015 रोजी आपल्या राज्याचे मुख्य सचिव श्री.स्वाधीन क्षत्रिय यांना पत्र लिहून कळवले आहे की, महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीयकृत बँकांना शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी सक्ती करु नये. अशा प्रकारचा दम राज्याच्या मुख्य सचिवांना केंद्रीय वित्त सचिवांनी दिलेला आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रीयकृत बँकेच्या संदर्भात जे वक्तव्य केले आहे ते विरोधाभासी आहे. यामध्ये राज्यसरकारचा, केंद्रसरकारचा बोलण्याचा विरोधाभास आहे याचा देखील खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, आमचा शेतकरी शासनाकडे आत्महत्या करण्यासाठी परवानगी मागत आहे यावरुन शेतकऱ्यांची एकंदर काय परिस्थिती आहे हे लक्षात येते. संसदीय लोकशाही पध्दतीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव यांनी खुलासा केलेला आहे. संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये ज्याला आपण जबाबदार सरकार म्हणतो ते सरकार राज्यातील जनतेला जबाबदार असते. जबाबदार सरकार अशा प्रकारे जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करीत असेल तर हे सरकार खरोखरच जनतेचे, शेतकऱ्याचे, शेतमजुराचे, गरिबांचे, कष्टकऱ्यांचे, कामगारांचे, बहुजनाचे सरकार आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे यासंदर्भात शासनाने गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, नवीन सरकार आले तेव्हा राज्यातील शेतकऱ्यांचा आशा पल्लवित झाल्या होत्या. या सरकारला ग्रामीण भागातून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाल्यामुळे मोठया प्रमाणात भाजपा व शिवसेनेची मंडळी निवडून आली व हे गतिमान सरकार सत्तेवर आले. हे सरकार गतिमान असले तरी ते नीती मान आहे काय ? नीती कितीही चांगली असली,पण नियत चांगली नसेल तर शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्याच लागतील. आपली नीती व नियत शेतकऱ्यांच्या संदर्भात चांगली असेल तर शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळच येणार नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्यांकडून पीक विम्याचे 260 कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांकडून घेतल्यानंतरही पीडित शेतकऱ्यांना त्या विम्याची रक्कम का परत केली जात नाही, सरकार याबद्दल काय करीत आहे ?

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सरकारने विमा कंपन्यांना जाब का विचारत नाही ? हे सरकार विमा कंपन्यांची दलाली करण्याचे काम करीत आहे काय ? कोण म्हणते कर्जमुक्ती तर कोण म्हणते कर्जमाफी, फक्त शब्दछल सुरु आहे. यापैकी काहीही करा पण शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून वाचवावे, अशी आमची मागणी आहे. सरकारने या संदर्भात योग्य त्या उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, राज्यावर कोट्यवधी रुपयांचे कर्ज आहे. हे राज्य कर्जबाजारी झालेले आहे. राज्यावर आणखी कर्जाचा बोजा वाढला तरी चालेल, परंतु शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी त्यांना जास्तीत जास्त मदत कशी करता येईल हे सरकारने पाहिले पाहिजे.आज शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरु झालेले आहे. हे सत्र कसे थांबविता येईल, त्यादृष्टीने सरकारने उपाययोजना करणे आवश्यक आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. मी त्या सूचनांचे स्वागत करतो.

सभापती महोदय, धरणाची निर्मिती ही प्रामुख्याने सिंचनासाठी झालेली आहे. छोटी धरणे, मोठी धरणे, मध्यम स्वरुपाची धरणे बांधण्यात आली. परंतु अनेक धरणांतील पाणी सिंचनासाठी न देता ते उद्योगधंद्याकडे वळविले जाते आणि उद्योग वाढत आहे व शेतकरी मरत आहे. तेव्हा धरणाच्या पाण्याचे व्यवस्थापन, पाणवठ्याचे व्यवस्थापन करण्याची आवश्यकता आहे. सिंचनासाठी किती पाणी द्यावे, उद्योगासाठी किती पाणी द्यावे याचा देखील विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर यांनी सांगितले की, कारखान्यामध्ये उत्पादित होणाऱ्या मालाची किंमत कारखानदार ठरवितो. पण शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये जे उत्पादन होते त्याची किंमत ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे ठिकठिकाणी शोषण होत आहे आणि हे शोषण थांबले पाहिजे.

..2..

UNCORRECTED COPY / / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, आज शेतकरी संकटात आहे तर शेतीवर अवलंबून असलेला शेतमजूर देखील संकटात आहे. शेतकऱ्यांना खायला काही मिळत नाही तर शेतमजुरांच्या ताटात काय पडणार अशाप्रकारची स्थिती राज्यात निर्माण झालेली आहे. तेव्हा धरणातील पाण्याच्या बाबतीत गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मध्यंतरी अवकाळी पाऊस झाला, गारपीट झाली. नंतर पाऊस आला व लगेच थांबला तो आजपर्यंत थांबलेला आहे. पुन्हा दुबार पेरणी करायची म्हटली तर पाऊस पडणार की नाही याचा नेम नाही. शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी बियाणे, खते आणि ज्या काही आवश्यक बाबी आहेत त्याचा पुरवठा सरकार करणार आहे काय ? सरकार त्यांना अनुदान म्हणून काही देणार आहे काय, याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस म्हणाल्या की, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे खापर सरकारवर फोडू नका. मग शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे खापर कोणावर फोडायचे ? शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे खापर निसर्गावर फोडायचे काय ? एक जबाबदार सरकार म्हणून जी काही नैसर्गिक आपत्ती असेल त्यातून मार्ग काढून शेतकऱ्यांना कसे वाचविता येईल, हा प्रयत्न करणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे आणि ही नैतिक जबाबदारी सरकारने स्वीकारावी अशी आमची मागणी आहे. मी या संदर्भात जास्त काही बोलणार नाही. मी काही शेतकरी नाही. आमच्याकडे एक इंच देखील जमीन नाही. पण मी राज्यामध्ये फिरतो. राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था पाहतो. देशातील सर्वात दुर्दैवी प्राणी कोण असेल तर तो आमचा शेतकरी आहे. तो निसर्गावर पूर्णपणे अवलंबून आहे. Indian Agriculture dances on the tune of Monsoon निसर्गाच्या तालावर नाचणारी आपली शेती आहे. ज्या शेतकऱ्याकडे 100 एकर, 150 एकर शेती आहे असे शेतकरी आत्महत्या करीत नाही. जे अल्पभूधारक आहेत, ज्यांच्याकडे तीन-चार एकर शेती आहे असे शेतकरी आत्महत्या करतात. आमचा बहुजन समाजाचा शेतकरी आहे, कष्ट करणारा शेतकरी आहे, जो आपल्या स्वतःच्या शेतात राबतो आणि दुसऱ्याच्या शेतामध्ये राबून स्वतःचा उदरनिर्वाह करतो असे शेतकरी आत्महत्या करतात.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी शेतीसाठी वेगळा अर्थसंकल्प मांडता येऊ शकतो काय अशी विचारणा केली, त्याचा सरकारने गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. ज्याप्रमाणे केंद्र सरकार मुख्य अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी रेल्वेचा अर्थसंकल्प सादर करण्यात येतो. त्याप्रमाणे राज्याचे मुख्य अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वी शेतीचे अंदाजपत्रक सादर करता येऊ शकते काय याचा विचार सरकारने करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न आहेत. पण आज शेतकऱ्यांची कर्जमाफी करणे नितांत आवश्यक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या कर्जमाफी करणे शक्य नाही या एका स्टेटमेन्टमुळे शेतकऱ्यांचा जगण्याचा आधार गेलेला आहे. तेव्हा शेतकऱ्यांना कर्जमाफी करणे अत्यंत आवश्यक आहे, अशी आमची प्रामुख्याने मागणी आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे शेतकऱ्यांचे खरे कैवारी आहेत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना आश्वासन दिले की, आम्ही तुमचे कर्ज माफ करू, शेतकऱ्यांना आत्महत्या करु देणार नाही. श्री.दिवाकर रावते यांनी विदर्भात हजारो शेतकऱ्यांना घेऊन मोर्चे काढले. ते आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी गेले. निवडणुकीपूर्वी वाटत होते की, शेतकऱ्यांचे कैवार घेणारे हे सरकार आहे. पण सत्तमध्ये नसताना शेतकऱ्यांचा कैवार घेतला आणि सत्तेवर आल्यावर मात्र ते शेतकऱ्यांचे वैरी कसे झाले ? सरकार वैरी झाले म्हणून शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत, याची जाणीव सरकारने ठेवावी. निवडणुकीच्या पूर्वीची आणि निवडणुकीच्या नंतरची अवस्था पाहिल्यानंतर आमचा शेतकरी म्हणतो.

तेरी सरकार में धुंध बहुत है,
अपने दिखते नहीं और जो दिखते हैं,
उनमें अपने कोई नहीं हैं.

आज शेतकऱ्यांची अशी अवस्था झालेली आहे. या मायबाप सरकारला आमची विनंती आहे की, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवाव्यात. त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी सरकारने कर्जमाफी करावी, अशी मागणी करतो आणि या मागणीचा सरकार गंभीरपणे विचार करेल असा मला विश्वास वाटतो, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

जय भीम.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** महाराष्ट्र राज्यामध्ये गुटखा, पानमसाला, सुगंधित/स्वादिष्ट तंबाखू व सुपारी, उत्पादित चघळण्याची तंबाखू इत्यादी पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्रीवर बंदी

**मु.शी.:** महाराष्ट्र राज्यामध्ये गुटखा, पानमसाला, सुगंधित/स्वादिष्ट तंबाखू व सुपारी, उत्पादित चघळण्याची तंबाखू इत्यादी पदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वितरण आणि विक्रीवर बंदी संबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट

**मु.शी.:** राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने भूजल पातळीत कमालीची घट होऊन दुबार पेरणीचे निर्माण झालेले संकट, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, हेमंत टकले, भाई जगताप, जयंतवराव जाधव, जयंत प्र. पाटील, शरद रणपिसे, कपिल पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....)

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असताना मी जास्त वेळ घेणार नाही. या प्रस्तावावर बोलताना प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडली आहेत. परंतु या प्रस्तावावर बोलताना मी काही ठळक मुद्दे मांडणार आहे. शासनाला निर्णय घेताना योग्य होईल, कारणीभूत ठरतील किंवा सरकार चांगले उपक्रम राबवू शकेल असेच मुद्दे मी सरकारच्या निदर्शनास आणून देणार आहे. या सरकारच्या मनामध्ये खरोखरच शेतकऱ्यांविषयी तळमळ असेल तर हे सरकार शेतकऱ्यांच्या अनुषंगाने आवश्यक त्या गोष्टी करु शकते.

सभापती महोदय, एका बाजूला काल-परवा इस्त्रोने ब्रिटनची 1040 किलो वजनाची सामुग्री अंतराळात पाठविल्याच्या बातम्या येतात आणि दुसऱ्या बाजूला या सभागृहात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत चर्चा केली जाते. शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे उत्पादन केल्यानंतर आपण पोटभर जेवू शकतो, परंतु आज तो शेतकरी आत्महत्त्या करीत आहे हा विषय अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. जो शेतकरी तुम्हा-आम्हा सगळ्यांना खाऊ-पिऊ घालतो त्याची परिस्थिती अशी आहे की, "अब मैं राशन की कतारों में नजर आता हूं, अपने खेतों से बिछड़ने की सजा पाता हूं, ऐसे हालात में बाजार से कुछ लाता हूं, अपने बच्चों में उसे बांटकर शर्माता हूं." कदाचित यामुळे शेतकऱ्यांची तशी अवस्था झाल्यामुळे तो आत्महत्येस प्रवृत्त होत आहे. याला तुम्ही-आम्ही सर्वजण

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग....

कारणीभूत आहोत काय किंवा यावर आपण काही उपाययोजना करणार आहात काय, हे सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाणी आडवा-पाणी जिरवा, या योजनेपासून जलयुक्त शिवार अभियानापर्यंत अनेक चांगल्या योजना अंमलात आलेल्या आहेत. भारताची भौगोलिक परिस्थिती आणि पाणी रिचार्ज करण्याची क्षमता ही शास्त्रज्ञांच्या मतानुसार 437 बीसीएम आहे. महाराष्ट्राचा विचार केला किंवा एखाद्या प्रदेशाचा किंवा भागाचा विचार केला तर, त्या त्या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. कोकणात मोठ्या प्रमाणावर बसाल्ट आहे. विदर्भातील परिस्थिती वेगळी आहे. भूगर्भाची स्थिती आणि भूगर्भाचे ज्ञान असणारी यंत्रणा वेगळी आहे. आपण सांगू शकतो की, अमुक दिवशी आकाशात दोन चंद्र दिसतील, अशी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. आज पाण्याच्या रिचार्जची क्षमता आपण वेगवेगळ्या परिमाणानुसार बघत आहोत. आज सरासरी 437 बीसीएम रिचार्ज क्षमता असताना सुध्दा आपण ती पूर्ण करु शकलो नाही. अनेक योजना राबवून सुध्दा ही क्षमता वापरु शकलो नाही. रेन हार्वेस्टींग आणि इतर अनेक बाबी कमी खर्चाच्या आहेत. 2004 च्या सर्व्हेनुसार महाराष्ट्राची रिचार्ज क्षमता 2.40 बीसीएम होती. 2008 च्या अहवालानुसार ती 2.76 बीसीएम आहे. याचाच अर्थ आपण अजूनपर्यंत रिचार्जची सरासरी क्षमता गाठू शकलो नाही. जमिनीची रिचार्ज क्षमता असो की नसो, जमिनीला न तपासता त्यावर भर दिला जात आहे. या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळ्या उपाययोजना सांगितल्या आहेत. या निमित्ताने मला एवढेच सुचवावयाचे आहे की, या सरकारने निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्यांना हे सांगितले होते की, आम्ही सत्तेवर आल्यावर अमुक करु, तमुक करु. या सरकारने शेतकऱ्यांना स्वप्न दाखविले होते. शेतकऱ्यांना वाटले की, या सरकारला सत्तेवर बसविल्यास आपले काही तरी भले होईल, आपण उराशी बाळगलेले स्वप्न खरे होईल. परंतु हे सरकार सत्तेवर आल्यानंतर चार-सहा महिन्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. सरकार म्हणून आपण कमी पडत आहात. आपण या गोष्टीला जबाबदार आहात की नाही ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, विदर्भात दुष्काळ पडला होता त्यावेळी आम्ही तुमच्या पाठीशी आहोत हे सांगणारे तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार साहेब स्वत: त्या भागात फिरले.

..3..



श्री.ख्वाजा बेग....

त्यांनी सर्व बाबी शेतकऱ्यांना समजावून सांगून, आम्ही तुमच्या सोबत आहोत हे दाखवून दिले. तशाच प्रकारची भावना आजच्या सरकारला दाखविण्याची आवश्यकता आहे. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी हे सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी करु शकणार नाही असे म्हणत असेल तर या बाबी शेतकऱ्यांच्या मनावर विपरित परिणाम करणाऱ्या आहेत. शेतकरी हा आपला अविभाज्य घटक आहे. त्यांच्या भरवशावर तुम्ही आम्ही या ठिकाणी आहोत. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करुन, शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, धडक सिंचन विहीर योजना, पीक विमा योजना, हवामानावर आधारित विमा योजना अशा अनेक योजना आहेत. परंतु शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यानंतर त्याला मात्र या योजनांच्या माध्यमातून केवळ 136 रुपयांचा मदतीचा धनादेश मिळत असेल तर ते कदापि योग्य नाही. मी तर म्हणेन की, ही शेतकऱ्यांची थट्टा आहे. तसेच मी सरकारला विचारु इच्छितो की, सिंचन महामंडळामध्ये रिक्त असणारी पदे आपण केव्हा भरणार आहात ? ही पदे रिक्त असल्यामुळे सिंचन क्षमता कमी होत आहे, असे आपल्याला वाटत नाही काय ? या सर्व उपाययोजना करीत असताना रोजगार हमी योजना ही शेतकऱ्यांना लागू करण्यात येईल काय, सिंचन विहिरींच्या कामांना तत्काळ गती देण्यात येईल काय ? रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम शासकीय इमारतींमध्ये सुरु करुन ती शेतकऱ्यांसाठी वापरात आणणे आवश्यक आहे. रस्त्यावरुन जाणाऱ्या लोकांना समजते की, कॅनॉलमधून पाणी सोडण्यात आलेले आहे. कारण कॅनॉलचे पाणी हे कॅनालने कमी आणि रस्त्यावरुनच जास्त वाहते. त्यामुळे ज्या कॅनॉल लाईन अजूनपर्यंत पूर्ण करु शकलो नाही त्या आपण पूर्ण केल्या पाहिजेत. तसेच मी विचारु इच्छितो की, हे सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन आम्ही तुमच्या पाठीशी आहोत हे दाखवून देईल काय ? हे सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे, हे या सरकारने दाखवावे. तसेच ज्या सिंचन प्रकल्पाचे पाणी शेवटपर्यंत पोहचत नाही त्या प्रकल्पाचे पाणी शेवटपर्यंत पोहचवून योजना राबविल्या पाहिजेत. तसेच ज्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

योजना अस्तित्वात आहेत त्यांची अंमलबजावणी करुन, शासनाने शेतकऱ्यांसाठी तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मी मागणी करतो.

..4..



श्री.ख्वाजा बेग....

सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

------------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे. राज्यात फार मोठी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक वर्षे सातत्याने दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी होत आहे. शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये सातत्याने संकटे कोसळत आहेत आणि अशा वेळी शेतकऱ्यांना तातडीने मदत करणे अत्यंत गरजेचे असताना कोणतीही मदत होताना दिसत नाही, हे अत्यंत खेदजनक आहे. नवीन शासन आले, लोकांना वेगवेगळ्या प्रकारची आश्वासने देण्यात आली. खूप मोठी आश्वासने देण्यात आली. भ्रामक असे चित्र संपूर्ण देशात, राज्यात निर्माण करण्यात आले. कोणीतरी काहीतरी विकासाचा कार्यक्रम घेऊन येणार आहे असे दाखविण्यात आले. नवीन सरकारने जनतेची पूर्णतः निराशा केली आहे. विशेषतः गरीब शेतकरी प्रचंड अडचणीत असतानाही असे सुरू आहे. हे असंवेदनशील सरकार आहे. सरकार म्हणते की, आम्ही कोणत्याही प्रकारची कर्जमाफी देऊ शकत नाही. सतत राज्यावरील कर्जाचा उल्लेख केला जातो. मला सांगितले पाहिजे की, मागच्या काळातही अनेक राज्यांवर कर्जे होती. अमेरिकेवरसुध्दा फार मोठे कर्ज आहे, त्यांनी एक दिवस संसदेची परवानगी घेऊन सर्व अर्थव्यवहार ठप्प केले होते. कर्जाचा प्रश्न शेतकऱ्यांच्याच कर्जाच्या वेळी का येतो असा प्रश्न आम्हाला पडतो. शहरातील योजना सुरू असतात, शहरी माणसांसाठी काम सुरू असते, त्यावेळी मात्र कधीही कर्जाचा उल्लेख होत नाही. मी पाहतो की, शेतकऱ्याला मदत करताना मात्र सर्वांच्या पोटात दुखते, शहरी माणसांना सुध्दा वाईट वाटते. त्यांनही वाटते की, आपण शेतकऱ्यांना उगच मदत करतो. सभागृहात शेतकऱ्यांची अनेक मुले आहेत. शेतकऱ्यांच्या मागच्या पिढ्या शेतात राबल्या आहेत आणि आजच्या पिढीही शेतात राबत आहेत. देशातील लोक 121 कोटी झाले आहेत. शेतकरी अन्नधान्य निर्माण करत आहेत. अन्नधान्य शेतकऱ्यांचे आणि आपण त्यांनाच सबसिडी देण्याचा विचार करीत आहोत. आतापर्यंत शेतकऱ्यांची सबसिडी देशातील लोकांनी घेतली आहे. आम्हाला शेतकऱ्यांची उत्पादित झालेली साखर कमी किंमतीत पाहिजे. देशातील श्रीमंत माणसे, टाटा, बिर्ला किंवा डॉक्टर यांना आपण साखर, गहू, तांदूळ सबसिडाईज्ड रेटने देतो, सवलतीच्या दरात देतो. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला माल शासन शेतकऱ्यांच्या जीवावर इतर लोकांना स्वस्त देण्याचा प्रयत्न करते. मात्र कांद्याचे भाव थोडे जरी वाढले तरी त्यावर निर्यात बंदी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुधीर तांबे ....

आणण्याचा प्रयत्न केला जातो किंवा ती निर्यात होणार नाही अशा अटी लादल्या जातात, हे अत्यंत चुकीचे आहे. शासनाने याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मागच्या काळात आघाडी सरकार होते, त्यावेळीही 5 वर्षाच्या काळात अनेक संकटे आली. मात्र प्रत्येक वेळी सरकार अत्यंत भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहिले. प्रत्येक वेळी शासनाने शेतकऱ्यांना विश्वास दिला की, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. संकटे येत असतात. शेती निसर्गावर अवंलबून असते. निसर्ग बिघडतो आणि शासनही बिघडते. अस्मानी संकटे येतात आणि सुलतानी संकटही येतात, त्यावेळी मात्र त्याला आत्महत्या करण्याशिवाय कोणताही पर्याय राहत नाही. आज तशीच अवस्था झाली आहे. सर्वांनी उल्लेख केला की, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी केवळ विदर्भासाठी 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते, त्यानंतर 72 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली होती. राज्य शासनाने 6 हजार कोटी रुपये दिले होते. शासनाने 5 वर्षांच्या काळात 20 हजार कोटी रुपयांच्या आसपास मदत केली होती. शासनाकडून कर्जमाफीचा विषय घेतला जात नाही. आज सहकाराच्या माध्यमातून उद्योग सुरू आहेत, ते उद्योग देखील अडचणीत आणण्याचा प्रयत्न शासनाकडून जाणीवपूर्वक होत आहे असे आम्हाला वाटत आहे. ऊसाची अवस्था माहीतच आहे. ऊसाचे दर सारखे कोसळत आहेत. माननीय सहकार मंत्री म्हणत आहेत की, एफआरपीचा दर द्या नाही तर तुम्हाला तुरुंगात टाकण्यात येईल. शासनाची जबाबदारी असते. आदरणीय श्री. एकनाथराव खडसे साहेब सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना माहीत आहे की, ऊसाच्या कारखानदारीवर किती लोकांचे जीवन अवलंबून आहे. सभापती महोदय, ऊसाच्या कारखानदारीवर किती तरी लोकांचे जीवन अवलंबून आहे. दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा कर ऊसाच्या उद्योगातून शासनाला मिळतो. शासनाला त्यामधून 5 वर्षांत 10-15 हजार कोटी रुपये मिळत असतील तर त्यातील 2-5 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले जाऊ शकतात. आपण देऊ शकत नाही का ? दुधाचीही तिच अवस्था आहे. आपल्याला माहीत आहे की, दुधाच्या बाबतीत 2 सिझन असतात. एक सिझनमध्ये् दुधाचे उत्पादन अतिरिक्त होते. अतिरिक्त उत्पादन झाल्यावर ते

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुधीर तांबे ....

कमी करण्यासाठी दुधाची पावडर करून निर्यात केली जाते आणि त्याला निर्यात सबसिडी दिली पाहिजे हे धोरण वर्षांनुवर्षे चालत आले आहे. परंतु आपण ते अनुदानही बंद करून टाकले आहे. शेतीला दुधाचा जोडधंदा आहे तोही बंद करायचा आहे का ? आपण शेतकऱ्यांना कर्जमाफी देत नाही, जिराईत शे्तकऱ्यांना जीवनाची आशा देत नाही. सहकारी क्षेत्रात थोडा फार शेतकरी राहिला आहे. विदर्भात शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत आहेत. मात्र पश्चिम महाराष्ट्रात होत नाहीत, कारण तेथे सहकार शेतकऱ्यांना जगण्यासाठी मदत करीत आहे. सहकार आपण जाणीवपूर्वक मोडण्याचा प्रयत्न करीत आहात अशी स्पष्ट भावना शेतकऱ्यांच्या विशेषतः कारखानदारीच्या क्षेत्रात असणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होत आहे. कदाचित हे सहकारी साखर कारखाने काँग्रेस, राष्ट्रीवादी काँग्रेसचे आहेत म्हणून आपल्या मनात तसे असेल की काय हे आम्हाला माहीत नाही. आपण शासनकर्ते म्हणून असतो त्यावेळी असे विचार आपल्या मनात येणे अत्यंत चुकीचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न गंभीर झाले आहेत. चारा टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. मला चाऱ्याच्या संदर्भात एक विषय मांडायचा आहे. आपण गोवंश हत्याबंदी कायदा केला आहे. आपले या संदर्भात धोरण काय आहे हे मला समजत नही. आपण हे कशाच्या आधारे करीत आहात ? आपण 21 व्या शतकात आहोत. गोवंश हत्याबंदी कायदा केला आहे. आपण भाकड जनावरांचे काय करणार आहात ? शासनाने जर्सी गोरे या संदर्भात योजना जाहीर करावी. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी योजना जाहीर करावी. शासनाने जर्सी गोरे सांभाळण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याची सुरूवात करावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. आपण देश कुठे घेऊन चाललो आहोत ? दर वेळी कोणता तरी अजेंडा आहे. आम्हाला वाटत नाही की, यामध्ये काही व्यवहार्य अजेंडा आहे, शेतीचे भले करण्याचा काही अजेंडा आहे. निश्चितपणे छुपा अजेंडा आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. आमची मागणी आहे की, शेतकऱ्यांना कर्ज व्याजासह माफ झाले पाहिजे. पीक विमा योजनेचे सुध्दा चांगले मॉडेल आले पाहिजे. पीक कर्ज पुनर्गठण झाले पाहिजे. पिण्याच्या पाण्याच्या, चाऱ्याच्या बाबतीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. सुधीर तांबे ....

शासनाने त्वरित उपायोजना केली पाहिजे. दुबार पेरणी करण्याची गरज आहे, ते शक्य झाले पाहिजे. पाऊस पडू लागला आहे, आशा निर्माण झाल्या आहेत. शेतकऱ्यांना खते, बियाणे स्वस्त दरात दिली पाहिजेत. ठिंबक सिंचनासाठी भरघोस सबसिडी दिली पाहिजे अशी मी मागणी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे. अत्यंत महत्वाच्या विषयावर आठवड्यापासून चर्चा सुरू आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराकडे लागले आहे. माननीय मुख्यमंत्री आपल्या बाबतीत काय घोषणा करणार आहेत, कर्जमुक्ती देणार आहेत का, कर्जमाफी देणार आहेत का याकडे शेतकरी डोळे लावून बसलेला आहे. मला खात्री आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराने राज्यातील शेतकऱ्यांची घोर निराशा होणार आहे. हे भाजप सरकारचे मुख्यमंत्री आहेत. गेल्या निवडणुकीमध्ये भाजपने पोकळ आश्वासने दिली. अच्छे दिनाचा नारा दिला, अच्छे दिन आयेंगे म्हटले आणि असे म्हणून केंद्रातील व राज्यातील सत्ता हस्तगत करण्याचे काम केले. सरकारवर राज्यातील जनतेचा विश्वास राहिलेला नाही. सभापती महोदय, आपण सुध्दा शेतकऱ्याचे लेकरू आहात. मी सुध्दा शेतकऱ्याचा मुलगा आहे. आज आपल्याला गावाकडे जाऊ वाटत नाही. शेतकऱ्यांची, शेतमजुरांची, पिकांची काय अवस्था आहे हे आपल्याला माहीत आहे. ते दु:ख पाहू नये असे झाले आहे. शासनाने कृषी क्षेत्राच्या बाबतीत निवडणूक जाहिरनाम्यात घोषणा केल्या होत्या, त्या सर्व फसव्या होत्या. शेतकऱ्यांच्या बाबतीतील एकतरी घोषणा पूर्ण करायला हवी होती, ज्यांच्या जीवावर राज्य करीत आहेत, त्यांच्या बाबतीतील एक घोषणाही पूर्ण करू शकलेले नाहीत. शेतमालाच्या बाजारभावाचे उदाहरण घेऊ. आमचे नेते माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेब हे केंद्रीय कृषी मंत्री असताना जो भाव मिळत होता तो मी उदाहरणासहित सांगतो. तांदळाचा भाव 560 वरून 1345 रूपयांवर नेण्याचे, ज्वारीचा भाव 515 रूपयांवरून 1520 रूपयांवर नेण्याचे, कापसाचा भाव 1760 रूपयांवर 4 हजार रूपयांवर नेण्याचे काम आमचे नेते श्री. शरदचंद्र पवार साहेबांनी केले.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे..........

सोयाबीन, ज्याला आपण 'कॅश क्रॉप' म्हणतो, त्याचा दर प्रति क्विंटल 900 रुपयांवरुन 2560 रुपयांवर नेण्याचे काम त्यांनी केले होते. आज मोदी साहेबांचे सरकार सत्तेवर आले आहे. या देशातील जनतेला ही आशा होती की, निश्चितपणे बदल होणार आहे. परंतु, सत्तेत बदल झाला, निर्णयात बदल झाला नाही. उलट शेतकऱ्यांची थट्टा करण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. आज आपण पाहिले तर तांदळाचा दर 1300 रुपयांवरुन 1345 रुपयांवर गेला आहे. म्हणजे, फक्त 45 रुपयांनी वाढ झाली आहे. ज्वारीचे दर 1520 रुपयांवरुन 1555 रुपयांवर म्हणजे 30 रुपयांनी वाढ झाली आहे. कापसाचा दर 4000 रुपयांवरुन 4050 रुपयांवर गेला आहे. म्हणजे, फक्त 50 रुपयांनी वाढ झाली आहे. सोयाबीनच्या दरातील वाढ तर शुन्य आहे. हे या सरकारचे धोरण आहे का, हे 'अच्छे दिन' आहेत का ?

सभापती महोदय, सकाळी उठल्यानंतर आपल्याला चहा प्यावासा वाटतो. त्या चहासाठी आपण दूध वापरतो. दूध व्यवसाय हा शेतकऱ्यांसाठी पूरक व्यवसाय आहे. आज दुधाचे दर काय आहेत ? आपण बिसलेरीची पाण्याची एक लिटरची बाटली 20 रुपयांना घेतो. पण 1 लिटर दुधासाठी शेतकऱ्यांना फक्त 17 रुपये मिळतात. अशा प्रकारे शेतकऱ्यांना चोहोबाजूने मारण्याचे काम सरकार करीत आहे.

सभापती महोदय, या सरकारने मागील हिवाळी अधिवेशनात नुकसान भरपाई म्हणून 7 हजार कोटी रुपयांचे पॅकेज शेतकऱ्यांना जाहीर केले होते. माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनीच त्यासंबंधीची घोषणा सभागृहात केली होती. प्रत्यक्षात मात्र फक्त 4 हजार कोटी रुपये देण्यात आले. 3 हजार कोटी रुपये अद्याप मिळालेले नाहीत. मी आकडेवारीनिशी हे सांगणार आहे. केवळ अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे सरकारने दिलेले पैसे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसतील तर यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही. शासनाने वितरित केलेली मदतीची रक्कम अनेक जिल्ह्यातून परत गेली आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर मराठवाड्यामध्ये मी ज्या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतो, त्या मतदारसंघाचे 190 कोटी रुपये परत गेले आहेत.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे..........

विदर्भातील 260 कोटी रुपये, खानदेशचे 50 कोटी रुपये, पश्चिम महाराष्ट्राचे 15 कोटी रुपये परत गेले आहेत. एका अर्थाने या मदतीपासून शेतकरी वंचित राहिला आहे. शेतकऱ्यांची संख्याच आपल्याला बघावयाची असेल तर मराठवाड्यात 10 लाख शेतकरी वंचित राहिले आहेत. विदर्भात अडीच लाख, नाशिक विभागात 1 लाख, खानदेश विभागात 50 हजार शेतकरी मदतीपासून वंचित राहिले आहेत. आपण शेतकऱ्यांना कधी न्याय देणार आहात ?

सभापती महोदय, राज्यात व केंद्रात ज्यावेळी कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सरकार होते, त्या काळात ज्या ज्या वेळी शेतकरी अडचणी आला, त्या वेळी त्यांना मदत करण्याची भूमिका संपूर्ण देश स्तरावर कृषी मंत्री म्हणून माननीय श्री.शरद पवार यांनी सातत्याने घेतली. केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशातील सर्व शेतकऱ्यांना मदत करण्याची भूमिका त्यांनी घेतली. दिल्लीमध्ये बसून राज्याला निधी पाठविण्याचे काम त्यांनी केले. आज राज्यात आणि देशात भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्याला किती मदत मिळाली आहे ? याची आकडेवारी पाहिली तर अत्यंत तुटपुंजी रक्कम केंद्र सरकारकडून राज्याला मिळाली आहे. या उलट माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांनी शेतकरी आत्महत्येबाबत लोकसभेत असे उत्तर दिले होते की, महाराष्ट्रात केवळ 3 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रातील शेतकऱ्याची थट्टा करण्याचे काम झाले असून हे कामकाज आपण सर्वांनी टी.व्ही.वर पाहिले आहे.

सभापती महोदय, मराठवाड्यात नेहमीच कमी पाऊस पडतो. गारपीट झाली, अवकाळी पाऊस झाला तर त्यांना मदत करण्याची भूमिका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सरकारने सातत्याने घेतली होती. परंतु, मध्यंतरी नोव्हेंबर, डिसेंबर, 2014 मध्ये मोठा पाऊस झाला, गारपीट झाली. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: असा अहवाल शासनाला पाठविला की, जवळपास 86 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. पण राज्य सरकारने केवळ 22 कोटी रुपयांची मदत दिली. 86 कोटी रुपयांचे नुकसान झाले असताना राज्य सरकारने केवळ 22 कोटी रुपयांची मदत शेतकऱ्यांना केली. जिल्हाधिकाऱ्यांकडून अधिकृत अहवाल आलेला असताना शेतकऱ्यांना पूर्ण मदत करण्याची भूमिका या फडणवीस सरकारने घेतली नाही. मला या माध्यमातून हे निदर्शनास आणून द्यावयाचे

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे..........

आहे की, संकट आल्यानंतर कोणत्याही शेतकऱ्यांना मदत करण्याची ठोस भूमिका या सरकारने घेतल्याचे दिसून आलेले नाही. त्यामुळे या सरकारकडून फारशी अपेक्षा करावी, असे वाटत नाही. परंतु, आपण जनतेचे प्रतिनिधीत्व करीत आहोत, जनतेचे प्रश्न सभागृहात मांडले पाहिजेत, सरकारकडे त्यांच्या प्रश्नांबाबत दाद मागितली पाहिजे, सरकारकडून मदत मिळवून देणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले काम आहे. म्हणून या निमित्ताने मी शासनाकडे अशी मागणी करणार आहे की, शेतकऱ्यांची कर्जमाफी सरकारने केली पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत उपस्थित आहेत. त्यांच्या नेत्यांनी तर कर्जमाफीच नाही तर कर्जमुक्ती केली पाहिजे, अशी मागणी केली आहे. त्याप्रमाणे कर्जमुक्ती सुध्दा झाली पाहिजे.

सभापती महोदय, दिनांक 19 डिसेंबर, 2014 रोजी या सरकारने या सभागृहात कर्जमाफीची घोषणा केली होती. ही कर्जमाफी कोणाला देण्यात आली ? आपण नेहमी शेतकऱ्यांना कर्जमाफी देत असतो. परंतु, महाराष्ट्राच्या इतिहासात नोंद करण्यासारखा निर्णय या सरकारने घेतला. कुणाचीही मागणी नसताना, अर्ज नसताना, विरोधी पक्षाच्या किंवा सत्तारुढ पक्षाच्या आमदारांनी मागणी केलेली नसताना सावकारांची कर्जमाफी करण्याचा निर्णय या सरकारने घेतला. सावकारांची कर्जमाफी करण्याविषयी या सरकारला कोणी सांगितले होते, कोणी मागणी केली होती, कोणत्या शेतकऱ्यांनी, कोणत्या आमदारांनी, कोणत्या पक्षाने, कोणत्या सत्तारुढ पक्षाच्या आमदाराने अशी मागणी केली होती ? कोणाचीही मागणी नसताना सावकारांची कर्जमाफी करण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला. आम्हा सर्वांना आश्चर्य वाटले, आपल्यालाही वाटले असेल. हा कोणता निर्णय फडणवीस सरकारने घेतला, याचे माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनाही आश्चर्य वाटले. परंतु, त्यांना त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य दाखविता आले नाही. सावकारांची कर्जमाफी का केली, कशासाठी केली, या प्रश्नाबरोबरच अशी शंका वाटू लागली की, कदाचित या सरकारमधील काही लोकांचे धागेदोरे सावकारांशी आहेत की काय ? त्यावेळी जवळपास 171 कोटी रुपयांची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला गेला, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. हा निर्णय महसूल मंत्री महोदयांना देखील पटला नसेल. परंतु, त्यांचा नाईलाज होता.

....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे..........

अशा प्रकारे निर्णय घेऊन जनतेच्या घामाचे 171 कोटी रुपये वाया घालण्याचे काम, पाण्यात घालण्याचे काम या सरकारने केलेले आहे. या पापाचा हिशेब वर बसलेला ईश्वर जरूर करील, अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आज सर्वांसमोर जर कोणता चिंतेचा विषय असेल तर तो शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आहे.

सभापती महोदय, आपण कुणाच्या इशाऱ्याने भाषण थांबविण्याचा संकेत देणारी घंटी वाजवीत असाल तर ते चुकीचे आहे. आपल्याकडून आम्हाला न्यायाची अपेक्षा आहे. मला नक्की माहीत आहे की, आपल्याला कोणी इशारा केला आहे. आपण एक वजनदार सभापती म्हणून त्या आसनावर बसला आहात. कोणा सन्माननीय सदस्यांच्या इशाऱ्यावरुन आपण कामकाज करणार नाही.

सभापती महोदय, शेतकरी आत्महत्यांचा अतिशय महत्वाचा आणि सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आज आपल्यासमोर आहे. शेतकरी आत्महत्येशिवाय अन्य कोणतीही घटना महत्वाची असू शकणार नाही.

यानंतर श्री.बोरले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे.........

शेतकरी म्हणतो की, मला आत्महत्या करण्यासाठी परवानगी द्यावी. एवढेच नव्हे तर एखाद्या गावातील सर्व शेतकरी आम्हाला आत्महत्या करण्यासाठी परवानगी द्यावी, अशी मागणी करतात. एवढी दुर्दैवी घटना महाराष्टाने यापूर्वी कधीही बघितली नव्हती. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांच्या काळात ही वेळ शेतकऱ्यांवर आलेली आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर आम्ही शेतकऱ्यांच्या आमहत्या थांबविण्याचे काम करु, असे त्यांनी सांगितले होते. आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या होत्या. परंतु, राज्यात ऑक्टोबर, 2014 ते 30 जून, 2015 एवढ्या कमी कालावधीत जवळपास 1804 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. म्हणजे एका महिन्याला 200 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा प्रकारे थांबविणार आहात ? मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी एखादी मोठी व्यक्ती दु:खाच्या वेळी आपले सांत्वन करण्यासाठी आपल्या घरी येते त्यावेळी त्या कुटुंबाला नक्कीच काही तरी आधार वाटतो. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेब आपल्याला देखील याची माहिती आहे. आपण गरीब शेतकऱ्यांच्या घरी त्यांचे सांत्वन करण्यासाठी, त्यांना आधार देण्यासाठी जातो. त्यावेळी त्या शेतकऱ्याला असे वाटते की, आपल्याला दिलासा मिळाला आहे, पाठिंबा मिळला आहे. परंतु, माननीय मुख्यमंत्री विदर्भातील श्री.ताजने नावाच्या शेतकऱ्याच्या घरी जाऊन मुक्काम करतात, जेवण करतात, भाजी-भाकर खातात, येथपर्यंत ठीक आहे. परंतु, माननीय मुख्यमंत्री त्यांच्या घरी जाऊन आल्यानंतर देखील ती आमची माऊली आत्महत्या करते. म्हणजे मुख्यमंत्री महोदयांवर कोणाचा विश्वास आहे की नाही ? आमचा शेतकरी त्यांच्यावर विश्वास ठेऊ शकत नाही. मला असे वाटते की, आज राज्यातील शेतकरी, शेतमजूर आपल्यावर विश्वास ठेऊ शकत नसेल तर आपल्याला त्या खर्चीवर राहण्याचा अधिकार नाही. आपण ती खुर्ची सोडावी असे कोणी म्हणण्याच्या अगोदर आपण खुर्ची खाली केली पाहिजे आणि असा निर्णय मुख्यमंत्री महोदयांनी स्वत:हून घेतला पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या बाबतीत कितीही बोलले तरी ते कमीच आहे. परंतु, आपल्याला कोठे तरी थांबले पाहिजे. शेवटी, आज मुख्यमंत्री महोदय कोणती घोषणा करणार

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे.........

आहेत याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. म्हणून आपण राजकारण बाजूला ठेऊन, पक्षभेद बाजूला ठेऊन निर्णय घेतला पाहिजे. शेवटी, हे शेतकऱ्यांचे राज्य आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. म्हणून शेतकऱ्यांना कर्जमाफी, कर्जमुक्ती मिळाली पाहिजे. सकाळी सत्ताधारी पक्षाच्या एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तुमच्या काळात तुम्ही काय केले ? मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर होते त्यावेळी शेतकऱ्यांना थोडी थोडकी नव्हे तर 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय जर कोणी घेतला असेल तर तो माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या सरकारने घेतला होता आणि हे कोणताही शेतकरी विसरणार नाही. आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर असताना दुसरा क्रांतिकारक निर्णय घेण्यात आला आणि तो म्हणजे, माननीय श्री.शरद पवार साहेबांनी सांगितले की, जर नोकरदारांना 8 टक्के व्याज दराने कर्ज मिळत असेल तर आमच्या शेतकऱ्याला सुद्धा कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे. माननीय श्री.अजित पवार साहेबांनी शेतकऱ्यांना 1 लाख रुपयापर्यंत शून्य टक्के व्याज दराने कर्ज देण्याबाबतचा निर्णय घेण्यासशासनाला भाग पाडले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर असताना हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला होता. शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम आमच्या शासनाने केलेले आहे. आता माननीय मुख्मंत्र्यांनी पक्षभेद बाजूला ठेवून खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे काम केले पाहिजे. मुख्यमंत्री महोदयांनी आजच्या आज शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा निर्णय जाहीर करावा, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद, जय किसान, जय महाराष्ट्र.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील अन्नदात्याला कर्जापासून मुक्ती मिळावी, त्याला न्याय द्यावा, याबाबत आपण सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकली आहेत. महाराष्ट्रात निवडणुका झाल्या आणि ऑक्टोबर महिन्यात भारतीय जनता पार्टी व शिवसेना पक्षाचे सरकार सत्तेवर आले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शासन आम्हाला न्याय देऊ शकत नाही, अशी लोकांची भावना झाली. शेतकऱ्यांना खोटे बोलून फसविले गेले आणि राज्यातील शेतकरी भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना पक्षाच्या मागे उभा राहिला. शेतकरी अपेक्षेने यांच्याकडे बघत होता. सन्माननीय सदस्य या विषयावर बोलत असताना आम्ही त्यांची भाषणे ऐकली आणि त्यांनी सांगितलेली आकडेवारी देखील ऐकली. आता भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना पक्षाचे पटत नाही, अशा बातम्या वर्तमानपत्रातून वाचायला मिळतात. कोणी उघडपणे बोलतो, तर कोणी बोलत नाही. शिवसेना पक्षाचे लोक बोलतात, तर भारतीय जनता पार्टीचे लोक बोलत नाहीत, असे वातावरण संपूर्ण राज्यात तयार झालेले आहे. "कोई आंखों से बात करता है तो कोई आंखों से मुलाकात करता है, बड़ा मुश्किल है जवाब देना खडसे साहब, जब कोई खामोश रहकर बात करता है." राज्यात दोन पक्षाचे पटत नाही. त्यामुळे राज्याचा राज्यकारभार कसा चालेल ? आपण खरोखर शेतकऱ्यांना न्याय देऊ शकतो काय ? आपण शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने देशात महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आणले. आता आमच्या लोकांनी भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना पक्षाच्या हाती राज्यकारभार दिलेला आहे. आता आमचा महाराष्ट्र कोठे आहे ? माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेब, आपले राज्य तिसऱ्या क्रमांकावर आलेले आहे. पहिल्या क्रमांकावर गुजरात, दुसऱ्या क्रमांकावर नोएडा आणि तिसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र राज्य आहे, ही शोकांतिका आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस नेहमी सांगतात की, तुमच्या काळात एवढ्या शेतकऱ्यांनी

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये........

आत्महत्या केल्या होत्या. मी आपल्याला सांगू इच्छितो की, "अपना मजहब ऊंचा और गैरों का ओछा, यह सोच हमें इंसान नहीं बनने देती." म्हणून आपण काय केले पाहिजे ? मी सांगू इच्छितो की, "स्वर्ग का स्वप्न छोड़ दो, नरक का डर छोड़ दो, कौन जाने क्या पाप और क्या पुण्य." आम्ही यांचे पाप धुवत आहोत. आता यांचे पुण्यवान सरकार सत्तेवर आले आहे. "कौन जाने क्या पाप और क्या पुण्य, बस किसी का दिल न दुखे और आत्महत्या रुके. यह अपनी सोच होनी चाहिए." राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत, याकडे आपण लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यात 43,711 गावे आहेत. माननीय श्री.एकनाथराव खडसे साहेबांवर आमचा विश्वास आहे. आपण शेतकरी आहात. ज्यावेळी आपण विरोधी बाकावरुन भाषणे करीत होता त्यावेळी आम्ही गॅलरीत बसून आपली भाषणे ऐकत होतो. परंतु, आता परिस्थिती उलट झालेली आहे. आपल्याकडे किती अधिकार आहेत, हे आम्हाला माहीत नाही. तुमच्या हातात सत्ता असती तर जे 14-15 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे, ते आपण एका झटक्यात माफ केले असते. परंतु, तसे होत नाही, ही शोकांतिका आहे. आपण मंत्रिमंडळ छोटे केलेले आहे. एका मंत्री महोदयांकडे 8-10 विभागाचा कार्यभार आहे. मग तुम्ही काय निर्णय घेणार आणि कोणते निर्णय घेणार, हा प्रश्न सुद्धा अनुत्तरित राहतो. आपण याबाबत निर्णय घ्यावयास पाहिजे होता.

सभापती महोदय, राज्यातील 355 तहसील विभागात 43,711 गावे आहेत. आपण काही तरी निर्णय घ्यावयास पाहिजे होता. आपण एका गावात एक महसूल सहायक नेमला असता तर त्या गावातील प्रत्येक दिवसाची माहिती कृषी मंत्र्यांकडे प्राप्त झाली असती. परंतु, आपण असा कोणताही निर्णय घेतला नाही. आपण कोठे जात आहोत, आपण कोणत्या मार्गाने चालला आहात, हे आम्हाला कळत नाही. आता काही लोक परदेश दौऱ्यावर आहेत. ज्या दाम्पत्याला मुलबाळ नसते त्या महिलेचा नवरा बाहेरच राहतो, अशी परिस्थिती असते. ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात त्या ठिकाणी राज्याच्या प्रमुखांनी गेले पाहिजे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

आमच्या शेतकऱ्यांचा राजा श्री.शरदचंद्र पवार साहेब कोठे अवकाळी पाऊस झाला, जमीन खरडून गेली, कोणाची किती जमीन गेली, कोणाचा साखर कारखाना अडचणीत आला, कोणत्या शेतकऱ्याने आत्महत्या केली त्या ठिकाणी प्रत्यक्ष जात होते. आपल्या देशाचा प्रमुख ज्या ठिकाणी आत्महत्या झाली किंवा ज्या विभागात आत्महत्या होतात तेथे गेल्याचे दिसून येत नाही.

सभापती महोदय, आता या सरकारने देशात 100 स्मार्ट शहरे निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे साहेब स्मार्ट शहरे तयार करण्याची गरज नाही. आपण स्मार्ट शेतकरी तयार केले पाहिजेत. तो स्मार्ट शेतकरी मुलीचे लग्न करु शकला पाहिजे, त्याचे स्वतःचे घर असले पाहिजे, तो शेतकरी मुलाच्या शिक्षणासाठी खर्च करु शकला पाहिजे. त्याचा वर्षभराचा खर्च होऊन त्यांच्या बचत खात्यावर एक, दोन किंवा पाच हजार रुपये शिल्लक राहले पाहिजे. असा कोणताही निर्णय या सरकारने जनतेसाठी घेतलेला नाही. या राज्यातील शेतकऱ्यांसाठी व शेतमजुरांसाठी कोणता महत्वाचा निर्णय आपण घेतला आहे. आपण स्मार्ट शेतकरी तयार केला नाही तर आपण स्मार्ट शहरे तयार करीत आहोत. ज्याच्या पोटात दुखते त्याला डोक्याची गोळी दिली तर ते चालणार नाही.

सभापती महोदय, या देशातील प्रत्येक माणूस सुशिक्षित झाला पाहिजे. महाराष्ट्रात साक्षरतेचे प्रमाण 82 टक्के आहे, केरळ राज्यात साक्षरतेचे प्रमाणे 100 टक्के आहे. आपला महाराष्ट्र 100 टक्के साक्षर झाला पाहिजे अशी कामे आपल्या सरकारने केली पाहिजेत, असे कोणतेही आश्वासन आपल्या सरकारने जनतेला दिले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक माणसाच्या हातात पेन आणि कागद दिला होता. आपल्या देशाचे प्रमुख त्यांच्या हातात झाडू देत आहेत. त्या लोकांच्या हातातून झाडू सुटला पाहिजे. आम्हाला गंधगीची कामे किती दिवस करायला लावणार आहात. आता टेक्नॉलॉजिच्या माध्यमातून साफसफाईची कामे केली पाहिजेत. माझा माणूस या देशातील व राज्यातील साफसफाईची कामे किती दिवस करीत राहणार आहेत. त्यांच्या विकासासाठी या सरकारने चांगला प्रस्ताव आणला आहे काय ? त्यांच्यासाठी एकही चांगला प्रस्ताव आणलेला नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...2...

श्री.प्रकाश गजभिये....

सभापती महोदय, औरंगाबाद शहराला स्मार्ट शहर बनविण्याचा या सरकारने संकल्प केला आहे. तेथील महानगरपालिकेचे निव्वळ उत्पन्न 100 कोटी रुपये आहे, तेथे 300 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्या महानगरपालिकेचे एकूण बजेट 500 कोटी रुपयांचे आहे. त्या ठिकाणी पाऊस पडत नाही, त्या भागात एकच जायकवाडी धरण आहे, वरील पाच धरणे जेव्हा 100 टक्के भरतील व त्यामधून एक टक्का पाणी जायकवाडी धरणात आले तर तेथील लोकांना पाणी देऊ शकू. गेल्या दहा वर्षापासून हे धरण भरत नाही, राज्यातील सर्व धरणे भरली पाहिजेत. स्मार्ट शहरांसाठी जपान सरकारकडून या सरकारने 1200 कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. त्यातून औरंगाबादला स्मार्ट शहर करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, अगोदर आपणाकडे स्वदेश निती होती, त्यावेळी चीन, जपान व अमेरिका या देशाची कोणतीही वस्तू भारतीय जनता पक्षाला चालत नव्हती. आता हे सरकार जपानमधील सुंदर शहराप्रमाणे औरंगाबाद शहर तयार करीत आहे. कोरियासारखे सुंदर पुणे शहर करण्यात येणार आहे. दुसऱ्या देशाच्या आर्थिक बळावर या राज्यातील स्मार्ट शहरे तयार करणार आहात काय ? 1200 कोटी रुपयांचे कर्ज स्मार्ट शहरे तयार करण्यासाठी घेतले असतील व हे कर्ज घेतल्याबरोबर व्याजाचा हप्ता राज्य सरकारला द्यावा लागणार आहे. 1400 कोटी रुपयांची शेतकऱ्यांची कर्जमाफी हे सरकार करु शकत नाही. व्याजाचा हप्ता जपान सरकारला कसा देणार आहात ? असा प्रश्न सामान्य माणसाच्या मनात तयार होत आहे. या प्रस्तावाला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत, शेतकऱ्यांना खरोखर कर्जमुक्ती देण्यात येणार आहे काय, याची शेतकरी वाट पाहत आहेत, आता ज्या आत्महत्या झालेल्या आहेत, त्या आत्महत्या आजपासून कमी होणार आहेत काय ? सरकारकडे मोठ-मोठे शास्त्रज्ञ आहेत, कृषी संशोधक आहेत, रघुराम राजन सारखे आरबीआयचे गर्व्हनर आहेत, ते असे म्हणाले होते की, आत्महत्या व राज्याच्या अर्थव्यवस्थेचा काही संबंध नाही. त्यांना मदत करु नका असे ते म्हणाले आहेत, त्यांना मदत केली तर तो शेतकरी आत्महत्या करणार नाही असे नाही, याचे देखील उत्तर सभागृहाला मिळाले पाहिजे. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्या शेतकऱ्यांचा हा अपमान आहे. आरबीआयचे गर्व्हनर असे बोलत असतील तर ते योग्य नाही.

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

सभापती महोदय, आघाडी सरकार असताना भारतीय जनता पक्ष व शिवसेना विजेच्या भारनियमना विरोधात संपूर्ण राज्यभर आंदोलने करीत होते. आता राज्यात 3500 मेगावॅट विजेचा तुटवडा आहे. जुलै महिन्यानंतर यापेक्षा जास्त मेगावॅट विजेचा तुटवडा भासणार आहे. हा तुटवडा कसा काय भरुन काढणार आहात. आज पाणी नसल्यामुळे परळी येथील वीज संच बंद आहे, तसेच काही औष्णिक वीज निर्मिती संच बंद आहेत, याकडे सरकारचे लक्ष आहे काय ? या सरकारचे लक्ष नाही, हे सरकार फक्त विदेश दौऱ्यावर जात आहे, शेतकरी आकाशाकडे पाहत आहे.

सभापती महोदय, 750 विमाने नागपूर विमानतळावरुन जात आहेत, मिहान प्रकल्पाचे काय झाले याबाबत देखील अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. मिहान प्रकल्पासाठी 2500 शेतकऱ्यांकडून शेत जमीन घेण्यात आल्या आहेत. या शेतकऱ्यांची शेती गिळंकृत करण्यात आली आहे. या ठिकाणी एकही प्रोजेक्ट चांगल्या प्रकारे सुरु झालेला नाही. हाताच्या बोटावर मोजण्याइतके प्रकल्प त्या ठिकाणी आले आहेत. तेथे शेतकरी झोपडी उभारुन राहत आहे व त्याच्या बाजूला श्रीमंत उद्योगपती उद्योग उभारीत आहेत. ज्यांच्या जमिनी गेल्या तो शेतकरी आत्महत्या करीत आहे. अशाच प्रकारची परिस्थिती शेतमजुराची देखील आहे.

सभापती महोदय, या सरकारने 2.5 लाख रोजगार निर्मिती करणार म्हणून सांगितले होते. माझ्या माहितीप्रमाणे एकाही माणसाला रोजगार मिळाला नाही. भेल कारखान्याचे काय झाले, भेल कारखान्याला मंजुरी देण्यात आली आहे. भंडारा येथे भेल कारखान्यात हजारो कामगार नोकरीला होते. तेथील कारखाना बंद झाल्यामुळे ते कामगार बेकार झाले आहेत.

सभापती महोदय, सिंचनाचे प्रकल्प पूर्णपणे बंद आहेत, जे सिंचन प्रकल्प बंद आहेत ते सुरु करण्यात येऊ नयेत, अशा सूचना केंद्र सरकारने राज्य सरकारला दिल्या आहेत. त्यामुळे त्या सिंचन प्रकल्पाला हे सरकार निधी देऊ शकत नाही. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून किती शेततळी बांधण्यात आली आहेत. या माध्यमातून किती लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे. शेतमजुराला काम नाही, शेततळी बांधली जात नाहीत, त्यामुळे तेथील पिकांचे नुकसान होत आहे. असा प्रश्न आम्हा सर्वांना भेडसावत आहे. आम्हाला खात्री होती की, आघाडी सरकारने काम केले नाही म्हणून भारतीय जनता पक्षाला लोकांनी सत्तेत बसविले आहे. परंतु या

...4...

श्री.प्रकाश गजभिये....

सत्तेचा दुरुपयोग झाला आहे. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांच्या खात्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे सकारात्मक असतात. हे मंत्री महोदय आल्यावर राज्यातील सर्व बाजार समित्या त्यांनी बरखास्त केल्या. बाजार समित्या बरखास्त करण्यात आल्यानंतर घेण्यात आलेल्या निवडणुकीमध्ये काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे लोक निवडून आले आहेत. या लोकांना वाटले होते की, आम्ही बाजार समित्या बरखास्त केल्या तर भारतीय जनता पक्षाचे लोक निवडून येतील. परंतु तसे झाले नाही, साखर कारखानदारी उद्ध्वस्त करण्याचा हे सरकार आता प्रयत्न करीत आहे.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये......

तो उठायला नको या दृष्टीने त्या कारखानदारावर आपली करडी नजर होती. या राज्यातील शेतकरी संघटनेचे प्रमुख नेत्यांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला. आता ते नेते कुठे दिसत नाहीत. मराठवाडा, विदर्भ किंवा पश्चिम महाराष्ट्रातही दिसत नाहीत. ते शेतकरी संघटनेचे प्रमुख नेते आहेत, त्यांनी विदर्भात जाऊन शेतकऱ्यांना आवाहन केले पाहिजे होते. आत्महत्या करु नका, मी तुमच्याकरिता प्रस्ताव तयार करतो आणि माझी 56 इंचाची छाती शासनाला दाखवितो. एकही कास्तकार आत्महत्या करणार नाही असे तुम्हाला अभिवचन देतो असे सांगणे अपेक्षित होते. परंतु जो आमचा अन्नदाता आहे, ज्यांच्यामुळे राज्यातील सर्वसामान्य माणूस आपले जीवन सुसह्य स्थितीत जगू शकतो, ज्याने पिकविलेल्या अन्नावर आपण सर्वजण गुजराण करतो त्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती हवी आहे. त्याला कर्जावरील व्याजमाफी नको आहे. कर्ज मुक्ती झाली पाहिजे. कर्जातून मुक्त झाल्यानंतर त्याला पुन्हा आपल्या पायावर उभे राहण्यासाठी नव्याने कर्ज देण्याची गरज आहे. कर्ज मुक्ती झाली तरी तो आपला व्यवसाय करु शकत नाही. तो आपल्या मुलांना शिक्षण देऊ शकत नाही, आपल्या मुलीचे लग्न करु शकत नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, मी एका शेतकऱ्याने लिहिलेले पत्र सभागृहाला वाचून दाखवितो.

प्रिय पावसा, तू जिथे कुठे असशील तिथून त्वरित परत ये.

सोयाबीन, मका, कापूस यांची तब्येत खूपच बिघडली आहे.
सगळे तूझ्याविना त्रस्त आहेत.
छत्रीवाले, सूट बूटवाले काका, खडसे साहेब,
चंद्रकांत पाटील काका, रेन कोटवाले काका
तूझी खूप आठवण काढीत आहेत.
आपला एक दुष्काळग्रस्त शेतकरी.

सभापती महोदय, या शासनाला जाग आली पाहिजे. सभागृहाच्या नेत्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले पाहिजे की, शेतकऱ्यांना 14 हजार कोटीचे कर्ज माफ करुन नव्याने 14 हजार कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करुन दिले पाहिजे. राज्य सरकारने बँकांना 46 हजार कोटी

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये......

रुपयांचे टार्गेट दिले होते. परंतु हंगामामध्ये त्यातील 40 टक्के देखील कर्ज वाटप झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. पीक विम्याचे 1600 कोटी रुपये जाहीर झाले होते. परंतु सरकारकडून काहीही मदत मिळालेली नाही. शासनाकडून केवळ पोकळ घोषणा केल्या जात आहेत. केंद्र व राज्य सरकार फक्त कॉर्पोरेट क्षेत्राला मदत करणारे आहे हेच दिसून येते. यापूर्वी माननीय सदस्यांनी सांगितले की, सावकारांना पैसे दिले. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सावकारांना सुध्दा शासनाचा निर्णय मान्य झालेला नाही. डिसेंबर, 2014 च्या हिवाळी अधिवेशन काळात 23 सावकारांनी नागपूरच्या हायकोर्टात याचिका दाखल केल्यानंतर हायकोर्टाने स्टे दिल्यामुळे सावकारांना जाहीर केलेली मदत वितरित होऊ शकलेली नाही, ही वस्तुस्थिती शासनाला नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, 6000 कोटी रुपयांचे कर्ज बँकांमार्फत देण्याचे शासनाने सांगितले होते. 1850 कोटी रुपये महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी स्वतःच्या आर्थिक बळावर उभे करायचे असे सांगण्यात आले. म्हणजे ज्यांची पत असेल त्यालाच निधी मिळणार असा अर्थ होतो. ते 6000 कोटी रुपये अद्याप साखर कारखान्यांना वितरित केलेले नाहीत. साखर कारखानदार आणि शेतकरी यांच्या डोळयात धूळ फेकण्याचे काम सरकारने केले आहे. त्यातून फक्त 185 कोटी रुपये व्याज रुपाने देणार आणि शेवटी सबसिडी देणार आहात. हे असे कुठपर्यंत चालणार आहे? शेतकऱ्यांची ही फसवणूक बंद झाली पाहिजे. साखर कारखाने बंद पडत आहेत. त्यांना आवश्यक असलेले कर्ज मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यांना कल्पना आहे की, या ठिकाणी आपण डुबलो तर पुन्हा उभे राहता येणार नाही. साखर कारखानदार आणि मजूर यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण करण्याचे काम सुरु आहे, ते त्वरित थांबले पाहिजे.

सभापती महोदय, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याचा कारभार चांगला चालला आहे अशी आम्हाला अपेक्षा होती. प्रत्येक माणसाचे दरडोई उत्पन्न 6 हजार रुपयांवरुन 10 हजार रुपये इतके वाढले पाहिजे, त्यासाठी नवनवीन प्रकल्प सुरु झाले पाहिजेत, रोजगारामध्ये वाढ झाली पाहिजे ही सर्वसामान्य लोकांची मागणी होती. परंतु शासन शेतकऱ्यांचे कर्ज माफ करायला तयार

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये......

नाही. नवीन प्रकल्प या राज्यात सुरु होत नाहीत. ज्या युवकांनी विधानसभेच्या सार्वजनिक निवडणुकीत या शासनाला भरभरुन मते दिली, त्या युवकांच्या हाताला काम मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. वारंवार सांगितले जाते की, शासनावर 3.5 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. मागील सरकारचे पाप आमच्या डोक्यावर आले आहे असेही सांगण्यात येत आहे. मागील सरकारने काही केले नाही म्हणून तुम्ही सत्तेवर आलेले आहात. सत्तेवर येऊन 9 महिने उलटले आहेत. 9 महिन्याच्या काळात गरीबातील गरीब शेतकऱ्याची 40 हजाराची सबसिडी तुम्ही बंद केली. शेतीसाठी जी काही अवजारे लागतात, साधनसामुग्री लागते त्यासाठीची मागासवर्गीय शेतकऱ्यांची सबसिडी तुम्ही बंद केली. त्यामुळे मागासवर्गीय शेतकरी आपल्या पायावर उभा राहू शकत नाही. अशी कित्येक उदाहरणे देता येतील. या राज्यातील जवळपास 15 ते 20 हजार उद्योगधंदे बंद पडले आहेत. त्यांना शासन आर्थिक पाठबळ देऊ शकत नाही. स्वस्त दरात वीज देऊ शकत नाही. राज्यातील कारखाने, उद्योग सुरु व्हावेत, रोजगार वाढावा, युवकांच्या हाताला काम मिळावे यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, मार्च 2015 अखेर पश्चिम विदर्भामध्ये 5500 कोटी रुपयांचा सिंचनाचा अनुशेष होता. विदर्भामध्ये 3422 कोटीचा बॅकलॉग शिल्लक आहे. आतापर्यंत तो बॅकलॉग वाढलेला आहे.

नंतर 2ए1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये...

तो बॅकलॉग आपण दूर करणार आहात की नाही ? त्या शिवाय पूर्व-पश्चिम विदर्भामध्ये विकास होऊ शकणार नाही. राज्यपालांच्या निदेशानुसार आपण पश्चिम महाराष्ट्र वेगळा समजून मराठवाडा, विदर्भासाठी 70 टक्के जास्त निधी, विकास निधी म्हणून द्यायला पाहिजे. ते मँडेटरी आहे. गेल्या अनेक वर्षापासून विदर्भावर अन्याय होत असल्याचे आम्ही पाहात आहोत. त्यामुळे आपण विदर्भाकडे जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे. आपण पचेल असे खोटे बोलावे. आपण जेव्हा सत्तेमध्ये नव्हता तेव्हा वेगळ्या विदर्भाची भाषा बोलत होता. माननीय मुख्यमंत्र्यांसह विदर्भातील सर्व नेते विदर्भ वेगळा झालाच पाहिजे, घेतल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारची भाषा करीत होते. परंतु, आता आपण वेगळ्या विदर्भाच्या मुद्यावर बोलणे देखील बंद केले आहे. त्याचा सुद्धा हिशोब विदर्भातील शेतकरी आपल्याकडे मागणार आहेत. त्यामुळे आपण आता न्यायाची भूमिका घेतली पाहिजे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलाची फी भरण्याची ताकद राज्यामध्ये नसेल तर ते चुकीचे आहे. आपण मागच्या वर्षी देखील फी माफ करण्यात येईल असे म्हटले होते. त्यांची फी अद्यापि माफ झालेली नाही. तेव्हा यासंबंधीचा निर्णय आपण खरोखरच घेणार पावसाळी अधिवेशनात आहात काय ? आपण या अधिवेशनात त्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय देणार आहात काय असा प्रश्न मी माननीय सभापती महोदयांच्या माध्यमातून विचारणार आहे. शेतकऱ्यांची 14 ते 15 हजार कोटी रूपयांची कर्ज मुक्त झाली पाहिजे असा मेसेज केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांना देखील पाठवून द्यावा. शेतकऱ्याला पुन्हा आपल्या पायावर उभे राहण्यासाठी कर्ज देऊन मदत करण्याची हिंमत या सरकारने दाखवावी एवढेच बोलून येथेच थांबतो. जय भीम.

......



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दुर्दैवाने राज्यामध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीसंबंधात माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजयजी मुंडे, सन्माननीय सदस्य श्री.माणिकरावजी ठाकरे यांनी या सदनामध्ये नियम 260 अन्वये जी चर्चा उपस्थित केली आहे त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनी अत्यंत प्रखर अशा शब्दामध्ये राज्यातील भीषण परिस्थितीचे वास्तव आपणा सर्वांच्या समोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. हा विषय राजकारणाचा नाही. निव्वळ आकडेवारीचा देखील नाही. केवळ भावनेवर आधारित राहून भाषण करण्याचा देखील नाही. राज्यामध्ये जे वास्तव निर्माण झाले आहे, राज्यभरातील शेतकऱ्यांसमोर जे संकट उभे राहिले आहे याकडे सर्वांनी मिळून अधिक प्रखरतेने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सरकारचे लक्ष याकडे वेधणे हे विरोधी पक्षाचे कर्तव्य आहे.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) :** सदर प्रस्तावावरील चर्चा आता थांबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे ऑन लेग राहतील. आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विशेष उल्लेखाच्या सूचना.

श्री.अनिल तटकरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबई व ठाणे येथे करारातील उल्लेखापेक्षा कमी क्षेत्रफळाची घरे बांधून 13 विकासकांनी जवळपास 15 लाख चौरस फूट क्षेत्रफळ हडप करून कोटयवधी रूपयांचा गंडा ग्राहकांना घातल्याचे वैद्यमापन शास्त्र विभागाच्या कारवाईत माहे जून 2015 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस येणे, याबाबत सखोल चौकशी करून ग्राहकांची फसवणूक केल्याप्रकरणी विकासकांवर कारवाई करण्यात यावी तसेच ग्राहकांना कमी क्षेत्रफळाची घरे देण्यात आल्याबाबत आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली मनपा आणि एम.एम.आर.डी.ए.च्या संयुक्त विद्यमाने कल्याण रेल्वे स्थानक परिसरात बांधण्यात आलेला स्कायवॉक हा पादचाऱ्यांची सोय व्हावी या उद्देशाने बांधला असला तरीही पालिका, एम.एम.आर.डी.ए.,रेल्वे पोलीस आणि स्थानिक पोलीस प्रशासनाच्या अनास्थेमुळे हा स्कायवॉक अनधिकृत फेरीवाले, गर्दुल्ले यांचा अड्डा झालेला असून, आता पर्यंत या स्कायवॉकला पाच वेळा आग लागण्याची घटना घडलेली असताना कोणत्याही प्राधिकरणाकडून अद्याप याची दखल घेतली नाही. कारण आता तर काही मंडळी या स्कायवॉक वर चक्क अन्न शिजवण्यासाठी चूल पेटवू लागले असले तरीही धृतराष्ट्राच्या भूमिकेतील प्रशासनाला जाग येत नसल्याने शासनानेच शेकडो कोटींच्या या स्कायवॉकच्या सुरक्षेबाबत योग्य ते आदेश संबंधितांना द्यावेत अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे.

.....

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा योजना सुरू असून, वीज देयके न भरल्यामुळे 20 पाणी पुरवठा योजना दुरूस्ती अभवी तर 52 नळ पाणी पुरवठा अशा एकूण 72 पाणी पुरवठायोजना बंद असणे, त्यामुळे जिल्ह्यात एप्रिल व मे महिन्यात पाण्याची मोठ्या प्रमाणात टंचाई निर्माण होणे, त्यामुळे जिल्ह्यातील मासळ, पाहमी, तुकूम, वलणी, नदगूर, कोटा, छोटा नागपूर, निंबाळा, पळसगाव, वरजई, कोठारी, मोहाळी, बामणी, दुधोली, कोरपना या गावातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागणे, त्यामुळे जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजना सुरळीत करण्यासाठी ग्राम पंचायतींना आर्थिक मदत करण्याची आवश्यकता अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

....

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रूपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

प्राचीन काळातील अनेक समाज उपयोगी व सार्वजनिक विहिरी, बारवा, रस्त्याच्या कडेने बांधलेल्या आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या अनेक विहिरी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी व रस्त्याच्या कडेने आहेत. जमिनीच्या आतमध्ये त्या विहिरी व बारवांचे दगडी बांधकाम अतिशय सुंदर केलेले आहे. त्या बांधकामाला विशिष्ट आकार दिले आहेत व त्यामध्ये भरपूर पाणी आहे. त्यांची पडझड सुरूआहे. त्यामध्ये गाळ साठला आहे. त्यावर अतिक्रमण सुरू आहे. त्या विहिरी व परिसरातील जमिनी शासनाच्या नावाने आहोत. त्याची शासनाने माहिती घेऊन त्या विहिरी व बारवा यांचा चिरंतन स्मारक म्हणून जतन व विकास करावा अशी मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मागणी करीत आहे.

....

...7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, उद्योगासाठी पोषक वातावरण निर्माण करणे आणि त्यातून नवनवीन उद्योगांना प्रोत्साहन देण्याची जबाबदारी शासनाच्या एमआयडीसीकडे आहे. परंतु, एमआयडीसीचे त्याकडे दुर्लक्ष आहे. यवतमाळ जिल्ह्यात केवळ दोन तीन तालुके सोडल्यास सर्वच ठिकाणी एमआयडीसीचे राखीव क्षेत्र आहे. नागपूर-बोरी-तुळजापूर महामार्गावर असणाऱ्या आर्णी तालुक्यामध्ये अद्याप एमाआयडीसीने राखीव क्षेत्र घोषित न करणे आणि ज्या तालुक्यामध्ये म्हणजेच यवतमाळ, पुसद, वणी आदी शहरे सोडल्यास इतर ठिकाणच्या एमआयडीसीत कोणतेही उद्योग सुरू झालेले नाहीत. याबाबत यवतमाळ जिल्ह्यातील एमआयडीसी परिसरात सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

....

...8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.मितेश भांगडीया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नागपूर येथील शासकीय दंत महाविद्यालयाला बाल दंतरोग तज्ज्ञ विभागाला दोन पदव्युत्तर जागा भारतीय दंत परिषद, कुटुंब कल्याण मंत्रालय व राज्य शासनाने मंजुरी दिलेली आहे. पदव्युत्तर जागांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या निकषांमध्ये विभागामध्ये 1 प्राध्यापक, 2 सहयोगी प्राध्यापक व 1 लेक्चरर असे आवश्यक असल्यामुळे वैद्यकीय शिक्षण संचालकांनी दोन सहयोगी प्राध्यापकांना अतिरिक्त कार्यभार दिला व सहयोगी प्राध्यापकांना प्राध्यापकांचा अतिरिक्त कार्यभार देऊन निकष पूर्ण केले. आरोग्य विद्यापीठाने निरीक्षण केल्यानंतर ज्या त्रुटी दाखविल्या होत्या त्या त्रुटींची दंत महाविद्यालयाद्वारे पूर्तता देखील करण्यात आली. त्यानंतरच कुटुंब कल्याण मंत्रालयाने 2 जागांना मंजुरी दिली. असे असताना नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाने केवळ अतिरिक्त कार्यभाराऐवजी नियमित प्राध्यापकांची नियुक्ती आवश्यक असल्यामुळे सदर दोन पदव्युत्तर शिक्षणाच्या जागांचा प्रस्ताव रखडला गेला आहे.याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष्य झाल्यामुळे मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडली आहे. त्यावर शासनाने तातडीने कार्यवाही करावी ही विनंती.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर):सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील परीक्षा नियंत्रण पदाकरिता तीनवेळा मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. मात्र एकाही व्यक्तीची निवड करण्यात न आल्याने हे पद रिक्तच आहे. सदर पदाकरिता एकूण 10 उमेदवारांपैकी फक्त पाच उमेदवार उपस्थित राहिले. विद्यापीठाचे तत्कालीन परीक्षा नियंत्रक यांनी राजीनामा दिल्यामुळे परीक्षा नियंत्रक पद रिक्त झालेले आहे. विद्यापीठाला परीक्षा नियंत्रण पद नसल्यामुळे प्रशासकीय निर्णय घेणे कठीण जाते तसेच या एकाच पदाकरिता तीन वेळा मुलाखत घेऊन प्रत्येक मुलाखतीची वेगळी जाहिरात प्रकाशित करुन शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

---

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पुणे महापालिकेचे सध्याचे शिक्षण प्रमुख आणि जिल्हा परिषदेचे तत्कालीन माध्यमिक शिक्षण अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांचे पदनाम प्रवर्ग, शिक्षण अर्हता न तपासता अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनियमितपणे मान्यता दिल्याचे माहे जून, 2015 च्या तिसऱ्या सप्ताहात उघडकीस येणे, तसेच श्री. बी.के.दहिफळे यांनी दिलेल्या अनियमित मान्यतेची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीने आपला अहवाल पुणे विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे पाठविलेला आहे. याबाबत सखोल चौकशी करुन बेकायदेशीर दिलेल्या मान्यतेप्रकरणी महापालिकेकच्या शिक्षण प्रमुखांवर कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, जैतापूर एज्युकेशन सोसायटीच्या जैतापूर येथील न्यू इंग्लिश स्कूल व श्रीमती स्नेहलता मांजरेकर कनिष्ठ महाविद्यालयात एकाच वेळी 2 मुख्याध्यापक कार्यरत असून जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) जि.प.रत्नागिरी यांनी विलास पुरुषोत्तम डंबे यांची प्रभारी मुख्याध्यापक म्हणून केलेली नेमणूक जैतापूर एज्युकेशन सोसायटीला मान्य नसून सोसायटीला सुरेश आप्पासाहेब जाधव हे मुख्याध्यापकपदी हवे आहेत त्यातच या संस्थेचा अंतर्गत वाद धर्मादाय आयुक्ताकडे सुरु आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने याबाबत शासनाने लक्ष घालून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आदेश द्यावेत अशी शिफारस विशेष या उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

-----

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पनवेल तालुका (जि.रायकड) परिसरात सिडकोने खारघर, नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली, उलवे, द्रोणागिरी हे नोड विकसित करण्यात आल्यामुळे या परिसरात लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. सिडको परिसरात अनेक वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना सवलतीच्या दरात भूखंड देण्यात आलेले आहेत. तसेच या परिसरात खासगी रुग्णालये बांधण्यात आलेली असून या रुग्णालयामध्ये मिळणारी वैद्यकीय सुविधा ही सर्वसामान्यांना परवडणारी नाही. त्यामुळे अनेकदा आर्थिक परिस्थिती बेताची असणाऱ्या रुग्णांना उपचार मिळत नसल्यामुळे उपचाराअभावी रुग्ण दगावल्याच्या घडना घडत असतात.

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कुटुंबाना उत्तम दर्जाच्या वैद्यकीय सुविधा मिळाव्यात याकरिता सिडकोने अत्याधुनिक रुग्णालये उभारणीच्या वाढत्या मागणीची दखल घेत प्रशासनाने खांदा वसाहत, खारघर, उलवे आणि नेरुळ या ठिकाणी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपमध्ये ही चारही रुग्णालये उभारण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपमध्ये सिडकोने अनेक अटींचा समावेश केल्यामुळे खासगी एजन्सीकडून प्रतिसाद मिळत नसल्याने सुपरस्पेशालिटी रुग्णालये फक्त कागदावरच राहिल्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना मोठया गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या गंभीर प्रकरणी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

----

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश गजभिये (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, दिनांक 16 जुलै, 2015 रोजी वा त्यासुमारास सांताक्रूझ पूर्व गोळीबार रोड क्र.3 येथे घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन झालेल्या अपघाताचे वृत्त संकलन करण्यासाठी गेलेल्या एका वृत्तवाहिनीच्या महिला पत्रकाराची 5 ते 7 जणांच्या टोळक्याने छेड काढून तिला मारहाण केल्याची घटना उघडकीस आली असून अलीकडे पत्रकार, खाजगी दूरचित्रवाहिनीच्या प्रतिनिधींना मारहाण अथवा छेडछाड करण्याच्या प्रकारामध्ये वाढ झाली असल्याने याप्रकरणी शासनाने चौकशी करुन वरील संबधित व्यक्तींना अटक करावी व पत्रकारांना संरक्षण देण्याच्यादृष्टीने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----

....6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, युजीसी आणि विद्यापीठाच्या मूल्यमापनात प्राचार्यांना अधिकाधिक गुण मिळावेत म्हणून प्राचार्यांनी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सह संचालक यांच्या सहकार्याने प्राध्यापकांच्या कामाचे तास 6 तास 40 मिनिटे असा नियम केल्याने प्राध्यापकांना कॉलेजमध्ये थांबावे लागणे, युजीसीने कुठेही 6 तास 40 मिनिटे काम करण्याचा आदेश दिला नसताना तो लागू केला जात असणे, पाचव्या वेतन आयोगानुसार 1998 च्या अधिसूचनेत प्राध्यापकांनी किमान पाच तास कॉलेजमध्ये शिकवणे अनिवार्य असणे, असे असताना सहसंचालक व प्राचार्य यांच्या संगनमताने स्वतःचे (प्रायार्यांचे) गुण वाढविण्यासाठी प्राध्यापकांवर होत असलेली सक्ती व बळजबरी अयोग्य व अन्यायकारक असल्याने युनिर्व्हर्सिटी प्रोफसर असोसिएशन व फुले-शाहू व आंबेडकर संघटनेत तसेच प्राध्यापकात शासनाविरुद्ध पसरलेला तीव्र असंतोष, पसरेलेले चिंतेचे व नैराशेचे वातावरण, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी प्राध्यापकावर कामाच्या तासाची केलेली सक्ती तात्काळ मागे घेण्याची आवश्यकता, सदर बाब प्राध्यापकावर अन्याय कारक असून शैक्षणिक दृष्टया महत्वाची असल्याने मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मांडत आहे. परवानगी मिळावी.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 101-अ अन्वये मी खालील प्रमाणे विशेष उल्लेखाची सूचना देत आहे, कृपया सदर सूचना स्वीकृत करुन सभागृहामध्ये मांडण्यास मला अनुमती द्यावी, ही विनंती.

ठाणे मेट्रो प्रकल्पाचे भूमिपूजन याच वर्षात (2015 मध्ये) करण्यात येईल, असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 8 एप्रिल, 2015 रोजी घोषित केले आहे. तथापि, सदर ठाणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी अंदाजे 22 हजार कोटी निधीची आवश्यकता असताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) त्यासाठी केवळ 10 कोटी रुपयाइतक्या रकमेचीच तरतूद केली असल्याचे माहे एप्रिल, 2015 निदर्शनास आले आहे. वास्तविकत: गेल्या 5-6 वर्षापासून म्हणजे सन 2009 पासून ते आजतागायत ठाणे येथील विधिमंडळ सदस्य व लोकप्रतिनिधी शासनाकडे वारंवार आग्रही मागणी करीत असताना देखील या प्रकल्पासंदर्भात फक्त सल्लागार नेमणे व सर्वेक्षण करणे याखेरीज अन्य कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे केवळ सल्लागार नेमणे व सर्वेक्षण करणे यासाठीच जनतेचा पैसा वाया घालविला जात आहे की, काय असा ठाणेकर जनतेच्या मनामध्ये संशय निर्माण झालेला आहे. कारण ठाणे मेट्रो प्रकल्पानंतर जाहीर करण्यात आलेल्या नागपूर व पुणे येथील मेट्रो प्रकल्पांना शासनाने ताडीने चालना दिल्यामुळे ठाणे येथील प्रकल्पाबाबत शासनस्तरावरुन दुजाभाव होत असल्याचा जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे ठाणे मेट्रो प्रकल्पाबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करुन मा.मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केल्यानुसार प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात यावे, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे.

----

...8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील राष्ट्रीय महामार्ग विशेषत: मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर हॉटेल मालक व ढाबे चालकांकडून प्रवाशांची मोठया प्रमाणावर आर्थिक लूट करण्यात येणे, महामार्गावरील हॉटेल आणि ढाब्यांवर पिण्याचे पाणी आणि खाद्य पदार्थांची विक्री करताना छापील किंमतीपेक्षा दुप्पट भावाने विक्री करण्यात येणे, राज्य शासनाने यास प्रतिबंध केलेला असतानाही शासनाच्या कोणत्याही विभागाकडून याबाबत हॉटेल मालकांवर कारवाई करण्यात न येणे, खाजगी बस आणि महामंडळाच्या बसेसच्या चालकांना प्रलोभन दिल्यामुळे सक्तीने प्रवाशांना अशा हॉटेल आणि ढाब्यावर बेभाव खाद्यपदार्थ आणि पाणी विकत घेण्याची वेळ येणे, सक्तीने प्रवाशांची आर्थिक लूट होणे, शासनाकडे तक्रार देवूनही दोषीविरुद्ध कारवाई न होणे, यामुळे प्रवाशांच्या आर्थिक लुटीचा गंभीर प्रश्न निर्माण होणे आणि या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

-----

यानंतर श्री.भारवि.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दिनांक 19 जुलै, 2015 रोजी मुंबई-पुणे आडोशी बोगद्याजवळ दरड कोसळल्यामुळे तीन जणांचा मृत्यू झाला तर तीन महिला गंभीर जखमी झाल्या. दरड कोसळल्यामुळे तेथील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे त्या महामार्गावरील हजारो प्रवाशांना ताटकळत रहावे लागले व हजारो प्रवाशांचे अतोनात हाल झाले. तसेच दिनांक 22 जून, 2015 रोजी खंडाळा बोगद्याजवळ दरड कोसळल्यामुळे तो मार्ग 24 तास ठप्प होता. मुंबई-पुणे मार्गावर दरड कोसळण्याच्या घटनेमध्ये वाढ झाल्यामुळे त्या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरड न कोसळण्याबाबत कारवाई करण्याबाबत शासनास अपयश आले आहे. या गंभीर बाबीकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे." त्याकडे शासनाचे लक्ष वेधण्याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

---------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दिनांक 5 एप्रिल, 2015 रोजी इंदू मिलच्या जागेच्या संदर्भात केंद्र शासन, राज्य शासन आणि इंदू मिलची मालकी असलेल्या राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ असा त्रिपक्षीय करार होऊन इंदू मिलच्या 12 एकर जागेचे हस्तांतरण करण्यासाठी एनटीसीला दुसरी जागा अथवा सरकारी भावाने जी काही किंमत होईल ती देण्याचे व त्यासाठी एक उप समिती नियुक्त करण्याचे ठरविण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत उप समितीची नियुक्ती करण्यात आलेली नाही आणि जागा हस्तांतरण करण्याची तारीखही ठरविण्यात आलेली नाही. त्यामुळे या जागेचा प्रश्न अद्यापपर्यंत सोडविण्यात आलेला नाही. इंदू मिलच्या जागेवर संविधानाचे निर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी इंदू मिलच्या जमिनीचे हस्तांतरण करण्यापूर्वी एक उप समिती गठीत करण्यात आलेली नसल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला अजून मुहूर्त सापडलेला नाही. त्यामुळे राज्यातील आणि देशातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोषाची आणि संतापाची भावना निर्माण झालेली आहे. इंदू मिलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी त्वरित हस्तांतरित करण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या पांडुरंगाची नित्य पूजा, महापूजा आणि वारकऱ्यांची पूजा या तिन्हा पूजा एकत्रितपणे घेण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आषाढी एकादशी निमित्त हजारो वारकरी पंढरीच्या दिशेने निघाले आहेत. मी स्वत: शनिवारी पंढरपूरला भेट देऊन आले. सभागृह नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे येथे उपस्थित आहेत. सोलापूर जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री.तुकाराम मुंडे यांनी आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या पांडुरंगाची नित्य पूजा, सरकारी महापूजा आणि वारकऱ्यांची पूजा या तिन्ही पूजा एकत्रितपणे करण्याचा निर्णय घेतला आहे. माझा मूलभूत मुद्दा असा आहे की, सर्व देवस्थाने सरकारच्या अखत्यारित असल्यामुळे जिल्हाधिकारी तेथील प्रमुख आहेत. आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या पांडुरंगाची महापूजा माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते व्हावी ही हजारो वारकऱ्यांची भावना आहे. त्यामध्ये बदल घडविल्यामुळे समाजामध्ये फार असंतोष निर्माण झालेला आहे. आपण सर्वजण पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त आहोत. पूजेचा मुद्दा, वारकऱ्यांच्या प्रवासासंबंधीचा मुद्दा, वाळवंटाबद्दलचा मुद्दा या सर्व मुद्यांबाबत वारकऱ्यांच्या भावना तीव्र आहेत. या संदर्भात वारकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारचे काय धोरण आहे याबाबत आम्हाला मार्गदर्शन करावे आणि त्याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करावी अशी विनंती आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आषाढी एकादशीच्या निमित्ताने हजारो वारकरी पंढरपूरच्या दिशेने जात आहेत. काही पंढरपूरपर्यंत पोहोचले आहेत. या ठिकाणी सन्मानीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी वारकऱ्यांच्या संदर्भात काही उपस्थित केले. मी त्याबाबत सांगू इच्छितो की, उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे काही प्रश्न उपस्थित झालेले आहेत तर काही प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयामुळे उपस्थित झालेल आहेत. माननीय उच्च न्यायालयाने पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या संदर्भात राहुटी उभारण्याबाबत काही आदेश दिले आहेत, त्याबाबत सरकार वेगळा विचार करीत आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सरकारने सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लीव्ह पिटीशन दाखल केली आहे.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांनी तिन्ही पूजा एकत्रितपणे घेण्यातचे ठरविले आहे. गेली 700 वर्षे पांडुरंगाची नित्य पूजा, महापूजा आणि वारकऱ्यांची पूजा अशा तीन वेळा पूजा होत असते. जिल्हाधिकाऱ्यांनी या तिन्हा पूजा एकाचवेळी घेण्याचे का ठरविले, त्या मागील कारण जाणून घेण्यासाठी उद्या जिल्हाधिकाऱ्यांना बोलाविलेले आहे. मी सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो की, फार काही न्यायिक अडचण नसेल किंवा न्यायालयाचे काही निर्देश नसतील आणि शासनाच्या अखत्यारितील बाबी असतील तर या तिन्ही पूजा नित्याप्रमाणे होण्यासाठी शासन चर्चा करुन निर्णय घेईल. या संदर्भात जो काही निर्णय होईल तो उद्या संध्याकाळपर्यंत सभागृहात जाहीर करण्यात येईल.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे):** मी सभागृहाची बैठक सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5.45 ते 6.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

यानंतर श्री.बोर्डे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी पुन्हा 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6.00 ते 6.10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)**

**पृ.शी.** : मासेमारीबाबत (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XI OF 2015.

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA FISHERIES ACT, 1960.)

श्री. एकनाथराव खडसे (मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-11, महाराष्ट्राचा मासेमारीबाबत अधिनियम, 1960 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, पेसा म्हणून ओळखला जाणारा पंचायतीचा कायदा आला आहे. सदर कायद्याच्या अंतर्गत अनुसूचित क्षेत्रावर विस्तार करणे आणि अधिनियम, 1996 चा 40 हा संबंधित गावांतील लघु जलाशयांच्या संदर्भातील एक कायदा आहे. ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये 100 हेक्टरपर्यंतचे जे तलाव आहेत, त्या तलावांमधील मासेमारींचे ठेके ग्रामपंचायतीला करण्याचा अधिकार द्यावा अशी बऱ्याच वर्षांपासूनची मागणी होती. ग्रामपंचायतीचे अनुशेषग्रस्त आदिवासी क्षेत्र आहेत, अशांमध्ये त्या ग्रामपंचायती बळकट करणे, त्यासाठीचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे यासाठी या पंचायतींना समुचित पातळीवर व्यवस्थापन करण्यासाठी अधिकार प्रदान करणे यासाठी पेसाच्या तरतुदीचा प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी हे विधेयक आणले आहे आणि या अंतर्गत 100 हेक्टर तलावांचे लिलाव करण्याचे अधिकार स्थानिक ग्रामपंचायतींना देत आहोत. इतकेच नव्हे तर त्या माध्यमातून येत असलेले उत्पन्न ते त्या-त्या ग्रामपंचायतींना वर्ग करावे म्हणजे उत्पन्नाचे साधन निर्माण होईल. ग्रामपंचायतीच्या हद्दीत येत असेल तर त्या ग्रामपंचायतीला, दोन ग्रामपंचातींच्या हद्दीत येत असेल तर दोन्ही ग्रामपचायंतीच्या सहमतीने पंचायत समिती निर्णय घेईल, पंचायत समितींच्या क्षेत्राच्या मध्ये असेल तर त्याचा निर्णय जिल्हा परिषद घेईल. सदर बाबतीतील निर्णय कोणी घ्यावा या संदर्भातील अधिकार जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांना या अंतर्गत देत आहोत. अनुसूचित क्षेत्रासाठी, जास्तीत जास्त टोकाची गावे आहेत अशासांठी, पेसाने अंतर्भूत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

केलेले आहेत तेवढ्यांसाठी हे दिले आहे. पुढील काळात दुसरे विधेयक येणार आहे, त्या काळात 200 हेक्टरपर्यंतचे तलाव हे क्षेत्र सोडूनही अन्य क्षेत्रातील ग्रामपंचायतींना उत्पन्नासाठी देण्याचा सरकारचा विचार आहे. ग्रामपंचायती त्यामधून मजबूत होतील. राज्यातील मासेमारीच्या संदर्भात धोरण बदलत चालले आहे. केंद्र शासनाने या संदर्भात पेसा कायदा मंजूर केला आहे आणि त्या अंतर्गत ग्रामपंचायती मजबूत झाल्या पाहिजे, उत्पन्नाची साधने त्यांना मिळाली पाहिजे यासाठी हे विधेयक सभागृहात आणले आहे. आपण या विधेयकाला मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती** (श्री. दीपकराव साळुंखे) : आता सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक-11, महाराष्ट्राचा मासेमारीबाबत (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 11 - महाराष्ट्राचा मासेमारीबाबत (सुधारणा) विधेयक, 2015 माननीय मंत्र्यांनी मांडले आहे. विधेयकाचा उद्देशही कथन केला आहे. महत्त्वाची बाब अशी की, 100 हेक्टरपर्यंत असलेले तलाव, जलाशय यांचे लिलाव करण्याच्या संबंधीचे अधिकार ग्रामपंचायतीला देण्यासबंधीची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. भारत सरकारने कायदा मंजूर केला आहे. राज्य शासनाने त्या कायद्याचे स्वरूप राज्यामध्ये मान्य केले आहे. पेसा अंतर्गत असलेल्या ग्रामपंचायतीच्या हद्दीतच, असा त्याचा अर्थ माननीय मंत्र्यांनी सूचित केल्याप्रमाणे ध्वनित होतो. ग्रामपंचायती हद्दी पेसा अंतर्गत मोडतात. जेथे केवळ आदिवासींची लोकसंख्या आहे तेवढ्यापुरते असा त्याच अर्थ आहे असे मी समजतो. माझ्या समजण्यामध्ये् गल्लत होत असेल तर आपण दुरूस्ती करावी. माझी सरकारला विनंती आहे की, केवळ पेसाअंतर्गत समावेश असलेल्या ग्रामपंचायतींच्या हद्दीपुरता एवढा निर्णय होणे उपयुक्त ठरणार नाही. कारण असे की, अशा अंतर्गत असलेल्या ग्रामपंचायती, तालुके, जलाशय यांची संख्या खूप मर्यादित असते. ग्रामपंचायतीला त्याचे उत्पन्न जरूर मिळेल. पण त्याचबरोबर ही बाब स्पष्ट करण्यात आलेली नाही. कारण 100 हेक्टर पर्यंतचे जलाशय जिल्हा परिषदेच्या मार्फत बांधले जातात. 100 ते 250 हेक्टरपर्यंतच्या जलाशयांना जलसंधारण विभागामार्फत मान्यता देण्यात येते. 250 हेक्टरच्या वरील जलाशय राज्य शासन त्याच्या विभागाच्या माध्यमातून करते. जलाशयाच्या मासेमारीच्या विक्रीसंबंधाचे अधिकार दिले तर नेमका या जलाशयाचा हक्क कोणाकडे राहणार ? ग्रामपंचायतीकडे राहणार असेल तर जलाशयामधून मिळणाऱ्या मासेमारीतून मिळणारे उत्पन्न हे काही फार मोठे राहणार नाही. अनेक वेळा ही बांधलेली जलाशये, तलाव अनेक वर्षांपासूनची बांधली गेली आहेत. अनेक वेळा अतिवृष्टी झाली की, त्यांच्या देखभालीचा प्रश्न निर्माण होतो. मग अशा वेळी त्यांच्या देखभाल व दुरूस्तीचा खर्च कोण करणार ? ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून असे एकदा अधिकार दिले आणि मग त्याची कायमची देखभाल व दुरूस्ती ग्रामपंचायतींनी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

करायची असे ठरविले तर तो कदाचित त्या अदिवासी बांधवांवर अन्याय होऊ शकेल. आज आदिवासी क्षेत्रांमध्ये असलेल्या ग्रामपंचायतींच्या उत्पन्नाचे स्त्रोत कमी आहेत आणि अशा वेळी कायद्यात महत्त्वाची त्रुटी राहिली तर भविष्यात त्याची देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे निधी राहणार नाही आणि त्यांनी सरकारकडे निधी मागितला तर आपण सांगाल की, सर्व हक्क तुमच्याकडे दिले आहेत. त्यामुळे या संदर्भातील सर्व जबाबदारी तुमच्याकडे येईल. मी म्हणतो की, केवळ पेसा अंतर्गत हा निर्णय करू नका. निर्णयाची स्पष्टता सर्व पातळीवर येणे आवश्यक आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, 100 ते 200 हेक्टरच्या जलाशयांचा निर्णय नंतरच्या कालावधीत घेतला जाईल. आपण त्याचा निर्णय ज्यावेळी घ्यायचा त्यावेळी घ्यावा. राज्यात आज केवळ पेसाअंतर्गत असलेल्या ग्रामपंचायतींच्या सीमित हा निर्णय घेऊ नये. ग्रामपंचायती खरोखर सक्षम करायच्या असतील त्या संदर्भातही निर्णय घ्यावा. 83 व्या घटना दुरूस्तीनंतर केंद्र सरकारने स्वीकारलेल्या धोरणामुळे राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वायत्तता निर्माण करण्याचा प्रयत्न झाला.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल तटकरे..........

मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होतो त्यावेळचे अधिकार, त्या पूर्वीचे अधिकार आणि 73 व्या घटना दुरूस्तीमुळे मिळालेल्या व्यापक अधिकारांची मला कल्पना आहे. जिल्हा परिषदांना केंद्र सरकारकडून आणि राज्य सरकारकडून निधी उपलब्ध झालाच. परंतु, त्याचबरोबर वित्त आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने सुध्दा ग्राम पंचायतींना, पंचायत समित्यांना आणि जिल्हा परिषदांना या निधीचा किती वाटा मिळणार आहे, याचीही स्पष्टता केंद्र सरकारने केली. त्यामुळे आता निधी वळविता येत नाही. एवढेच नव्हे तर ज्यावेळी जिल्हा परिषदेकडे निधी जातो त्यावेळी जिल्हा परिषदेचे गट किंवा पंचायत समितीचे गण यांना वित्त आयोगाचा निधी समप्रमाणात वाटला गेला पाहिजे, अशा प्रकारचा कायद्याचा धाक निर्माण करणारा निर्णय बाराव्या व तेराव्या वित्त आयोगाच्या वेळी आपल्या राज्याने घेतला. एका बाजूला हे बदल होत असताना आपण या विधेयकाच्या माध्यमातून एक चांगला निर्णय घेतला आहे, याबद्दल मी आपले आभार मानतो आणि अभिनंदनही करतो. असे करीत असताना या निर्णयाची व्याप्ती वाढली नाही तर त्याचे दुरगामी परिणामही होऊ शकतील, अशी इशारे-वजा-सूचनाही आपल्याला करतो.

सभापती महोदय, केवळ उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून ग्राम पंचायतीला लिलावाचे अधिकार देणार असाल तर ठीक आहे. परंतु, त्यांच्या देखभाल व दुरूस्तीच्या संदर्भात आताच स्पष्टता करणे आवश्यक ठरेल.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी त्यांच्या प्रास्ताविकात असे सांगितले की, एखाद्या जलाशयाचे क्षेत्र जर दोन ग्राम पंचायतीमध्ये विभागले असेल तर त्यासंबंधीचा निर्णय पंचायत समिती घेईल. परंतु, पंचायत समितीमध्ये निर्णय होत असताना किती बुडित क्षेत्र कोणत्या ग्राम पंचायतीमध्ये आहे, असा प्रश्न उपस्थित होईल. या बाबतीत राजकीय निर्णय होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यासाठी त्याबाबतचे नियम आपल्याला करावे लागतील. कारण, कायद्यात बदल केल्यानंतर जर त्याचे नियम तयार केले नाही, त्याबाबतची स्पष्टता आणली नाही तर अपिलावर अपिल होतील आणि या विधेयकाचा उद्देश सफल होणार नाही. त्यामुळे याबाबतची स्पष्टता येणे गरजेचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल तटकरे..........

सभापती महोदय, दोन तालुक्यांमध्ये जलाशयाचे क्षेत्र विभागले गेले असेल तर जिल्हा परिषद निर्णय घेईल, असे महसूल मंत्री महोदयांनी सांगितले आहे. अनेक वेळा असे होते की, एक पंचायत समिती एखाद्या विचाराच्या ताब्यात असते, दुसरी पंचायत समिती दुसऱ्या विचाराच्या आणि जिल्हा परिषद तिसऱ्याच विचाराच्या ताब्यात असते. त्यामुळे अशा ठिकाणी निर्णय घेताना राजकीय विचार करुन घेतला जाईल की नियम करुन त्याबाबतची स्पष्टता आणली जाईल, याबाबतचाही निर्णय होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, उत्पन्नाचा स्त्रोत हा या विधेयकाचा गाभा आहे. हा एक अत्यंत चांगला उपक्रम आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या बळकटी आणण्याच्या आणि त्या अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीकोनातून हे अतिशय चांगले पाऊल राज्य सरकारने उचलले आहे. नियम करण्याच्या बाबतीत मंत्री महोदयांनी असे सांगितले की, आम्ही दुसरा कायदा करीत आहोत. हे नियमन करीत असताना ग्राम पंचायतीला अधिकार मिळाल्यानंतर त्या बाबतीत सुध्दा स्पष्टता आली पाहिजे. हा निर्णय नक्कीच चांगला आहे. आपण ई-टेंडरिंग व्दारा प्रत्येक गोष्टी पारदर्शक पध्दतीने करण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्यामुळे जलाशयामध्ये नेमके किती मासे आहेत, लिलावाची कमाल मर्यादा काय राहील, याबाबतचे ज्ञान ग्राम पंचायत स्तरावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना असेलच, असे मानता येणार नाही. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी त्यामध्ये आहेत. हा चांगला निर्णय घेतला आहे. मघाही मी या निर्णयाबद्दल सरकारचे अभिनंदन केले आहे. मात्र, या सर्व गोष्टींबाबत स्पष्टता येणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, माझी एक विनंती किंवा दुरूस्ती आहे. आपण ती स्विकारली तर लाभदायकच होईल. पेसा कायद्याअंतर्गत ग्राम पंचायतींना दिलेले अधिकार एवढ्यापुरतेच हे सीमित न करता संपूर्ण राज्याला याचा फायदा झाला तर अधिक चांगले होऊ शकेल. हा कायदाच असा आहे की, या कायद्याअंतर्गत वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले आहेत. मला काही आदिवासी आमदारांचे अभिनंदन करावयाचे आहे. पेसा अंतर्गत निर्णय होत असताना भरतीच्या संदर्भात किंवा

इतर प्रश्नांच्या संदर्भात बिगर आदिवासींवर अन्याय होतो.  कदाचित, आदिवासी विकास मंत्री

...3....



श्री.सुनिल तटकरे..........

महोदय याबाबत अधिक स्पष्टता आणू शकतील.  त्याही तालुक्यामध्ये इतरांची संख्या मोठी असू शकते. या विषयाच्या बाबतीत निर्णय घेणे गरजेचे आहे. त्या तालुक्यामध्ये आपण ग्राम पंचायतींना अधिकार देणार आहोत, असे एकंदरीत मंत्री महोदयांच्या प्रास्ताविकातून स्पष्ट होत आहे.  या चर्चेच्या अनुषंगाने जे जे विषय मी या ठिकाणी मांडले आहेत, त्या बाबतीतील स्पष्टता राज्य सरकारकडून विधेयक मंजूर होण्यापूर्वी यावी, एवढीच अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

--------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 11-महाराष्ट्राचा मासेमारीबाबत (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, मी सर्वप्रथम सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करते. संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासींच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटना आहेत. विदर्भ विकास मंच तसेच रायगड, नाशिक, या सारख्या जिल्ह्यांमध्ये काम करणाऱ्या जवळ जवळ 100 च्या वर संख्या असलेल्या संघटना गेल्या 4 वर्षापासून या संदर्भातील मागण्या करीत आहेत. विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये देखील या संदर्भातील चर्चा झालेली आहे. सन्माननीय श्री.एकनाथराव खडसे-पाटील हे विरोधी पक्ष नेते असताना पासून या संघटनांची या संदर्भातील मागणी होती.

सभापती महोदय, ग्राम पंचायती अंतर्गत विशेषत: अनुसूचित क्षेत्रातील लघु जलाशयांबाबतची आतापर्यंतची ग्रामीण भागातील आणि आदिवासी भागातील वस्तुस्थिती आपल्या सर्वांना माहीत आहे. अनेक ठिकाणी सब कॉंट्रॅक्टरकडून, स्थानिक नसणाऱ्यांकडून, हितसंबंधियांकडून ठेके घेतले जात होते. या पार्श्वभूमीवर याचाही उल्लेख केला पाहिजे की, सभापती महोदयांनी सुध्दा एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये संघटनांचे असे म्हणणे होते की, ज्याप्रमाणे वनांचे व्यवस्थापन स्थानिक आदिवासींवर सोपविले आहे, त्याप्रमाणेच अनुसूचित भागातील, आदिवासीबहुल भागातील लघु जलाशयांचे नियोजन आणि व्यवस्थापन तेथील स्थानिक जनतेला दिले पाहिजेत. आज या विधेयकाच्या माध्यमातून शासनाने हे अधिकार ग्राम पंचायतींना दिलेले आहेत, याबद्दल मी सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करते.

सभापती महोदय, मला या निमित्ताने दोन मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत. जिथे जंगले आहेत तेथे आदिवासी आणि बिगर आदिवासी यांची लोकसंख्या तुल्यबळ असते किंवा आदिवासी काही प्रमाणातच म्हणजे 5-10 टक्क्यांनी जास्त असतात, अशा गावांमध्ये निर्णय होत असताना अनेक अडचणी येत असतात. या बैठकीत संबंधित विभागाच्या सचिवांनी असे निदर्शनास आणून दिले की, ग्राम पंचायतींमध्ये निर्णय घेण्याची सक्षमता कशा पध्दतीने आणता येईल, याबाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. त्या बैठकीत आणखी एक मुद्दा असा चर्चेला आला होता की, गावांची व्याख्या करीत असताना आपण गावाची संख्या लक्षात घेतो. काही आदिवासी भागांमध्ये एकत्रित

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे.........

गावे नसून छोटे छोटे पाडे असतात व त्यांची लोकसंख्या 100 ते 150 च्या आसपास असते. अशा पाड्यांच्या बाबतीत नक्की कोण निर्णय घेणार, हा देखील एक प्रश्न आहे. ग्राम पंचायतीमध्ये काम करीत असताना या अडचणी येतात.

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या उप समितीने निर्णय दिला असला तरी माझ्या माहितीनुसार अनेक वर्षांपासून या सूचना प्रलंबित होत्या. आता आपण सरकारतर्फे त्या अमलात आणल्या आहेत. पेसा कायद्याच्या संदर्भात काम करणाऱ्या संघटना, ग्रामसभेत काम करणारे कार्यकर्ते या कायद्याचे स्वागत करतीलच. पण मला असे वाटते की, या मासेमारीच्या संदर्भात ग्रामीण भागातील एक उत्पादनाचे साधन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन स्थानिक लोकांकडे सोपविण्याच्या दृष्टीने सरकारने हे अतिशय महत्वाचे पाऊल उचलले आहे.

सभापती महोदय, या विधेयकात असेही म्हटले आहे की, "लघु जलाशयांच्या संबंधी निर्माण झालेला महसूल ग्राम निधीत विनियोजित करण्यात येईल आणि तो वाटून घेतला जाईल." मला असे नेहमी वाटते आणि मी काही मुद्दाम कुणाच्या बाजूने बोलायचे म्हणून बोलणार नाही. पण बिगर आदिवासींच्या तुलनेत आदिवासी समाज स्वत:चे नियम ठरविण्याच्या बाबतीत खूप प्रगत आहे. त्या मानाने त्यांच्यामध्ये कमी तंटे होतात आणि आपापसात मोठ्या प्रमाणावर समजुतीचे व्यवहार होतात. याबाबतचे अनेक प्रयोग राज्यातील अनेक संघटनांनी केलेले आहेत. विशेषत: लेखामेंढ्याच्या प्रयोगाचा मी या ठिकाणी उल्लेख करीन. त्यांच्या प्रयोगाचा राष्ट्रीय स्तरावर अभ्यास झालेला आहे. याच पार्श्वभूमीवर मी असे म्हणेन की, राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाईल, अशा प्रकारचा एक ऐतिहासिक निर्णय सरकारने या विधेयकाच्या माध्यमातून घेतलेला आहे. मी सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करते आणि या विधेयकाचे समर्थन करून माझे दोन शब्द पूर्ण करते.

-------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 11-महाराष्ट्राचा मासेमारीबाबत (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, हे विधेयक आणल्याबद्दल मी सरकारचे स्वागत करते. परंतु, मासेमारीच्या संदर्भात सर्वात जास्त तणाव पूर्व विदर्भात आहे. मासेमार आणि शेतकरी यांच्यामध्ये नेहमीच असा वाद होतो. शेतकऱ्यांचे खरीप हंगामाचे पाणी शेतकऱ्यांच्या हक्काचे असते आणि उर्वरित पाणी मासेमारीसाठी असते. पावसाळ्यामध्ये बरोबरीने मासेमारी होत असते. मासे वाढत असताना ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबरचा काळ असतो. तोपर्यंत खरीप हंगामाला पाणी दिले जाते. पाण्याची पातळी कमी झाली की, मग मासे काढून टाकावे लागतात. कारण, 5 फुटाच्या वर पाणी नसेल तर ते मासे पाणी गरम होत असल्यामुळे मरुन पडतात. त्यामुळे नेहमी हा वाद निर्माण होतो. खरिप हंगामाचे पाणी शेतकऱ्यांच्या हक्काचे असल्यामुळे ते त्यांना द्यावे लागते. अशा परिस्थितीत जास्तीचे पाणी उपलब्ध होण्यासाठी तलाव दुरुस्ती, देखभाल या सर्व गोष्टींचा विचार करुन ग्राम पंचायतीला अधिकार द्यावे लागतील, असे सूचवून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

------------

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे ( दुग्ध विकास आणि मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या विधेयकाच्या संदर्भात आपले विचार मांडले आहेत. या विधेयकावर बोलताना त्यांनी काही मौलिक सूचना केलेल्या आहेत आणि या सर्व सूचना स्वीकारण्यायोग्य आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी ज्या शंका व्यक्त केल्या त्या खऱ्या आहेत की, शंभर हेक्टरचा तलाव हा अत्यंत छोटा तलाव आहे. त्यातून 2 हजार, 5 हजार, 10 हजार रुपये उत्पन्न मिळेल. परंतु, त्या तलावाची दुरुस्ती करावयाची म्हटली तर ती लाखामध्ये होईल आणि हे तलाव वर्ग करुन दुरुस्तीसाठी पैसे उपलब्ध होणार नाहीत आणि त्यामुळे ग्रामपंचायती अडचणीत येतील, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, आपण हे तलाव त्या ग्रामपंचायतीकडे देत असताना त्याची देखभाल दुरुस्ती जिल्हापरिषदच करणार आहे आणि ती जिल्हापरिषदेच्या निधीतून करण्यात येणार आहे. आज जिल्हापरिषदेला शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जातो. त्याप्रमाणे यानंतरही जिल्हापरिषदेला देखभाल दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल. दुसरे म्हणजे, सिमेच्या संदर्भात काही वाद असतात. आपले म्हणणे बरोबर आहे की, एकाच गावाच्या संदर्भात मोठा भाग, लहान भाग असा वाद निर्माण झाला तर काय करावयाचे आणि वेगवेगळ्या विचारांच्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या असतील तर कोणता निर्णय होईल ? म्हणून ज्या गावाच्या क्षेत्रात तलावाचा मोठा हिस्सा आहे अशाच गावाला प्राधान्य देणे आणि त्या संदर्भात आणखी काही निर्णय घेण्यात येत असतील तर शासन अशा स्वरुपाच्या सूचना राजपत्राद्वारे किंवा शासन निर्णयाद्वारे स्थानिक पातळीपर्यंत देईल. त्यामुळे विवाद कमी होतील आणि ज्या क्षेत्रात तलावाचा मोठा हिस्सा आहे त्यांना न्याय मिळू शकेल.

सभाती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, तलावातील पाणी शेतीसाठी राखून ठेवले जाते. परंतु, जे शंभर हेक्टर पर्यंतचे तलाव आहेत त्या तलावातील पाणी साधारणतः शेतीसाठी देण्याची व्यवस्था नसते. आपण अशा ठिकाणी परवानगी देत नाही. जशी मोठ्या धरणातून शेतीसाठी पाणी वापर करण्याची परवानगी दिली जाते तशी ती



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे........

शंभर हेक्टरच्या तलावातून दिली जात नाही. त्या तलावातील पाणी झिरपून विहिरीतील पाण्याची पातळी वाढावी, हा त्यामागचा हेतू असतो. त्यामुळे तलावातील पाणी राखून ठेवले पाहिजे आणि या तलावातील पाण्याचा कशा प्रकारे वापर करावयाचा या संदर्भातील निर्णय ग्रामपंचायतीने घ्यावयाचा आहे. या तलावातील पाण्याचा वापर मासेमारीसाठी करावयाचा, की अन्य प्रयोजनासाठी करावयाचा, हे त्या ग्रामपंचायतीने ठरवायचे आहे. तसेच, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी सांगितले की, पेसा अंतर्गत आदिवासी क्षेत्रासाठी हा निर्णय घेतला आहे आणि राज्यातील सर्व ग्रामपंचायतींसाठी हा निर्णय घेण्यात यावा, अशी त्यांनी सूचना केलेली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्यात जेवढ्या ग्रामपंचायती आहेत आणि ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत असे शंभर हेक्टर पर्यंतचे तलाव असतील त्या तलावांच्या संदर्भातही त्यांना याच धर्तीवर देण्याच्या संदर्भात या सभागृहात पुन्हा....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांची इच्छा असेल तर त्यांनी याच विधेयकामध्ये तशी दुरुस्ती करावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, काही हरकत नाही. माझी तयारी आहे. मी दुरूस्ती स्वीकारायला तयार आहे. फक्त ती दुरूस्ती सत्ताधारी पक्षाकडून मांडावी लागेल. (...अडथळा...) एखादी दुरूस्ती असेल तर त्याला काही हरकत नाही. परंतु, शासकीय विधेयक असल्यामुळे तांत्रिक बाबींची पूर्तता करावी लागेल. आपली दुरूस्ती स्वीकारार्ह आहे. मी हीच दुरूस्ती सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मांडली असे गृहीत धरून असा निर्णय घेतो की, राज्यात जेवढ्या ग्रामपंचायती असतील आणि त्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत जेवढे शंभर हेक्टरचे तलाव असतील त्या तलावांमधील मासेमारीच्या सर्व ठेक्याचे अधिकार त्या ग्रामपंचायतींना असतील. त्यातून जो पैसा मिळणार आहे तो त्यांच्या ग्राम निधीमध्ये वर्ग करण्याची शासन परवानगी देईल आणि यासाठी जी देखभाल दुरूस्ती होणार आहे ती जिल्हापरिषदेच्या माध्यमातून करण्यात येईल. आपल्याला या माध्यमातून ग्रामपंचायतींना उत्पन्नाचे मोठे साधन उपलब्ध करून देता येईल. मी आपल्या सूचनांचे स्वागत करतो. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी अत्यंत मौलिक सूचना केलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी या विधेयकाच्या संदर्भात जी सूचना सुचविली ती सूचना विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात आली असली तरी ती शासनाला उपयुक्त आणि आवश्यक वाटत आहे. मला असे वाटते की, हे विधेयक आजच मंजूर करण्यापेक्षा उद्या हे विधेयक चर्चेला घेऊन सत्ताधारी पक्षातर्फे हीच सूचना मांडून विधेयक मंजूर करावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपण त्यासाठी मान्यता द्यावी. आपण आजच हे विधेयक मंजूर करू.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, शासनाला तांत्रिकदृष्टया सर्व प्रोसिजर पूर्ण करावी लागेल. आमची त्याला मान्यता आहे. त्याबद्दल आमचे काहीही म्हणणे नाही. सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केलेली आहे. आपल्याकडे आणखी वेळ आहे, सभागृहाचे कामकाज सुरु आहे. त्यामुळे उद्या सत्ताधारी पक्षातर्फे हीच सूचना मांडून विधेयक मंजूर करावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माझी हरकत नाही. परंतु, विधेयक पुन्हा मांडण्यापेक्षा आपल्याला तांत्रिकदृष्ट्या हे करता येते. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी जी सूचना केलेली आहे, त्याला आपण अनुमोदन दिलेले आहे असे समजून आपल्याला ते पूर्ण करता येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी ही सूचना मांडावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ठीक आहे, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस सूचना मांडतील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, पेसा कायदा आदिवासी क्षेत्रासाठी आहे. त्यामुळे ही सुधारणा केवळ जेथे पेसा कायदा लागू होतो अशा आदिवासी क्षेत्रासाठीच आहे. परंतु, राज्यात अशा अनेक ग्रामपंचायती आहेत की, ज्यांच्याकडे शंभर हेक्टरचे तलाव आहेत. अशा ग्रामपंचायतींना देखील याचा लाभ झाला तर त्याही ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शकतील. त्यामुळे या विधेयकाला दुरूस्ती सुचवून सर्व ग्रामपंचायतींना शंभर हेक्टरचा कायदा लागू

..4...



श्रीमती शोभा फडणवीस.......

व्हावा. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सबळ करण्याच्या दृष्टीने या विधेयकामध्ये तशा प्रकारची दुरूस्ती करुन राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना हा कायदा लागू व्हावा, अशी मी सुधारणा सूचविते.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे)** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे, वि.प.वि. क्रमांक 11 सुधारणेसह संमत करावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 11 सुधारणेसह संमत झाले आहे.

--------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 21 जुलै, 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.00 ते 11.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल.

विशेष बैठकीत सोमवार, दिनांक 20 जुलै, 2015 रोजीच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरले.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 39 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 21 जुलै, 2015 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION